


सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित आसमंतसह




धाराशिव | रविवार, २५ ऑक्टोबर २०२६ | वर्ष ४ थे अंक २२४ | पाने १२+८ | किंमत रु. ८/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



स्वातंत्र्य संघर्षामधील द्रष्ट्यांचे स्वप्न साकार करण्याची आकांक्षा संघ कार्यकर्त्यातच आहे. कारण संघाचा जन्मच ते आदर्श घेऊन झालेला आहे. संघाचे स्वयंसेवक व्यक्तिगत महत्त्वाकांक्षेच्या आहारी जात नाहीत. कारण त्यांच्यात स्वतःला सत्ता संघर्षापासून दूर ठेवण्याची क्षमता आहे.

**भारतरत्न स्व. नानाजी देशमुख**
संस्थापक, दीनदयाल शोध संस्थान

# बड्या औषध कंपन्यांचा रुग्णांच्या जिवाशी खेळ

### ३३० औषधी गुणवत्ता मानकांत नापास

### बड्या कंपन्यांच्या नावावर बनावट औषधांची विक्री

**नवी दिल्ली, २४ ऑक्टोबर**

केंद्रीय औषध प्रयोगशाळांना विविध कंपन्यांनी तयार केलेल्या औषधांचे ३३० नमुने गुणवत्ता मानकांशी सुसंगत नसल्याचे आढळले आहे. बड्या औषध कंपन्यांच्या नावावर बनावट औषधींची विक्री केली जात असल्याचे तपासात उघड झाल्याची माहिती केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने एका निवेदनातून दिली आहे. सप्टेंबरमध्ये ३३० नमुने मानकांची पूर्तता करू शकले नाहीत असे त्यात नमूद करण्यात आले.

दिल्लीतील तपासणीत दुसऱ्या कंपनीच्या ब्रँडच्या नावाने तयार केलेले एक बनावट औषधही आढळले. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या औषध सतर्कता अहवालात म्हटले की, केंद्रीय औषध प्रयोगशाळांना विविध कंपन्यांनी तयार केलेल्या औषधींचे ४२ नमुने गुणवत्ता मानकांशी सुसंगत नसल्याचे आढळले आहे. याव्यतिरिक्त, राज्य औषध चाचणी प्रयोगशाळांनाही औषधांचे २८८ नमुने मानकांशी सुसंगत नसल्याचे आढळले. औषधी गुणवत्ता मानकांत नापास झालेल्या औषधींची एकूण संख्या ३३० आहेत. नियमित नियामक देखरेख उपक्रमांचा एक भाग म्हणून, मानकांशी सुसंगत नसलेल्या आणि बनावट औषधांची यादी दरमहा केंद्रीय औषध मानक नियंत्रण संस्थेच्या पोर्टलवर प्रसिद्ध केली जाते. जर औषधीचा नमुना एक किंवा अधिक स्थापित गुणवत्ता मानकांची पूर्तता करत नसेल, तर तो सुसंगत नसलेला मानला जातो. ही कमतरता सरकारी प्रयोगशाळेने तपासलेल्या औषधीच्या विशिष्ट बॅचपुरती मर्यादित असते. याचा अर्थ असा नाही की बाजारात उपलब्ध असलेल्या इतर औषधांच्या गुणवत्तेवरही प्रश्नचिन्ह आहे. ज्या कंपन्यांची औषधी गुणवत्तेची पूर्तता करण्यात अपयशी ठरली त्यांची चौकशी सुरू करण्यात आली.



**सरकारकडून समिती स्थापन**

औषध कंपन्यांच्या विपणनाशी संबंधित अनैतिक प्रथांना आळा घालण्यासाठी सरकारने एक समिती स्थापन केली आहे. औषधनिर्माण विभागाने ही समिती स्थापन केली आहे. ही समिती औषध विपणनाशी संबंधित विद्यमान नियमांचा आढावा घेईल आणि या क्षेत्रातील अनैतिक प्रथांना आळा घालण्यासाठी उपाययोजना सुचवेल. समितीचे अध्यक्षपद नीती आयोगाचे सदस्य एम. श्रीनिवास भूषवतील. माजी केंद्रीय आरोग्य सचिव प्रीती सुदान आणि मेदांताचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक (सीएमडी) नरेश त्रेहान हे तिचे सदस्य असतील. ◂ (वृत्तसंस्था)

### कायदा आणि नियमांनुसार कारवाई

दिल्लीतील एक औषधाचा नमुना बनावट असल्याचे आढळले. हे अनधिकृत उत्पादकांनी तयार केले होते, ज्यांनी दुसऱ्या कंपनीच्या मालकीच्या ब्रँडचा वापर केला होता. मंत्रालयाने म्हटले की या प्रकरणाची चौकशी सुरु असून कायदा आणि नियमांनुसार कारवाई केली जाईल. निकृष्ट दर्जाची आणि बनावट औषधे ओळखण्यासाठी नियमित कारवाई केली जाते. ही कारवाई राज्य नियामकांच्या सहकार्याने करण्यात येत आहे. अशी औषधे ओळखून बाजारातून काढून टाकणे हा यामागील उद्देश आहे. ■

# खासदार संजय राऊत मास्टरमाईंड

### तत्काळ गुन्हा दाखल करण्याची भाजपाची मागणी

**मुंबई, २४ ऑक्टोबर**

५०० कोटींची ऑडिओ क्लिप म्हणजे खासदार संजय राऊत यांच्या वॉर रूममध्ये एआयच्या (कृत्रिम बुद्धिमत्ता) सहाय्याने रचलेले एक मोठे षडयंत्र आहे. ही बनावट क्लिप छत्रपती संभाजीनगरातील एका व्यक्तीमार्फत मनोज जरांगे पाटील यांच्यापर्यंत पोहोचवण्यात आल्याचे समोर येत असून, या प्रकरणाचे सूत्रधार संजय राऊत यांच्यावर तात्काळ गुन्हा दाखल करून त्यांची सखोल चौकशी करावी, अशी थेट मागणी भारतीय जनता पक्षाचे प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी शनिवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली.

भाजपा प्रदेश कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

संजय राऊत यांच्या पथकाने गेल्या सुमारे दोन महिन्यांपासून ही ऑडिओ क्लिप तयार करण्याचे काम चालवले होते, असा दावा बन यांनी केला. संबंधित व्यक्तींचे युट्यूबवरील ऑडिओ नमुने गोळा करून एआय तंत्रज्ञानाच्या मदतीने हे बनावट संभाषण तयार केले गेले. भाजपा, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मनोज जरांगे पाटील यांच्यातील संबंध बिघडवणे आणि या तिघांचीही सामाजिक-राजकीय प्रतिमा डागाळणे हाच यामागील मुख्य हेतू होता. या संपूर्ण संभाषणाची संहिता (स्क्रिप्ट) स्वतः संजय राऊत यांनी आपल्या कार्यालयात बसून तयार केली. सुरुवातीला या संवादात १०० कोटींच्या रकमेचा उल्लेख करण्याचे ठरले होते; मात्र प्रसारमाध्यमांमध्ये अधिक खळबळ उडावी आणि प्रकरणाचे गांभीर्य वाढावे म्हणून राऊत यांनी आकडा फुगवून ५०० कोटी केला. क्लिपमध्ये ५०० कोटींचा उल्लेख येतो तिथे ऑडिओ ब्रिजेसमध्ये गॅप जाणवत असल्याने ही छेडछाड स्पष्ट दिसते, असेही त्यांनी नमूद केले. ◂ (तभा वृत्तसेवा)



### एसआयटीची नाटकं बंद करा : राऊत

आर्थिक गुन्हे शाखा आणि ईडी ५-५० लाखांसाठी लोकांना अटक करते. जर श्रीकांत शिंदेंना ५०० कोटी रुपये दिले असतील, तर हा थेट हवालाचा व्यवहार आहे. त्यामुळे ईडीने एकनाथ व श्रीकांत शिंदे यांच्यावर कारवाई केली पाहिजे. एसआयटीची नाटकं बंद करा, आधी एफआयआर दाखल करा, असे मत संजय राऊत यांनी व्यक्त केले. ■

### सत्य लवकरच समोर येईल : श्रीकांत शिंदे



पाटलांना जो प्रश्न पडलाय, तोच प्रश्न मलाही पडला आहे. ५०० कोटी रुपये नेमके कोणाकडे पाठवले आणि ते एकाच वेळी गोळा करायचे तर किती गाड्या लागल्या असत्या, याचा शोध मी घेत आहे. मुख्यमंत्र्यांनी फॉरेन्सिक तपासाचे आदेश दिले असून सत्य लवकरच समोर येईल, अशी प्रतिक्रिया खासदार श्रीकांत शिंदे यांनी दिली. ■

### राऊतांनी लिहिली स्क्रिप्ट : लाड



संजय राऊत यांनी कार्यालयात बसून या क्लिपची स्क्रिप्ट लिहिली. या संपूर्ण क्लिपचे निर्माते राऊतच असल्याचा आमचा स्पष्ट आरोप आहे. त्यामुळे एसआयटीने सर्वप्रथम राऊतांची आणि सामनाच्या स्टुडिओची चौकशी केली पाहिजे, असे मत भाजपा नेते प्रसाद लाड यांनी व्यक्त केले. ■

### राऊतांनी राहुल गांधींकडून घेतली 'सुपारी'

भाजपाला बदनाम करण्यासाठी संजय राऊत यांनी थेट राहुल गांधी यांच्याकडून 'सुपारी' घेतल्याचा खळबळजनक आरोप करताना नवनाथ बन यांनी, या षडयंत्रासाठी काँग्रेसकडून काही विशेष फंडिंग मिळाले आहे का, याचाही तपास तपास यंत्रणांनी करावा. अशी मागणी लावून धरली. ही क्लिप एआय जनरेटेड असल्याचा संशय अधिक बळावला असून, या संपूर्ण कुंभांडाचे सूत्रधार संजय राऊत यांना कायद्याच्या कचाट्यात आणणे आवश्यक असल्याचे बन यांनी स्पष्ट केले. ■

### षडयंत्रासाठी वाशीमध्ये वॉर रूम

या षडयंत्रासाठी नवी मुंबईतील वाशी परिसरात विशेष वॉर रूम उभारण्यात आली होती, अशी माहिती उघड करत बन यांनी सांगितले की, मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणाची एसआयटीमार्फत चौकशी करण्याचे आधीच जाहीर केले असल्याने आता राऊत यांची कसून चौकशी होणे गरजेचे आहे. प्रसारमाध्यमांनी हे प्रकरण गांभीर्याने घ्यावे यासाठीच संहितेमध्ये जाणीवपूर्वक एका ज्येष्ठ संपादकाचे नाव गोवण्यात आले. तसेच वाद पेटू शकेल अशाच पात्रांची निवड राऊत यांनी केली. ■

## महत्त्वाचे

### नरेंद्र मोदींचा बारामती दौरा तूर्त स्थगित

**बारामती :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ३ नोव्हेंबरचा नियोजित बारामती दौरा पुढे ढकलण्यात आला आहे. लवकरच या दौऱ्याची नवीन तारीख घोषित केली जाईल, अशी माहिती विद्या प्रतिष्ठानकडून देण्यात आली आहे.



बारामती येथील विद्या प्रतिष्ठानमध्ये उभारण्यात आलेल्या 'प्रेरणास्थळ' या इमारतीचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार होते ,याबाबत पंतप्रधान कार्यालयाकडून माहिती आधी देण्यात आलेली होती. त्यानुसार बारामतीत दौऱ्याची तयारी देखील सुरू होती. तथापि काल अचानक हा नियोजित दौरा तूर्त स्थगित करण्यात आल्याचे सांगण्यात आले. आता पंतप्रधान नरेंद्र मोदी हे नोव्हेंबर महिन्याचा तिसऱ्या किंवा अखेरच्या आठवड्यात बारामतीत येण्याची शक्यता आहे. मात्र याबाबतची तारीख अधिकृत प्राप्त झाली नाही.

### सोलर प्लांटवरील केबलची चोरी; दगडफेक व दमदाटी

**तभा वृत्तसेवा**

**अक्कलकोट,दि.२४- ऑक्टोबर-** अक्कलकोट तालुक्यातील दहिटणेवाडी येथील रिन्यू ग्रीन प्रा.लि. आणि रिन्यू टी.एन.थ्री या सोलर प्लांटवर केबल चोरीच्या उद्देशाने घुसून केबल तोडफोड केल्याची घटना शनिवार, दि.२४ ऑक्टोबर २०२६ रोजी पहाटेच्या सुमारास घडली.

या घटनेत ५ लाख २५ हजार ४०० रुपयांचे नुकसान झाले आहे. ३ लाख ६८ हजार ५२० रुपये किंमतीची कॉपर केबल चोरीला गेल्याची फिर्याद अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्यात दाखल झाली आहे.

याप्रकरणी चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यातील एकाला पकडण्यात पोलिसांना यश आले आहे.

आरोपींनी संगनमत करून सोलर प्लांटमधील ६ स्क्वेअर एम.एम. क्षमतेची काळ्या रंगाची कॉपर सोलर डी.बी. केबल सुमारे ७ हजार १०० मीटर लांबीची तोडून तिचे नुकसान केले. तसेच, ४ हजार ९८० मीटर लांबीची केबल, अंदाजे ३ लाख ६८ हजार ५२० रुपये किंमतींची केबल चोरुन नेण्याचा प्रयत्न चोरट्यानी केला.

दरम्यान, यातील फिर्यादी जयभीम दामू गजदाने आणि साक्षीदारांनी आरोपींना पाहिले असता, त्यांनी शिवीगाळ व दमदाटी करत दगडफेक केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. त्यानंतर आरोपी पळून जात असताना रमेश मत्या काळे याला पकडण्यात आले, तर श्याम बाबू काळे, दत्ता रंगा काळे आणि छगन विश्राम पवार हे तिघे पळून गेल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.



क्राइस्टचर्च येथे शनिवारी खेळल्या गेलेल्या न्यूझीलंडविरुद्धच्या थरारक दुसऱ्या टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात तिलक वर्माने अवघ्या २६ चेंडूंत नाबाद ५१ धावांची खेळी करत भारताच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. भारताने चार गड्यांनी विजय नोंदवून पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत २-० अशी आघाडी घेतली (वृत्त क्रीडा पानावर)

# इराणविरुद्ध पुन्हा 'एपिक फ्युरी' सुरू करणार : ट्रम्प

**वॉशिंग्टन, २४ ऑक्टोबर**

अणुकार्यक्रमाला मर्यादा घालण्यासोबतच राजनैतिक करार न झाल्यास, इराणविरुद्ध पुन्हा 'ऑपरेशन एपिक फ्युरी' अंतर्गत हल्ले केले जाईल. यावेळी लष्करी कारवाईची वेळ आल्यास इराणकडे काहीही शिल्लक राहणार नाही, सर्व काही विध्वंस होईल असा इशारा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी निवडणूक प्रचार रॅलीतून दिला.

फ्लोरिडा येथील एका निवडणूक प्रचार रॅलीत बोलताना त्यांनी पूर्वीच्या राष्ट्रीय सुरक्षेच्या निर्णयांचा उल्लेख केला आणि इराणच्या नेतृत्वावर टीका केली. आम्ही 'ऑपरेशन मिडनाईट हॅमर'द्वारे इराणची युरेनियम समृद्ध करण्याची क्षमता पूर्णपणे नष्ट केली. त्यांचा लष्करी, आर्थिक आणि इतर सर्वच आघाड्यांवर पराभव केला आणि आता आम्ही हे काम पूर्णत्वास नेण्याची खात्री करत आहोत. त्यांच्याकडे करार करण्याशिवाय पर्याय उरलेला नाही. त्यांनी करारासाठी चालढकल केल्यास मोठी किंमत मोजावी लागेल. 'ऑपरेशन एपिक फ्युरी' सुरू करण्यासाठी आमचे सैन्य सज्ज आहे आणि माझा आदेश मिळताच इराणविरुद्ध हल्ले सुरू केले जाईल. इराणवर विजय मिळवल्यानंतर पश्चिम आशियातून परतणारी युद्धनौका क्युबाजवळ थांबतील असेही ट्रम्प म्हणाले. आमच्या भव्य युद्धनौका क्युबाजवळून जातील. त्यापैकी एक युद्धनौका किनाऱ्यापासून सुमारे ५० यार्ड अंतरावर थांबेल आणि क्युबाला करार करण्यासाठी बाध्य करू असेही त्यांनी सांगितले. ◂ (वृत्तसंस्था)

# अब्दुल्ला पाकिस्तानचा 'दिवाना'

### म्हणे, शेजारी देशामुळे काश्मिरी सुरक्षित

**श्रीनगर, २४ ऑक्टोबर**

आपला शेजारी देश ठिकठिकाणी जाऊन काश्मिरी नागरिकांचा आवाज उठवत आहे. त्यामुळेच जम्मू-काश्मीरमधील लोकांचे जीव वाचत आहेत. अन्यथा काश्मिरी नागरिकांबाबत भारताचा हेतू योग्य नाही, असा दावा करत नॅशनल कॉन्फरन्स पक्षाचे अध्यक्ष तथा माजी मुख्यमंत्री फारूख अब्दुल्ला यांनी पाकिस्तानचे कौतुक केले.



बारामुल्ला येथे पक्ष कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात स्थानिकांना संघर्षाचे आवाहन करताना अब्दुल्ला म्हणाले, दिल्लीकडून न्यायाची अपेक्षा करणे व्यर्थ आहे. आपला शेजारी देश काश्मिरी नागरिकांसाठी झटत आहे. त्यामुळेच जम्मू-काश्मीरमधील लोकांचे जीव वाचत आहेत. काश्मिरी नागरिकांबाबत भारताचा हेतू योग्य नाही. काश्मिरी नागरिकांनी लढा देण्याचे धाडस दाखवावे, अन्यथा तुमचे अस्तित्व आणि ओळख पूर्णपणे पुसली जाईल. जागतिक दबावामुळेच केंद्र सरकार सध्या गप्प आहे. काश्मीरचा प्रश्न अद्याप सुटलेला नाही, हे आमचा शेजारी जगभरात सातत्याने मांडत आहे आणि ही वस्तूस्थिती आहे. मुस्लिम समाजाच्या मालमत्तांना प्रमाणाबाहेर लक्ष्य केले जात आहे, त्यामुळे देशभरातील मुस्लिम समाजाने एकत्र येणे ही काळाची गरज आहे. ज्या राजवटीत मुस्लिम समाजाची घरे, दुकान आणि प्रार्थनास्थळे पाडली जात आहेत, त्या राजवटीला मुस्लिम कसे काय समर्थन देऊ शकतात, असा प्रश्नही अब्दुल्ला यांनी उपस्थित केला. आपले हक्क अबाधित राखण्यासाठी सर्वांनी एकत्र यायला हवे. ◂ (वृत्तसंस्था)

### अब्दुल्ला यांनी पाकिस्तानात जावे : सत शर्मा

अब्दुल्ला यांच्या विधानावर टीका करताना जम्मू-काश्मीरचे भाजपा प्रदेशाध्यक्ष सत शर्मा म्हणाले, अब्दुल्ला यांनी हे लक्षात घ्यायला हवे की, या देशाने दिलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यामुळेच ते अशी वक्तव्ये करू शकत आहेत. अशी भाषा जर पाकिस्तानात वापरली असती, तर त्यांना सोडले नसते. त्यांना इतकाच जर पाकिस्तानचा पुळका असेल, तर त्यांनी तत्काळ देश सोडावा. भाजपा राष्ट्रविरोधी वर्तन कधीही खपवून घेणार नाही. अब्दुल्ला यांनी तातडीने देशाची माफी मागावी, अन्यथा त्यांनी पाकिस्तानात जाऊन स्थायिक व्हावे; त्यांच्यासाठी तोच देश योग्य ठरेल. ■

# चारा लागवडीसाठी मिळणार एकरी १. ५५ लाख रुपये

**मुंबई, २४ ऑक्टोबर**

राज्यातील दुष्काळी स्थितीमुळे गंभीर चारा टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. पुढील पाच ते सहा महिने चाऱ्याची पुरेशी उपलब्धता रहावी, यासाठी रोजगार हमी योजनेच्या अंतर्गत वैयक्तिक, ग्रामपंचायत व सार्वजनिक जमिनीवर चारा पिकांच्या लागवडीसाठीला सरकारने मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे दुष्काळी तालुक्यांमध्ये पशुपालकांना हिरवा चारा मिळण्यास मदत होणार आहे. वैयक्तिक, सरकारी जमिनीवर रोजगार हमीतून चारा लागवड करता येईल, यासाठी प्रतिएकर चारा लागवडीसाठी १. ५५ लाख रुपये सरकारडून दिले जाणार असल्याची माहिती रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांनी शनिवारी दिली.

राज्यातील ३०४ दुष्काळी तालुक्यांत पशुधनासाठी चाऱ्याची गंभीर टंचाई भासण्याची शक्यता आहे. त्यामुळे सरकारकडून विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. त्याचाच भाग म्हणून राज्यातील दुष्काळी तालुक्यांसह अन्य भागांत चारा उपलब्ध व्हावा आणि ग्रामीण भागातील मजुरांच्या हाताला शाश्वत काम मिळावे, यासाठी 'विकसित भारत रोजगार व आजीविका हमी अभियान (ग्रामीण)' 'व्हीबी जी राम जी' अंतर्गत वैयक्तिक तसेच ग्रामपंचायतीच्या व सार्वजनिक जमिनीवर चारा पिकांच्या लागवडीसाठीच्या सविस्तर आर्थिक मापदंडास शासनाने मान्यता दिली आहे. वैयक्तिक जमिनीवर ७ हजार ४९० रोपांच्या चारा लागवडीसाठी एकूण १ लाख २१ हजार ८१५ रुपये मंजूर करण्यात आले. ◂ (वृत्तसंस्था)

# मानव-माकड संघर्ष रोखण्यासाठी समिती!

**लखीमपूर खेरी, २४ ऑक्टोबर**

उत्तर प्रदेशातील लखीमपूर खेरी जिल्ह्यात मानव-माकड संघर्ष रोखण्यासाठी नऊ सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली आहे. जिल्ह्यातील शहरी आणि ग्रामीण भागांत माकडांमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांवर नियंत्रण मिळविण्यासाठी ही समिती उपाययोजनांवर देखरेख ठेवणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी शनिवारी दिली.



जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील ही समिती राज्य सरकारच्या निर्देशांनुसार प्रमाणित कार्यपद्धती (एसओपी) तयार करणार आहे. शहरी भागातील नगरपरिषदा आणि नगरपंचायती तसेच ग्रामीण भागातील ग्रामपंचायतींना माकडांचा त्रास असलेल्या भागांची ओळख पटविणे, त्रासदायक माकडांना पकडण्याची व्यवस्था करणे आणि प्रशिक्षित पकडणाऱ्यांची नोंदणी करणे, अशा जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत.

दक्षिण खेरी विभागाचे वनाधिकारी तपस मिहिर यांनी सांगितले की, वन्यजीव संरक्षण कायद्याच्या प्रतिबंधित अनुसूचीतून माकडांची प्रजाती वगळण्यात आल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांना माकडे पकडण्यासाठी पूर्वपरवानगीची आवश्यकता नाही. पकडलेल्या माकडांची आरोग्य तपासणी करून ती रोगमुक्त असल्याचे प्रमाणित झाल्यानंतर त्यांना निश्चित केलेल्या वनक्षेत्रात सोडण्यात येईल.

माकडांची वाढती संख्या नियंत्रित करण्यासाठी त्रासदायक नर माकडांचे निर्बीजीकरण करण्याचाही राज्य सरकारच्या निर्देशांत प्रस्ताव आहे. या उपाययोजनांची अंमलबजावणी डेहराडून येथील भारतीय वन्यजीव संस्थेने तयार केलेल्या तांत्रिक अहवाल आणि आराखड्याच्या आधारे करण्यात येणार आहे. ◂ (वृत्तसंस्था)

### माकडांच्या 'घरांवर' अतिक्रमण

मानव-माकड संघर्ष निर्माण होण्यामागे प्रामुख्याने जंगलांचा ऱ्हास, वाढते शहरीकरण आणि माकडांच्या नैसर्गिक अधिवासावरील अतिक्रमण ही कारणे आहेत. जंगलांमध्ये अन्न आणि पाण्याची कमतरता निर्माण झाल्यामुळे माकडे मानवी वस्त्यांकडे वळतात. घरांमध्ये, बाजारपेठांमध्ये आणि कचराकुंड्यांमध्ये सहज अन्न उपलब्ध होत असल्याने त्यांची मानवी वस्त्यांमधील वर्दळ वाढते. नागरिकांकडून माकडांना खाऊ घालण्याच्या सवयीमुळेही त्यांचा माणसांशी संपर्क वाढतो. ■

# शेतकऱ्याचा फायनान्स कंपनीत संशयास्पद मृत्यू

**नांदेड, २४ ऑक्टोबर**

केवळ आठ ते दहा हजार रुपयांच्या कर्जवसुलीवरून एका शेतकऱ्याचा खासगी फायनान्स कंपनीच्या कार्यालयात संशयास्पद मृत्यू झाला. चंद्रकांत दगडूजी शिंदे, असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. ही घटना नांदेड जिल्ह्यातील माळकौठा येथे समोर आली. शिंदे यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या कुटुंबीयांनी फायनान्स कंपनीच्या कर्मचाऱ्यांवर गंभीर आरोप केले आहेत.

केवळ दहा हजार रुपयांच्या कर्जाच्या वसुलीसाठी चंद्रकांत यांना कार्यालयात डांबून ठेवण्यात आले आणि त्यांना मारहाण करण्यात आली. त्यानंतर त्यांचा मृत्यू झाल्यावर प्रकरणाला वेगळे वळण देण्यासाठी मृतदेह गळफास घेतलेल्या अवस्थेत टांगण्यात आला, असा आरोप नातेवाईकांनी केला आहे. पोलिसांनुसार, चंद्रकांत शिंदे हे नांदेड जिल्ह्यातील माळकौठा येथील रहिवासी होते. त्यांच्याकडे दोन एकर शेती होती. शेतीच्या उत्पन्नावर कुटुंबाचा उदरनिर्वाह करताना आर्थिक गरज भागवण्यासाठी त्यांनी केएफ एंटरप्रायझेस या खासगी फायनान्स कंपनीकडून १० हजार रुपयांचे कर्ज घेतले होते. मात्र, या अल्प रकमेच्या कर्जाच्या वसुलीवरून घडलेल्या घटनेने आता गंभीर स्वरूप धारण केले आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# पाकिस्तानची 'गॅस' कोंडी!

## इराणचा दणका, एलपीजी पुरवठा थांबवला

**इस्लामाबाद, २४ ऑक्टोबर**

अमेरिका-इराणमध्ये करारासाठी मध्यस्थीचे श्रेय घेणाऱ्या पाकिस्तानला इराणी सत्ताधाऱ्यांनी चांगलाच दणका दिला. त्यांना करण्यात येणारा एलपीजी गॅसचा (द्रवीकृत पेट्रोलियम गॅस) पुरवठा थांबवण्याचा निर्णय इराणने घेतला आहे. यासाठी त्यांनी तांत्रिक कारण दिले. इराणने एलपीजीचा पुरवठा थांबवल्याने पाकिस्तानात १२ किलो गॅस सिलेंडरचे दर ४,५०० वरून ७,००० पाकिस्तानी रुपयांपर्यंत पोहोचले आहे. सुरक्षेच्या कारणास्तव पाकिस्तानने इराणसोबतची सीमा बंद केल्यानंतर इराणने हे पाऊल उचलले आहे.

पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांताच्या सरकारने सुरक्षेच्या चिंता आणि तस्करी रोखण्याचे कारण देत इराणची सीमा पूर्णपणे बंद करण्याचा निर्णय घेतला. गब्द-रिमदान सीमेवरून दररोज ४००० टनांहून अधिक एलपीजी गॅस येत होता. पाकिस्तानी सरकारच्या निर्णयाला प्रत्युत्तर देत इराणने त्यांचा एलपीजी गॅसचा पुरवठा थांबवला. ज्यामुळे गॅस सिलेंडरच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे आणि देशभरात मोठ्या प्रमाणावर भीती पसरली आहे. पाकिस्तान आपल्या एकूण एलपीजी गरजेपैकी सुमारे ५० टक्के इराणकडून आयात करतो, या व्यत्ययामुळे देशाच्या ऊर्जा पुरवठ्यात अडथळा निर्माण झाला आहे. पाकिस्तान एलपीजी असोसिएशनच्या मते, दररोज सुमारे ७,००० मेट्रिक टन एलपीजी इराणमधून पाकिस्तानात येतो. या व्यत्ययामुळे देशाच्या इंधनाचा एक प्रमुख स्रोत खंडित झाला आहे. गब्द-रिमदान आणि ताफ्तान सीमा बंद झाल्यामुळे एलपीजीने भरलेले शेकडो ट्रक आणि टँकर सीमेवर अडकून पडले आहेत, ज्यामुळे पाकिस्तानला होणारा पुरवठा पूर्णपणे थांबला आहे. (वृत्तसंस्था)



### महागाईचा विक्रम, सरकारविरोधात रोष

पाकिस्तान एलपीजी असोसिएशनचे अध्यक्ष इरफान खोखर यांनी इशारा दिला आहे की, जर हे अडथळे असेच सुरू राहिले, तर तुटवडा आणि वाढत्या किमती अधिक गंभीर होऊ शकतात. एलपीजीच्या वाढलेल्या किमतींचा परिणाम आता इतर वस्तूंच्या किमतींवरही होत आहे. पाकिस्तानात आधीच वस्तूंचे दर गगणाला भिडले असताना एलपीजी तुटवड्यामुळे यात भर पडल्याने सरकारविरोधात रोष वाढत आहे.

### ओमान, इराकमधून होणारी आयातही प्रभावित

पाकिस्तान आपल्या एलपीजीच्या गरजेपैकी सुमारे ७० टक्के हिस्सा परदेशातून आयात करतो. इराणव्यतिरिक्त इराक आणि ओमानमधूनही गॅस येतो. पाकिस्तानचे पेट्रोलियम मंत्री अली परवेझ मलिक यांच्या मते, देशात दररोज सुमारे ६५०० ते ७००० टन एलपीजीची गरज असते. यापैकी २००० ते २५०० टन गॅस देशात तयार होतो, तर उर्वरित गरज आयातीद्वारे पूर्ण केली जाते. मात्र, होर्मुझ सामुद्रधुनीत इराणमधील युद्धामुळे निर्माण झालेल्या अडथळ्याचा परिणाम इराक आणि ओमानमधून होणाऱ्या आयातीवरही झाला आहे.



विजयादशमी आणि शताब्दी महोत्सवानिमित्त शनिवारी जबलपूर येथे संघाचे पथसंचलन झाले. यामध्ये मोठ्या संख्येने सहभागी झालेले राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक.

# अत्याधुनिक 'ब्राह्मोस-एनजी' लवकरच प्रत्यक्षात

### मुख्य कार्यकारी अधिकारी जयतीर्थ जोशी यांचा विश्वास

**नवी दिल्ली, २४ ऑक्टोबर**

भारत आणि रशियाच्या संयुक्त उपक्रमातून विकसित होणाऱ्या प्रसिद्ध 'ब्राह्मोस' सुपरसॉनिक क्रूझ' क्षेपणास्त्राची अधिक अत्याधुनिक आवृत्ती 'ब्राह्मोस-एनजी' लवकरच प्रत्यक्षात येत आहे. ब्राह्मोस एरोस्पेसचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापकीय संचालक जयतीर्थ जोशी यांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रगत क्षेपणास्त्राचा पहिला प्रोटोटाइप २०२७ किंवा २०२८ पर्यंत तयार होण्याची शक्यता आहे.

सध्याच्या ब्राह्मोसच्या तुलनेत ब्राह्मोस-एनजी आकाराने अधिक लहान आणि वजनाने अत्यंत हलके असेल. याचे वजन सुमारे १.२ ते १.५ टन आणि लांबी ६ मीटरपेक्षा कमी असेल. हलक्या वजनामुळे आणि आधुनिक कंपोझिट मटेरियलच्या वापरामुळे हे क्षेपणास्त्र सुखोई-३० एमकेआय सोबतच भारताच्या हलक्या 'एलसीए तेजस' लढाऊ विमानावरही सहज तैनात करता येईल.

**सैन्यदलांना खोलवर मारा करण्याची ताकद मिळेल**

लखनौ येथील नवीन कारखान्यातून २०२७-२८ पर्यंत याचे प्रत्यक्ष उत्पादन सुरू करण्याचे उद्दिष्ट आहे. भविष्यातील धोरणात्मक गरजा लक्षात घेऊन ब्राह्मोस एरोस्पेस तब्बल १,५०० किमी पल्ल्याच्या क्षेपणास्त्राच्या संकल्पनेवरही काम करत आहे. (वृत्तसंस्था)

# नदीत वडिलांसह तीन मुले बुडाली

**सुरजपूर :** छत्तीसगडच्या सुरजपूर जिल्ह्यातील सरस्वतीपूर गावात शनिवारी लाल नदीत चार जण बुडाले. मृतांमध्ये तीन मुले आणि त्यांच्या वडिलांचा समावेश आहे. मुलांना पाण्यात बुडताना पाहून त्यांना वाचवण्यासाठी पाण्यात उडी मारणाऱ्या वडिलांचाही बुडून मृत्यू झाला. आरडाओरड ऐकून स्थानिकांनी तत्काळ बचावकार्य सुरू केले. गावकऱ्यांच्या मदतीने वडील आणि एका मुलाचा मृतदेह नदीतून बाहेर काढण्यात आला. इतर दोन मुलांचा शोध उशिरापर्यंत सुरू होता. पोलिसांच्या माहितीनुसार, हे सर्व जण नदीत आंघोळीसाठी गेले होते. खोल पाण्याचा अंदाज न आल्याने एकेक करून तिन्ही बुडू लागले. मुलांना बुडताना पाहून वडिलांनीही नदीत उडी मारली. परंतु, ते देखील खोल पाण्यात बुडाले.

## चित्रपट वार्ता

### ३६ दिवसांनंतर दीपिका करणार चित्रीकरण

**मुंबई :** बॉलिवूड अभिनेत्री दीपिका पादुकोण आपल्या दुसऱ्या मुलीच्या जन्मानंतर अवघ्या ३६ दिवसांनी कामावर परतण्याच्या तयारीत आहे. दीपिका २६ ऑक्टोबरपासून शाहरुख खानच्या बहुचर्चित 'किंग' चित्रपटातील गाण्याचे चित्रीकरण सुरू करणार आहे. १९ सप्टेंबर रोजी आपल्या दुसऱ्या मुलीचे स्वागत केल्यानंतर हे दीपिकाचे पहिले शूटिंग शेड्यूल असेल. या गाण्यात चित्रपटातील संपूर्ण स्टारकास्ट दिसू शकते. वैभवी मर्चंट या गाण्याचे नृत्यदिग्दर्शन करत आहेत, मात्र गाण्याचे शीर्षक आणि संगीतकाराबाबत अद्याप अधिकृत माहिती शेअर करण्यात आलेली नाही. चित्रपटाची निर्मिती मोठ्या प्रमाणावर केली जात असून, त्याचे अंदाजे बजेट सुमारे ४५० कोटी रुपये असल्याचे सांगितले जाते आहे. या ॲक्शन-थ्रिलर चित्रपटात शाहरुख आणि दीपिकाशिवाय सुहाना खान, अभिषेक बच्चन, राणी मुखर्जी, अभय वर्मा आणि अरशद वारसी महत्त्वाच्या भूमिकांमध्ये आहेत.



### दिलजीतला कॉन्सर्टची परवानगी

**मुंबई :** पंजाबी गायक आणि अभिनेता दिलजीत दोसांझचा ३० तारखेला दिल्लीतील जवाहरलाल नेहरू स्टेडियममध्ये कॉन्सर्ट होणार असल्याचे निश्चित झाले आहे. परवानगीबाबत सुरू असलेल्या चर्चांदरम्यान दिलजीतने स्वतः समोर येऊन हा कार्यक्रम रद्द होणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. तो दिल्लीमध्ये आपल्या चाहत्यांना भेटणार आहे. इंस्टाग्रामवर लाइव्ह येऊन दिलजीतने आपल्या खास शैलीत ठोस माहिती नसताना अफवा पसरवणाऱ्यांवर निशाणा साधला. जवाहरलाल नेहरू स्टेडियममधील कार्यक्रम ठरलेल्या वेळेनुसारच होणार आहे, असे रद्द होण्याच्या अफवा फेटाळून लावत दिलजीतने स्पष्ट केले. मी आलो आहे आणि ३० तारखेला दिल्लीत भेटू, असे हसत त्याने चाहत्यांना सांगितले. आधी बातमीची खातरजमा करून घ्या. हवेत बाण सोडण्यापेक्षा खरी गोष्ट समजून घेणे चांगले, असे दिलजीतने म्हटले.

### बच्चन समाज माध्यमावर पुन्हा सक्रिय

**मुंबई :** समाज माध्यमांपासून ब्रेक घेण्याचे सांगितल्यानंतर एका दिवसाने अमिताभ बच्चन पुन्हा परतले आहेत. त्यांनी ब्लॉग पोस्ट लिहिली. आताही आणखी विश्रांती हवी... जुळवून घेत आहे... विचार करत आहे आणि आश्चर्यचकित आहे... मानवी शरीर आणि त्याचे अनोखे स्वरूप, असे अमिताभ यांनी ब्लॉगवर लिहिले. अमिताभ यांनी याच्या एक दिवस आधी समाज माध्यमांपासून दूर राहण्याचे कारण सांगितले होते. काही दिवस विश्रांती घेऊन प्रकृती सुधारण्यासाठी वेळ देण्याचा सल्ला त्यांना देण्यात आला आहे, असे त्यांनी सांगितले होते. एक्सवर चार दिवस मौन पाळल्यानंतर अमिताभ यांनी माफी मागितली होती. मी तुमची माफी मागतो. काही दिवस विश्रांती घेऊन प्रकृती सुधारण्यासाठी वेळ देण्याचा सल्ला मला देण्यात आला आहे. त्यामुळे मी काहीही लिहू शकत नाही, असे त्यांनी लिहिले होते.



# फिलिपिन्स वायुदलाच्या दोन विमानांची हवेत टक्कर

## लिपन शहरातील हवाई तळावर सरावादरम्यान घटना, चार वैमानिकांचा होरपळून मृत्यू

**मनिला, २४ ऑक्टोबर**

बटांगस प्रांतातील लिपन शहरातील फर्नांडो हवाई तळावर प्रशिक्षणादरम्यान दोन एसएफ-२६० विमानांची हवेत टक्कर होऊन फिलिपाइन्स वायुदलाचे चार वैमानिक ठार झाले. हवेत टक्कर झाल्यानंतर ही विमाने हवाई तळाच्या परिसरात कोसळली. वायुदलाकडून या घटनेची चौकशी सुरू करण्यात आली असून, सर्व एसएफ-२६० विमानांचे उड्डाण थांबवण्यात आले आहे.

फिलिपाईन्सच्या वायुदलाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, हा अपघात शुक्रवारी फिलिपिन्सची राजधानी मानिलाच्या दक्षिणेस असलेल्या बातांगस प्रांतातील फर्नांडो वायुतळावर घडला. प्रशिक्षण आणि सरावाचा भाग म्हणून हवाई तळावरून एसएफ-२६० या दोन विमानांनी उड्डाण घेतले. हवाई तळाच्या आसपास घिरट्या घालत असताना दोन्ही विमाने एकमेकांसमोर आली आणि त्यांची टक्कर झाली. त्यानंतर दोन्ही विमाने



फर्नांडो वायुतळाच्या परिसरात कोसळली. हवेतच स्फोट झाल्याने विमानातील चार वैमानिकांचा होरपळून मृत्यू झाला. या वर्षी हवेत विमानांची टक्कर होण्याची ही पाचवी मोठी दुर्घटना आहे. या घटनेनंतर फिलिपाईन्सच्या वायुदलाने एसएफ -२६० विमानांच्या उड्डाणांवर बंदी घातली आहे. तपास पूर्ण होईपर्यंत ही बंदी कायम राहील. अपघाताचे कारण शोधण्यासाठी वायुदलाकडून तपास सुरू करण्यात आला.

**इटलीकडून खरेदी केली विमाने**

दोन्ही विमाने कमी उंचीवर उड्डाण करत होते. त्याचदरम्यान त्यांची एकमेकांशी टक्कर झाली. त्यापैकी एक विमान लष्करी जवानांच्या बराकीजवळ कोसळले. ही विमाने इटलीकडून खरेदी करण्यात आली होती. फिलिपाईन्सच्या सैन्याला दीर्घकाळापासून निधीच्या कमतरतेमुळे आपली लढाऊ विमाने, नौदल आणि भूदलाचे आधुनिकीकरण करण्यात अडचणींचा सामना करावा लागत असताना वायुदलाच्या विमानांच्या अपघाताने अत्याधुनिक विमानांचे अद्यावतीकरण आणि आधुनिक विमानांच्या खरेदीची गरज निर्माण झाली आहे. (वृत्तसंस्था)

### विमानांची विशेषतः

एसएफं-२६० हे एक जड लढाऊ विमान नसून, एक हलके प्रशिक्षण आणि हलके हल्ला करणारे विमान आहे. याची रचना आणि निर्मिती १९६० च्या दशकात इटालियन अभियंता स्टेलिओ फ्राटी यांनी इटलीमध्ये केली होती. त्याचे पहिले उड्डाण १५ जुलै १९६४ रोजी झाले. मूळतः एव्हियामिलानोद्वारे निर्मित, एसआयएआय-मार्केटीने उत्पादन हाती घेतले. नंतर, ते एरोमॅकी आणि आता लिओनार्डो कंपन्यांच्या अंतर्गत चालू राहिले. हे दोन आसनी, पिस्टन-इंजिन असलेले, पूर्णपणे प्रशिक्षण आणि सरावासाठी वापरण्यात येणारे विमान आहे. अनेक देशांची हवाई दले याचा वापर प्रशिक्षण आणि हलक्या हल्ल्यांसाठी करतात.

### ट्रेलरची बसला धडक, तीन ठार, २५ जखमी

**जयपूर, २४ ऑक्टोबर**

जयपूर-अजमेर राष्ट्रीय महामार्गावर शुक्रवारी रात्री उशिरा एक भीषण अपघात झाला. बागरू पुलावरून खाली उतरत असताना बसस्थानकाजवळ यात्रेकरूंना घेऊन जाणाऱ्या प्रवासी बसला एका ट्रेलरने धडक दिली. यात तीन भाविकांचा मृत्यू झाला तर २५ जण जखमी झाले. जखमींपैकी सात जणांची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यांच्यावर जयपूरमधील एसएमएस रुग्णालयाच्या ट्रॉमा सेंटरमध्ये उपचार सुरू आहे. पोलिसांनुसार, हा अपघात पहाटे सुमारे १:४५ वाजता झाला. माहिती मिळताच पोलिस पथक घटनास्थळी दाखल झाले. या बसमध्ये महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यातील भाविक प्रवास करत होते. खाटूश्यामजींचे दर्शन घेऊन ते चित्तोरगड येथील सांवरिया सेठ मंदिराकडे जात असताना हा अपघात झाला. ओव्हरटेक करण्याच्या नादात ही घटना घडली. या बसमध्ये २९ प्रवासी होते. अपघातानंतर घटनास्थळी गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

# खटल्याविना तुरुंगात डांबता येणार नाही

### सर्वोच्च न्यायालयाचा राजस्थानच्या माजी मंत्र्याला दिलासा

**नवी दिल्ली, २४ ऑक्टोबर**

केवळ आरोपांचे गांभीर्य लक्षात घेऊन कोणालाही खटल्याविना अनिश्चित काळासाठी तुरुंगात डांबून ठेवता येणार नाही, असे स्पष्ट करत सर्वोच्च न्यायालयाने राजस्थानचे माजी मंत्री महेश चंद्र जोशी आणि सहआरोपी मुकेश पाठक यांना २७९.४५ कोटी रुपयांच्या बहुचर्चित जल जीवन मिशन निविदा घोटाळ्यात सशर्त जामीन मंजूर केला आहे.

न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि न्यायमूर्ती शील नागू यांच्या न्यायासनाने राजस्थान उच्च न्यायालयाचा जामीन नाकारणारा आदेश रद्द केला. न्यायासनाने नमूद केले की, खटल्याविना कैद्याला दीर्घकाळ तुरुंगात ठेवणे म्हणजे सुनावणीविना शिक्षा देण्यासारखे आहे. हे घटनेच्या कलम २१ अंतर्गत हमी दिलेल्या वैयक्तिक स्वातंत्र्य आणि जलद सुनावणीच्या मूलभूत हक्कांचे थेट उल्लंघन ठरते. गुन्ह्याचे गांभीर्य तपासतानाच पुराव्यांशी छेडछाड न करणे आणि तपासात सहकार्य करण्याच्या अटी घालत न्यायालयाने दोन्ही आरोपींची सुटका करण्याचे आदेश दिले.

**बनावट प्रमाणपत्रावर मिळविले ९७९.४५ कोटींची कंत्राटे**

राजस्थानच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने २०२४ मध्ये या गैरव्यवहाराची प्राथमिक चौकशी सुरू केली होती. नोंदवलेल्या प्रथम माहिती अहवालानुसार, २०२१ ते २०२३ दरम्यान दोन कंपन्यांनी 'इरकॉन इंटरनॅशनल लिमिटेड'ची बनावट पूर्तता प्रमाणपत्रे सादर करून तब्बल १०४ निविदांमध्ये ९७९.४५ कोटी रुपयांची कंत्राटे मिळवली होती. (वृत्तसंस्था)

# तस्करांनी दहशतवाद्यांना पुरवला ७६ कोटींचा निधी

### दिल्ली, पंजाब आणि हरयाणातून अमली पदार्थ जप्त

**नवी दिल्ली, २४ ऑक्टोबर**

अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) मुख्यालयाने अमली पदार्थ तस्कर बनीत सिंग तलवारला बेकायदेशीर सावकारी प्रतिबंधक कायदा, २००२ च्या तरतुदींनुसार अटक केली. सेमी-प्रोसेस्ड टाल्कमध्ये लपवलेल्या अमली पदार्थांच्या मोठ्या प्रमाणावरील तस्करीच्या प्रकरणात ही अटक करण्यात आली. दिल्ली, पंजाब आणि हरयाणा येथेही अमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. आरोपीला तीस हजारी न्यायालयातील विशेष न्यायाधीशांनी पाच दिवसांची ईडी कोठडी सुनावली आहे.

एनआयएने दाखल केलेल्या एफआयआरच्या आधारे ईडीचा तपास सुरू करण्यात आला. हा एफआयआर हरप्रीत सिंग तलवार आणि इतरांविरुद्ध अमली पदार्थांच्या तस्करीच्या कारवायांच्या संबंधात यूएपीए, एनडीपीएस कायदा आणि भारतीय दंड संहितेच्या कलमांखाली नोंदवण्यात आला होता. एनआयएने या प्रकरणात यापूर्वी सहा आरोपपत्रे दाखल केली होती. त्यात अफगाणिस्तान, पाकिस्तान आणि दुबई येथून कार्यरत असलेल्या आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ तस्करी सिंडिकेटसोबत कट रचल्याचा आरोप अनेक आरोपींवर ठेवण्यात आला होता, असे तपासात उघड झाले आहे.

**हवालामार्फत पैशांचे हस्तांतरण**

प्रतिबंधित वस्तूंची तस्करी, हवालामार्फत अमली पदार्थांच्या विक्रीतून मिळालेला पैसा अफगाणिस्तानला हस्तांतरित करणे आणि इतर प्रतिबंधित वस्तूंच्या माध्यमातून एकूण ८९ कोटी रुपये गुन्हेगारीतून मिळाले होते. या प्रक्रियेत गुन्ह्यातून मिळालेल्या रकमेची निश्चिती करण्यासाठी पुढील तपास सुरू आहे. बनीत सिंग तलवार हा हरप्रीत सिंग तलवारचा भाऊ आहे. हरप्रीत सिंग तलवारने सूत्रधार राजू दुबईसोबत मिळून भारतात अमली पदार्थांची तस्करी सुलभ केली. एनआयएच्या प्रकरणात हरप्रीत सिंग तलवारला अटक झाल्यानंतरही बनीत सिंग तलवार त्याच्या नियंत्रणाखालील व्यावसायिक संस्थांचे व्यवस्थापन आणि संचालन करत राहिला, असेही तपासात उघड झाले आहे. (वृत्तसंस्था)

### अमली पदार्थांच्या विक्रीतून मिळालेल्या पैशांचा वापर

या सिंडिकेटचा सूत्रधार वितेश कोसर ऊर्फ राजू दुबई हा एक फरारी आरोपी आहे. तो पाकिस्तानी आयएसआय एजंट आणि अफगाण नागरिकांसोबतही सामील होता. अमली पदार्थांच्या अवैध विक्रीतून मिळालेले ७६ कोटी रुपये हवाला मार्गाने अफगाणिस्तानला पाठवले गेले आणि त्याचा वापर दहशतवादी कारवायांना निधी देण्यासाठी केला गेला, असा दावा तपास यंत्रणेने केला आहे.

# ३,१५,००० वर्षे जुन्या चेहऱ्याची पुनर्रचना

## प्राचीन जीवाश्मासह आधुनिक ३डी तंत्रज्ञानाचा वापर

**रबात, २४ ऑक्टोबर**

प्रजातीच्या सर्वात सुरुवातीच्या ज्ञात सदस्यांपैकी एकाचा चेहरा शास्त्रज्ञांनी डिजिटल पद्धतीने पुनर्निर्मित केला आहे. सुमारे ३,१५,००० वर्षांपूर्वी राहणारे मानव आजच्या काळातील माणसांसारखेच दिसत होते, असे यावरून दिसून येते. ही पुनर्रचना मोरोक्कोमधील जेबेल इरहौद येथे सापडलेल्या मानवाच्या प्राचीन जीवाश्मांवर आधारित आहे. हे निष्कर्ष सुरुवातीच्या 'होमो सेपियन्स'च्या (मानवाच्या) स्वरूपाबद्दल आणि हजारो वर्षांच्या कालावधीत मानवी चेहऱ्याची वैशिष्ट्ये कशी बदलत गेली आहेत, हे दर्शवतात.

ब्राझिलियन ३डी डिझायनर सिसेरो मोरेस आणि त्यांच्या टीमने प्रगत संगणक तंत्रज्ञानाचा वापर करून जीवाश्म झालेल्या कवटीच्या अवशेषांवरून चेहऱ्याची पुनर्रचना केली. पुनर्रचित चेहऱ्यामध्ये ठळक वैशिष्ट्ये, एक उठावदार जबडा आणि आधुनिक समाजात पूर्णपणे



असामान्य न वाटणारे स्वरूप दिसून येते. हे जीवाश्म सर्वप्रथम १९६० च्या दशकात मोरोक्कोमध्ये खाणकामादरम्यान सापडले होते. हे अवशेष सुमारे ४० हजार वर्षांपूर्वी जगलेल्या मानवाच्या एका प्राचीन नातेवाईकाचे आहेत, असे शास्त्रज्ञांना सुरुवातीला वाटले. मात्र, पुढील संशोधनांमुळे ही समज बदलली. २०१७ मध्ये, संशोधकांनी हे जीवाश्म सुरुवातीच्या 'होमो सेपियन्स' प्रजातीचे असल्याचे ओळखले आणि त्यांचे वय सुमारे ३,१५,००० वर्षे इतके असल्याचे निश्चित केले.

प्राचीन व्यक्तीच्या स्वरूपाचा अंदाज घेण्यासाठी त्यांनी हे मॉडेल, आधुनिक प्रौढ व्यक्तीच्या सीटी स्कॅन आणि चेहऱ्याच्या ऊतींच्या जाडीच्या मोजमापांसोबत एकत्रित केले. संशोधक पथकाने चेहऱ्याच्या विविध आवृत्त्याही तयार केल्या. यामध्ये केस, चेहऱ्यावरील केस आणि त्वचेचा रंग दर्शवणारी एक वास्तववादी प्रतिमा देखील समाविष्ट होती. मात्र, संशोधकांनी हे तपशील कलात्मक दृष्टिकोनातून कल्पिलेले आहेत, कारण प्राचीन हाडांवरून अशी माहिती थेट मिळवणे शक्य नसते, हे स्पष्ट केले. (वृत्तसंस्था)

### पूर्वजांचा अभ्यास करण्यास मदत

नवीनतम पुनर्रचनेसाठी, संशोधकांनी अनेक जीवाश्म नमुन्यांपासून तयार केलेल्या डिजिटल कवटीच्या मॉडेलचा वापर केला. या निष्कर्षांवरून आधुनिक मानवाच्या चेहऱ्याची काही ओळखण्यायोग्य वैशिष्ट्ये लाखो वर्षांपूर्वीच विकसित झाली होती, असे सूचित होते. या पुनर्रचनेमुळे मानवी उत्क्रांतीविषयी मौल्यवान अंतर्दृष्टी मिळते आणि आधुनिक तंत्रज्ञान शास्त्रज्ञांना पूर्वजांचा अधिक चांगल्या प्रकारे अभ्यास करण्यास मदत होऊ शकते. हे संशोधन 'हेरिटेज' या नियतकालिकात प्रकाशित झाले आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## मुस्कान-साहिलची हायकोर्टात धाव

**लखनौ** : उत्तर प्रदेशातील कुप्रसिद्ध निळा ड्रम हत्याकांड प्रकरणात मृत्युदंडाची शिक्षा सुनावलेल्या मुस्कान आणि साहिलने मेरठ न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देण्यासाठी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. सौरभ हत्याकांड प्रकरणात या दोघांना न्यायालयाने १४ ऑक्टोबरला मृत्युदंडाची शिक्षा सुनावली होती. त्यानंतर त्यांनी मृत्युदंडाच्या शिक्षेला उच्च न्यायालयात आव्हान देण्याचा निर्णय घेतला होता. कनिष्ठ न्यायालयाने सुनावलेली मृत्युदंडाची शिक्षा उच्च न्यायालयाने रद्द करावी, अशी दोघांची इच्छा आहे.

## २१२.३४ कोटींचा घोटाळा; सीबीआयचे छापे

**नवी दिल्ली** : २१२.३४ कोटींच्या घोटाळा प्रकरणी सीबीआयने मुंबईतील वांद्रे (पूर्व) येथील कॅनरा बँकेच्या सर्कल ऑफिसमधील तक्रारीच्या आधारे आयएल ॲण्ड एफएस एनर्जी डेव्हलपमेंट कंपनी लिमिटेड आणि तिचे व्यवस्थापकीय संचालक/संचालक सुनील वाधवा, अनुप सेठ, हरी शंकरन, रमेश चंद्र बावा, अरुण कुमार साहा, तसेच अज्ञात सरकारी अधिकारी आणि खाजगी व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल केला आहे. त्यांच्यावर फसवणूक, गुन्हेगारी कट रचल्याचा आणि भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हे केल्याचा आरोप आहे. आरोपींनी गुन्हेगारी कट रचून तत्कालीन सिंडिकेट बँकेच्या मुंबई शाखेतून १०० कोटी रुपयांचे मुदत कर्ज आणि तिच्या लंडन शाखेतून ५० दशलक्ष अमेरिकन डॉलर्स घेतल्याचा आरोप आहे. कंपनीने बँकेचा निधी ज्या उद्देशासाठी मंजूर करण्यात आला होता, त्या उद्देशासाठी वापरला नाही. ■

# कुकी-जो बंडखोरांचे तळ सुरक्षा दलाच्या ताब्यात

**मणिपूरमधील अड्ड्यांवर साडेतीन वर्षांनी नियंत्रण**

**इंफाळ, २४ ऑक्टोबर**

मणिपूरमध्ये वांशिक हिंसाचार सुरू झाल्यानंतर जवळपास साडेतीन वर्षांनी सुरक्षा दलांनी कुकी-जो बंडखोरांच्या एका तळावर पूर्ण नियंत्रण मिळवले आहे. कांगपोकपी जिल्ह्यातील सिनाई कॅम्पमध्ये १५९ नोंदणीकृत बंडखोर असण्याची शक्यता होती. परंतु, तिथे केवळ एकच कार्यकर्ता आढळला. या प्रकरणानंतर, सुरक्षा दलांनी राज्यातील सर्व १४ तळांची तपासणी करण्याचा निर्णय घेतला आहे.

मणिपूर पोलिस आणि केंद्रीय सशस्त्र पोलिस दलाच्या संयुक्त पथकाने शुक्रवारी सिनाई कॅम्पवर छापा टाकला आणि शनिवारी त्यावर पूर्ण नियंत्रण मिळवले. सुरक्षा अधिकाऱ्यांनुसार, १५९ नोंदणीकृत कार्यकर्त्यांपैकी छावणीत केवळ एकच कार्यकर्ता उपस्थित होता. याव्यतिरिक्त, करारानुसार नोंदणीकृत कार्यकर्ते म्हणून ओळख न पटलेल्या १७ व्यक्ती आढळून आल्या. पोलिसांनी त्यांना अटक करून ३१ ऑक्टोबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. ओळख लपवणे, परवानगीशिवाय शस्त्रे बाळगणे आणि कराराच्या अटींचे उल्लंघन करणे यासह छावणीतील अधिकाऱ्यांच्या भूमिकेची चौकशी केली जात आहे.



### २४ अग्निशस्त्रे, ३८ मॅगझिन्ससह स्फोटके जप्त

सुरक्षा दलांनी सिनाई छावणीतून २४ अग्निशस्त्रे, ३८ मॅगझिन्स, मोठ्या प्रमाणात दारुगोळा, स्फोटके, वायरलेस कम्युनिकेशन उपकरणे आणि इतर लढाऊ साहित्य जप्त केले. अधिकाऱ्यांनुसार, छावणीत न आढळलेल्या कार्यकर्त्यांबद्दल वेगवेगळे दावे केले जात आहेत. काही जण घरी परतले असून, इतर जण इतर ठिकाणी असल्याचे सांगितले जात आहे. सुरक्षा दल आता या दाव्यांची चौकशी करत आहे. राज्यात पहिल्यांदाच कुकी-जो बंडखोरांचे एक निश्चित शिबिर थेट त्यांच्या नियंत्रणाखाली घेण्यात आले आहे. ही कारवाई नेहमीच्या तपासापेक्षा वेगळी आहे. ◂(वृत्तसंस्था)

### सप्टेंबरमध्येच संपला शस्त्रसंधी करार

कुकी-जो बंडखोर गट आणि केंद्र सरकार यांच्यातील शस्त्रसंधी करार चार सप्टेंबरलाच संपला. मात्र, त्याचे नूतनीकरण करण्यात आलेले नाही. मणिपूरचे गृहमंत्री गोविंददास कोंथौजम यांनी शुक्रवारी याला दुजोरा दिला. तथापि, एका वरिष्ठ सुरक्षा अधिकाऱ्याने स्पष्ट केले की, हा करार औपचारिकपणे रद्द करण्यात आलेला नाही. त्यामुळे, बंडखोरांनी निश्चित शिबिरांमध्येच राहिले पाहिजे आणि त्यांची शस्त्रे स्थापित सुरक्षा व्यवस्थेअंतर्गत तिथेच ठेवली पाहिजेत. करार वाढवायचा की नाही, याचा निर्णय केंद्र सरकारवर अवलंबून आहे. हिंसाचार थांबवणे आणि संवादाद्वारे राजकीय तोडग्याकडे वाटचाल करणे, हा व्यवस्थेचा उद्देश होता. ■

# ऑडियो बॉम्बच्या धुरात झाकोळल्या दुष्काळी शेतकऱ्यांच्या व्यथा!




१९७२ पेक्षाही भीषण दुष्काळी परिस्थिती असून खरिपाची उभी पिके हातातोंडातून गेल्यानंतर आता रब्बी पिकांची काहीही शाश्वती नसल्याने जगाचा पोशिंदा म्हणविणारा बळीराजा शोकाकूल झालेला आहे. दुष्काळामुळे ऐन सणासुदीत उपासमारीची वेळ आलेला शेतकरी कुटुंबाला पोसायचे कसे? मुलांचे शिक्षण, दवाखाना करण्यासह जमलेले विवाह करण्यास हतबल झालेला आहे. मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जात संकटग्रस्त शेतकऱ्यांना छातीशी लावून आधार देण्याचा प्रयत्न करून दुष्काळ तर घोषित केलाच पण अग्रीम आर्थिक मदत देण्यासही सुरुवात केली आहे. शेतकरी कर्जमाफीच्या रकमा बळीराजाच्या बँकखात्यावर जमा होत आहेत. दुष्काळामुळे पिचलेल्या शेतकऱ्याला काही प्रमाणात दिलासा मिळतो आहे. दरम्यान प्रसारमाध्यमांसह राजकीय वर्तुळ आणि जनमाणसात दुष्काळाची चर्चा सुरु असतानाच मराठा योध्दा मनोज जरांगे यांनी ५०० कोटींचा ऑडिओ बॉम्ब फोडला अन् या धुराळ्यात दुष्काळात होरपळणाऱ्या शेतकऱ्यांच्या व्यथा झाकोळल्याने बळीराजाचे संकट अधीक गडद होताना दिसते आहे.

पुरोगामी म्हणवणाऱ्या महाराष्ट्राला राजकारणाचे लागलेले ग्रहण सुटता सुटत नसल्याची शोकांतिका आहे. महाराष्ट्रात २४ बाय ७ सुरु असलेल्या आरोप-प्रत्यारोपांच्या राजकारणामुळे जनतेचा राजकारणातील इंटरेस्ट आणि विश्वास दोन्हीही उडत चाललेले आहे. गल्ली ते दिल्ली केवळ आंदोलने आणि अरोप-प्रत्यारोप यामुळे विकासाच्या मार्गावरील भारताची आंतरराष्ट्रीय बदनामी होत असल्याची शोकांतिका आहे. देशाला कायदे व न्याय देणाऱ्या संसदेचा राजमार्ग सोडून विरोधक रत्यावर उतरत आहेत. महात्मा गांधी, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घेणाऱ्या युवावर्गाने मौनाचे आंदोलन, न्यायालयीन लढाई सोडून रत्यावरचे आंदोलन करण्याचा कल दर्शवलेला आहे. वास्तविक पाहता राजकीय विरोधकांनी पुराव्यासह सत्ताधाऱ्यांना संसदेत उघडे पाडून १४० कोटी जनतेला सत्य काय ते पटवून दिले पाहिजे. तर युवकांनीही संविधानावर विश्वास ठेवून शांतीच्या मार्गाने देशभर आंदोलन करून जनतेला पटवून देत त्यांना बरोबर घेतल्यास त्यांच्या आंदोलनाला खरी धार येवू शकते. आजचा जमाना हा बाप दाखव नाही तर श्राध्द घाल या म्हणीप्रमाणे वागण्याचा आहे. त्यामुळे सरकार आणि संविधानिक संस्थांच्या विरोधात पुराव्यासह लढाई लढली पाहिजे.



शेतकरी दुष्काळाच्या संकटात असताना वास्तविक राज्यकर्ते आणि विरोधकांनी बळीराजाच्या मदतीसाठी रान उठविण्याची गरज आहे. परंतु मनोज जरांगे यांनी ५०० कोटींचा ऑडिओ बॉम्ब फोडला आणि राज्यातील राजकारणात आरोप-प्रत्यारोपांचे गुऱ्हाळ सुरु झाले. सत्ताधारी आपसात अन् विरोधकही एकमेकांवर चिखलफेक करू लागले आहेत. दोन ते अडीच वर्षांपूर्वीची ऑडिओ क्लिप व्हायरल झाल्याने राजकारणात राडा सुरु झाला आहे. महायुतीमधील पक्षांमध्ये संशयाचे धुक पसरू लागले आणि त्याचा गैरफायदा न उचलतील ते विरोधक कसले. वास्तविक पाहता राजकारण हा रोजचा धंदा झाल्याचे चित्र आहे. पण किमान भीषण दुष्काळाच्या संकटात सापडलेल्या बळीराजाला मदतीचा हात देण्यासह धीर देण्यास सत्ताधारी व विरोधकांनी प्राथमिकता असायला हवी आहे. आता कुठे दुष्काळाच्या झळा बसायला सुरुवात झाली असून खरा दुष्काळत फेब्रुवारी ते मे २०२७ या कडक उन्हाळ्याच्या कालावधीत जाणवणारा आहे. आक्टोबर अखेरीस ७५ टक्क्यांवर आलेले उजनी धरण बाष्पिभवनानंतर तळ गाठणार आहे. यंदा ऊस पिकलाच नाही तर खूप मोठे संकट येणार नाही, पण जर का दुर्दैवाने पुढील वर्षीही वरूणराजाने दिरंगाई केलीच तर मात्र अर्धे सोलापूर स्थलांतरीत झाल्यास आश्चर्य वाटायला नको. त्यामुळे किमान पुढील पावसाळ्यापर्यंत तरी उजनीतील पाण्याची काटकसर आणि काटकसरीने वापर करणे ही काळाची गरज आहे.

देश आणि राज्यात आंदोलनाचा धुराळा सुरु असताना वरूणराजाने दाखविलेल्या अवकृपेमुळे जगाचा पोशिंदा म्हणविला जाणारा बळीराजा दुष्काळाच्या संकटात सापडला आहे. जगातील प्रत्येक व्यक्ती हा त्याला लागणारी वस्तू खरेदी करण्यासाठी मार्केटमध्ये जातो पण शेतकरी हा एकमेव असा माणूस आहे की, वर्षभर काबाड कष्ट करून पिकवलेला माल विकण्यासाठी स्वतः घेऊन जातो. शेतकरी माल घेऊन बाजार समितीमध्ये जातो तेंव्हा नेमका त्याच्या मालाला भाव नसतो तर बाजार समितीमधील व्यापारी ठरवतील त्या दराने आपला कष्टाचा माल विकून येतो. कारण त्याला कुटुंबाच्या गरजा भागविण्यासाठी पैशाची गरज असते. नेमके शेतकऱ्यांच्या याच परिस्थितीचा गैरफायदा संबंधित यंत्रणा घेतात, ही शोकांतिका आहे. देशात अशी परिस्थिती निर्माण व्हावी की, शेतकऱ्याचा शेतमाल व्यापारी शेतात जावून खरेदी करतील. त्या दिवशी शेतकऱ्यांच्या मालाला थोडाफार तरी चांगला दाम मिळू शकतो. ऊस पिकवणाऱ्या शेतकऱ्यांच्या शेतातील ऊस कारखाने शेतातून घेवून जातात तसेच शेतकऱ्याच्या प्रत्येक शेतमालाची खरेदी ही त्याच्या शेतातूनच झाल्यास बळीराजाच्या होणाऱ्या लुबाडणुकीला आळा बसण्यास मदत होणार आहे.

### सामाजिक संस्था अन् समाजसेवकांना शेतकऱ्यांच्या सेवेची मोठी संधी

नेत्यांच्या वाढदिवसानिमित्त नको तिथे मदतीचे वाटप, धार्मिक कार्यासाठी ज्यांना आवश्यकता नाही अशांना अन्नदान वाटप, दिवाळीत फटाके फोडून लाखो रुपयांचा चुराडा हवेत करणे, शेतकरी संकटात असताना महागडे कपडे, मोबाईल, वाहन खरेदी यंदा टाळून बळीराजाला काही मदत करता येईल का? हे समाजातील सक्षम घटकांनी पाहिले पाहिजे. शेतकऱ्यांच्या सेवेची संधी सामाजिक संस्था व समाजसेवकांनी दवडू नये, ही माफक अपेक्षा!

# पतीचे अनैतिक संबंध म्हणजे क्रूरता नव्हे

**मद्रास उच्च न्यायालयाचे निरीक्षण; आरोपांमधून निर्दोष सुटका**

**चेन्नई, २४ ऑक्टोबर**

पतीचे दुसऱ्या महिलेसोबत अनैतिक संबंध असणे, हा भारतीय दंड संहितेच्या कलम ४९८ 'अ' अंतर्गत विवाहितेला हुंड्यासाठी किंवा इतर कारणांसाठी त्रास देण्याचा म्हणजेच क्रूरतेचा गुन्हा ठरत नाही, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा मद्रास उच्च न्यायालयाने दिला आहे. न्यायमूर्ती सुंदर मोहन यांनी शुक्रवारी एका खटल्याची सुनावणी करताना हे निरीक्षण नोंदवले. एका मृत महिलेच्या भावाने दाखल केलेल्या अपिलावर सुनावणी करताना न्यायालयाने पतीची निर्दोष सुटका केली.

संबंधित महिलेने आपल्या दीड वर्षांच्या मुलासह जीवन संपवले होते. पतीचे अनैतिक संबंध आणि हुंड्याच्या छळाला कंटाळून तिने हे टोकाचे पाऊल उचलल्याचा आरोप तिच्या भावाने केला होता. याप्रकरणी २३ एप्रिल २०१८ रोजी सत्र न्यायालयाने ठोस पुराव्यांच्या अभावी पतीची सर्व आरोपांमधून निर्दोष सुटका केली होती. राज्य सरकारने या निकालाविरोधात अपील न केल्यामुळे, मृत महिलेच्या भावाने उच्च न्यायालयात धाव घेतली होती.

न्यायालयाने सुनावणीदरम्यान म्हटले की, कलम ४९८ 'अ' अंतर्गत गुन्हा सिद्ध करण्यासाठी केवळ पतीचे अनैतिक संबंध असल्याचे सिद्ध करणे पुरेसे नाही, तर त्यापलीकडे जाऊन इतर छळाचे पुरावे अभियोजन पक्षाला सादर करावे लागतात.

### सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा दाखला

सर्वोच्च न्यायालयाच्या आधीच्या निकालांचा दाखला देत न्यायालयाने स्पष्ट केले की, अनैतिक संबंधांसोबतच महिलेवर झालेल्या इतर मानसिक किंवा शारीरिक क्रूरतेची पुराव्यानिशी सिद्धता होणे गरजेचे असते. 'पिनाकिन महिपातराय रावल विरुद्ध गुजरात राज्य' या खटल्याचा संदर्भ देताना न्यायालयाने म्हटले की, अभियोजन पक्ष हुंड्याची मागणी किंवा पतीचे अनैतिक संबंध सिद्ध करू शकला नाही. तसेच, संबंधित महिलेला जीवन संपवण्यास प्रवृत्त केले, अशी कोणतीही क्रूरता घडल्याचा पुरावा आढळला नाही. त्यामुळे पतीची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. ◂(वृत्तसंस्था)

# 'ऑडिओ क्लिप' खरी; प्रकरणाच्या मुळाशी जा!

**मनोज जरांगेंची मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांकडे मागणी**

**छत्रपती संभाजीनगर, २४ ऑक्टोबर**

कथित ५०० कोटी रुपयांच्या व्यवहारासंदर्भातील ऑडिओ क्लिप खरी असल्याचा दावा मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी शनिवारी केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या प्रकरणाच्या मुळाशी जाऊन चौकशी करावी आणि दोषींना सोडू नये, अशी मागणी करतानाच शिवसेना नेते रामदास कदम यांच्या चौकशीचे आवाहनही त्यांनी केले.

गुरुवारी जरांगे यांनी प्रसिद्ध केलेल्या ऑडिओ क्लिपमुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. या क्लिपमध्ये काही पदाधिकाऱ्यांमधील कथित संभाषण असून, शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून जरांगेंना ५०० कोटी रुपये मिळाल्याचा उल्लेख त्यात आहे. यावर कुणीही कुणाला पैसे दिले नसल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले असून या 'ऑडिओ क्लिप'संभाषणात सहभागी असलेल्या लोकांची चौकशी करावी, अशी मागणी जरांगे यांनी केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटातील लोक आपली बदनामी करण्यासाठी प्रयत्न करीत असल्याचा आरोप जरांगे यांनी केला. शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न उपस्थित करीत असल्यामुळे आपल्याविरोधात कट रचण्यात आल्याचेही ते म्हणाले. पडद्यामागच्या गोष्टी आम्ही उघड केल्या आहेत. खरे तर पडदाच फाडला आहे. यामुळे सर्व राजकीय पक्षांतील नेते जागे झाले आहेत. या प्रकरणाच्या मुळाशी जाणार आहे, असे जरांगे यांनी सांगितले.

### कदमांकडे क्लिप आली कुठून?

शिवसेना नेते रामदास कदम यांच्याकडे ही ध्वनिमुद्रित क्लिप आली कुठून आणि कथितरीत्या १४ ऑक्टोबर २०२४ रोजीची असलेली क्लिप आताच का समोर आली, असा सवाल जरांगे यांनी केला. कदम यांच्याकडे संपूर्ण ध्वनिमुद्रण असतानाही त्यांनी केवळ एकनाथ शिंदे यांचा उल्लेख असलेलाच भाग जाहीर केल्याचा आरोप त्यांनी केला. ◂(वृत्तसंस्था)



### 'मराठा सेवा' संघटना उभारणार

मराठा समाजाच्या कल्याणासाठी आणि समाजाचे हित जपण्यासाठी 'मराठा सेवा' ही बिगरराजकीय संघटना स्थापन करणार असल्याची घोषणा मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी शनिवारी केली. जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील अंकुशनगर येथे पत्रकारांशी बोलताना त्यांनी ही माहिती दिली. मराठा समाजातील तरुणांना या संघटनेत सहभागी होता येणार आहे. तसेच, विविध राजकीय पक्षांशी संबंधित असलेल्या व्यक्तींनाही संघटनेत प्रवेश घेता येईल. मात्र, संघटना कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित राहणार नाही, असे जरांगे यांनी स्पष्ट केले. ■

# एकदाच वापरायच्या वैद्यकीय उपकरणांच्या पुनर्वापरावर बंदी

**सरकारी आणि खाजगी रुग्णालयांना केंद्राचे निर्देश**

**नवी दिल्ली, २४ ऑक्टोबर**

एकदाच वापरण्यासाठी तयार केलेली वैद्यकीय उपकरणे आणि शस्त्रक्रियेसाठी वापरल्या जाणाऱ्या वस्तूंचा पुनर्वापर करण्यावर केंद्र सरकारने बंदी घातली आहे. या बंदीची सरकारी आणि खासगी आरोग्यसंस्थांमध्ये कठोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश केंद्राने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना दिले आहेत. अशा उपकरणांच्या पुनर्वापरामुळे रुग्णांना संसर्ग होण्याचा धोका असून, वापरलेल्या उपकरणांसाठीही रुग्णांकडून पूर्ण किंमत आकारली जात असल्याच्या तक्रारी आहेत.

आरोग्य सेवा महासंचालनालयाने (डीजीएचएस) १६ ऑक्टोबर रोजी जारी केलेल्या पत्रात काही खासगी आणि कॉर्पोरेट रुग्णालयांमध्ये एकदाच वापरण्यासाठी असलेली उपकरणे निर्जंतुक करून पुन्हा वापरली जात असल्याचे नमूद केले आहे. हृदयरोग, मूत्रपिंडविकार, कर्करोग, हृदय व रक्तवाहिन्यांवरील शस्त्रक्रिया तसेच मेंदू व मज्जासंस्थेशी संबंधित उपचारांमध्ये ही उपकरणे वापरली जात असल्याचे निदर्शनास आले आहे.




### पुनर्वापरामुळे कोणते धोके?

- हिपॅटायटिस बी व सी, एचआयव्ही आणि जिवाणूजन्य संसर्गाचा धोका.
- उपकरणांची कार्यक्षमता कमी होऊन उपचारांत गुंतागुंत.
- निर्जंतुकीकरण अपुरे राहिल्यास जैविक अवशेषांमुळे संसर्ग.
- रुग्णांकडून वापरलेल्या उपकरणांसाठीही पूर्ण किंमत आकारली जाण्याची शक्यता. ■

निर्जंतुकीकरणानंतरही अशा उपकरणांचा पुनर्वापर सुरक्षित असेलच, याची खात्री देता येत नाही. उपकरणांची कार्यक्षमता कमी होणे, जैविक अवशेष राहणे आणि संसर्ग पसरणे असे धोके संभवतात. हिपॅटायटिस बी व सी, एचआयव्ही तसेच जिवाणूजन्य संसर्गाचा धोका वाढू शकतो. केंद्राने संबंधित अधिकाऱ्यांना रुग्णालयांची तपासणी, नियमित देखरेख आणि नियमभंग करणाऱ्यांवर योग्य कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. औषधे व सौंदर्यप्रसाधने कायदा, १९४०, वैद्यकीय उपकरणे नियम, २०१७ आणि संबंधित आरोग्यविषयक तरतुदींनुसार कारवाई करण्यावर भर देण्यात आला आहे.

### सिरिंज आणि सुयांचाही पुनर्वापर

हृदयविकारावरील उपचारांसाठी वापरल्या जाणाऱ्या कॅथेटर, मार्गदर्शक तारा, बलून व अॅब्लेशन कॅथेटर, डायलिसिसची उपकरणे, रक्तवाहिन्यांमधून उपचारांसाठी वापरले जाणारे साहित्य, शस्त्रक्रियेतील स्टेपलर, लॅप्रोस्कोपी ट्रोकार आणि हाडांवरील शस्त्रक्रियांसाठी वापरल्या जाणाऱ्या ड्रिल बिट्सचा पुनर्वापर होत असल्याचे सांगण्यात आले आहे. सिरिंज आणि सुयांचाही पुनर्वापर होत असल्याचे भारतीय वैद्यकीय उपकरण उद्योग संघटनेने (आयएमईडी) नमूद केले आहे. ◂(वृत्तसंस्था)

# मायक्रो फायनान्सचा वसुलीचा तगादा

**परभणीत शेतकऱ्याने मृत्यूला कवटाळले**

**परभणी, २४ ऑक्टोबर**

मायक्रो फायनान्सच्या कर्ज वसुलीच्या तगाद्याला कंटाळून एका तरुण शेतकऱ्याने शेतातच गळफास लावून आत्मत्या केली. ही धक्कादाय घटना परभणी जिल्ह्यातील मानवत तालुक्यात घडली. लहू लाडाने, असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. या दुर्दैवी घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

पोलिसांनुसार, लहू लाडाने यांचा मृतदेह मानवत तालुक्यातील केकरजवळा शिवारात असलेल्या शेतात लिंबाच्या झाडाला लटकलेल्या अवस्थेत आढळून आला. मृत शेतकरी लहू यांच्यावर खासगी मायक्रो फायनान्स कंपनीचे कर्ज असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. शेतीतील नापिकी आणि त्यातच मायक्रो फायनान्सच्या कर्जाचा वाढता डोंगर तसेच वसुलीचा तगादा, या मानसिक ताणतणावातूनच त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याची चर्चा आहे. याप्रकरणी मानवत पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे. याप्रकरणी पोलिस मायक्रो फायनान्स कंपनीच्या कर्मचाऱ्यांकडून लहू यांची छळवणूक झाली होती का, याचाही शोध घेत आहे. तरुण शेतकऱ्याने जीवन संपवल्यामुळे लाडाने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून मानवत तालुक्यावर शोककळा पसरली आहे. ◂(तभा वृत्तसेवा)



भारतीय वायुदलाच्या ९४ व्या वर्धापन दिनानिमित्त, उत्तर प्रदेशातील वाराणसी येथे शनिवारी आयोजित 'विंग्स ओव्हर गंगा' या कार्यक्रमासाठी आले असता संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी काशी विश्वनाथ मंदिरात जाऊन महादेवाचा अभिषेक केला

# शिखांच्या जखमांवर काँग्रेसने मीठ चोळले

**रविशंकर प्रसाद यांचा राहुल गांधीवर घणाघात**

**१ नोव्हेंबरची तारीख निवडणे क्रूर थट्टा**

**नवी दिल्ली, २४ ऑक्टोबर**

काँग्रेस नेते राहुल गांधी एका सुनियोजित रणनीतीचा भाग म्हणून १ नोव्हेंबरला सभा घेण्याचा आग्रह धरून शीख समाजाच्या जखमांवर आणि दुखावलेल्या भावनांवर मीठ चोळत आहेत. ते सभा पुढे ढकलण्यास मुद्दाम नकार देत आहेत. ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर दिल्ली आणि देशाच्या इतर भागांमध्ये शीखविरोधी दंगली उसळल्या होत्या. त्यामुळे राहुल यांनी मोर्चासाठी १ नोव्हेंबरची तारीख जाणीवपूर्वक निवडली असा आरोप भाजपाचे ज्येष्ठ नेते खासदार रविशंकर प्रसाद यांनी शनिवारी पत्रपरिषदेतून केला.

राजधानी दिल्लीतील रामलीला मैदानावर १ नोव्हेंबर रोजी विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीने आयोजित केलेल्या सभेवर टीका करताना



प्रसाद म्हणाले, इंडिया आघाडीतील घटक पक्ष राहुल गांधींच्या मताशी असहमत आहेत, त्यांना हा कार्यक्रम पुढे ढकलायचा आहे. पण राहुल गांधी हट्टी आहेत. शिखांच्या भावनांची क्रूर थट्टा करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे.

आम्ही याचा तीव्र निषेध करतो. माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर १ नोव्हेंबर रोजी दिल्ली आणि देशाच्या इतर भागांमध्ये शीखविरोधी दंगली उसळल्या होत्या.

### सरकारची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न

राहुल गांधी यांना १ नोव्हेंबरला जाणीवपूर्वक सभा आयोजित करायची आहे. देशात अराजकता पसरविणे आणि सरकारची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न काँग्रेसकडून सुरू आहे. जनतेला त्यांचा डाव समजला असून, त्यांनी कितीही प्रयत्न केले, तरी त्यांना जनतेची साथ मिळणार नाही. ◂(वृत्तसंस्था)

## डॉक्टरांना महागड्या भेटवस्तू देणाऱ्या कंपन्यांना चाप

**नवी दिल्ली** : डॉक्टरांना महागड्या भेटवस्तू देणाऱ्या औषध कंपन्यांवर कारवाई करण्यासाठी केंद्र सरकारने एक समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. ही समिती औषध विपणन संहितेचा (यूसीपीएमपी) आढावा घेऊन औषध विक्री वाढवण्यासाठी डॉक्टरांना भेटवस्तू देणाऱ्या कंपन्यांना तपासणीच्या कक्षेत आणण्यासाठी आणि त्यांच्यावर कारवाईसाठी नियमावली तयार करणार आहे. ■

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



प्रासंगिक

नितीन गडकरी

# जलसंधारण हाच दुष्काळमुक्तीवर उपाय

पाण्याचे महत्त्व खऱ्या अर्थाने जाणवते ते दुष्काळाच्या संकटात. पावसाने ओढ दिली, विहिरी आणि बोरवेल आटल्या, धरणांमधील जलसाठा कमी झाला आणि पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागला की पाण्याच्या एकेका थेंबाचे मोल लक्षात येते. दुष्काळाचा परिणाम केवळ पिण्याच्या पाण्याच्या टंचाईपुरता मर्यादित राहत नाही. शेती, पशुधन, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि शेतकरी कुटुंबांच्या जीवनावरही त्याचे गंभीर परिणाम होतात. त्यामुळे दुष्काळ पडल्यावर पाण्याची व्यवस्था करण्याऐवजी दुष्काळाची तीव्रता कमी करण्यासाठी आधीपासूनच नियोजन करणे आवश्यक आहे.

दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या महाराष्ट्राला दिलासा देण्यासाठी शासनाच्या उपाययोजना सुरू राहतील आणि भविष्यात आवश्यक त्या ठिकाणी अधिक प्रभावी उपाययोजना कराव्या लागतील. परंतु प्रत्येक उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्यासाठी टँकरची प्रतीक्षा करणाऱ्याची वेळ येऊ नये, शेतकऱ्यांना पिके वाचविण्यासाठी असहायपणे आकाशाकडे पाहावे लागू नये आणि गावांची अर्थव्यवस्था पाण्याच्या टंचाईमुळे वारंवार संकटात सापडू नये, यासाठी आजपासूनच दीर्घकालीन नियोजन करणे गरजेचे आहे.

पाणी ही निसर्गाने दिलेली अमूल्य संपत्ती आहे. तिचे संवर्धन करणे ही केवळ शासनाची जबाबदारी नाही, तर समाजातील प्रत्येक घटकाचे कर्तव्य आहे. दुष्काळ पडल्यावर पाण्याचा शोध घेण्याऐवजी पाऊस पडत असताना पाणी साठविण्याची तयारी करणे, हीच दूरदृष्टी आहे. संकट आल्यानंतर उपाययोजना करणे आवश्यक असतेच; परंतु संकटाची तीव्रता कमी करण्यासाठी आधीपासून काम करणे अधिक महत्त्वाचे आहे.

आज महाराष्ट्रातील अनेक भागांना दुष्काळाच्या झळा सोसाव्या लागत आहेत. पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, शेतीसाठी सिंचन, जनावरांच्या चाऱ्याचा आणि पाण्याचा प्रश्न, भूजल पातळीतील घट आणि ग्रामीण भागातील आर्थिक अडचणी या परस्परांशी जोडलेल्या समस्या आहेत. पावसाची अनियमितता, काही ठिकाणी अल्पावधीत पडणारा अतिवृष्टीचा पाऊस, तर काही भागांत पावसाचे दीर्घकाळ खंडित राहणारे चक्र यामुळे परिस्थिती अधिक आव्हानात्मक बनत आहे. पाऊस पडूनही पाणी उपलब्ध राहत नसेल, तर त्यामागे केवळ पर्जन्यमानाचा प्रश्न नसतो; जलसंधारण, साठवण, पुनर्भरण आणि व्यवस्थापन याच्या नियोजनाचाही भाग असतो.

आपल्या देशात पाण्याचा प्रश्न हा उपलब्धतेपुरता मर्यादित नसून, उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करण्याचा आहे. पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर पाणी वाहून जाते आणि उन्हाळ्यात अनेक गावांना पाण्यासाठी वणवण करावी लागते. ही परिस्थिती बदलण्यासाठी 'धावत्या पाण्याला चालायला लावा, चालणाऱ्या पाण्याला थांबायला लावा आणि थांबणाऱ्या पाण्याला जमिनीत जिरवा', हे जलव्यवस्थापनाचे मूलभूत तत्त्व प्रत्येक गावाने स्वीकारले पाहिजे. 'गावातील पाणी गावात, घरातील पाणी घरात आणि शेतीतील पाणी शेतीत' या विचारातून जलस्वयंपूर्णतेचा मार्ग तयार होतो.

पावसाचे पाणी अडविण्यासाठी नाले, ओढे आणि लहान नद्यांचे पुनरुज्जीवन, नाला खोलीकरण व रुंदीकरण, गाळ काढणे, लहान बंधारे उभारणे, पाणलोट क्षेत्राचा विकास, भूजल पुनर्भरण आणि वृक्षारोपण अशा विविध उपाययोजनांची आवश्यकता आहे. ही कामे करताना स्थानिक भौगोलिक परिस्थिती, जमिनीचा प्रकार, पाण्याचा नैसर्गिक स्रोत, प्रवाह आणि भूगर्भातील जलधारणाची क्षमता यांचा शास्त्रीय अभ्यास करणे आवश्यक आहे. केवळ पाणी अडविणारी संरचना बांधणे म्हणजे जलसंधारण नव्हे; तर त्या संरचनेतून पाण्याचा दीर्घकालीन उपयोग कसा होईल, भूजल पातळी कशी वाढेल आणि शेतीला वर्षभर आधार कसा मिळेल, याचे नियोजन करणे महत्त्वाचे आहे. याच विचारातून २५ वर्षांपूर्वी पूर्ती सिंचन समृद्धी कल्याणकारी संस्थेची स्थापना करण्यात आली. संस्थेच्या माध्यमातून तामसवाडा पॅटर्न विकसित करण्यात आला. ग्रामीण भागातील पाणीटंचाईवर कायमस्वरूपी आणि शास्त्रीय उपाय शोधण्याच्या उद्देशाने वर्धा जिल्ह्यातील सेलू तालुक्यातील सुमारे १२ किलोमीटर लांबीच्या तामसवाडा नाल्याचे पुनरुज्जीवन केले. 'माथा ते पायथा' या तत्त्वावर आधारित या प्रकल्पात नाल्यातील गाळ काढणे, खोलीकरण, बंधाऱ्यांची दुरुस्ती व नवीन बंधाऱ्यांची उभारणी अशा उपाययोजनांसह संपूर्ण पाणलोट क्षेत्राचा एकात्मिक विकास करण्यात आला. ग्रामस्थ, शेतकरी, भूवैज्ञानिक, अभियंते आणि शासकीय विभागांच्या सहभागातून साकारलेल्या या प्रयोगामुळे पावसाचे पाणी अडविणे, जमिनीत मुरविणे आणि भूजलसाठ्याचे पुनर्भरण करणे शक्य झाले. तामसवाडा पॅटर्नच्या यशस्वी अनुभवातून विदर्भातील ६० हून अधिक गावांमध्ये जलसंधारणाची कामे करण्यात आली. संस्थेच्या नोंदीनुसार, या उपक्रमामुळे सुमारे १० हजार हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा आधार मिळाला असून, २४ लाख घनमीटर भूपृष्ठीय जलसाठा निर्माण झाला आहे. तसेच दरवर्षी सुमारे ६० लाख घनमीटर पाण्याच्या भूजल पुनर्भरणाची क्षमता विकसित झाली आहे. या जलसंधारण कार्याचा सुमारे एक लाख नागरिक आणि पाच हजार शेतकरी कुटुंबांना लाभ झाला असून, पाणीटंचाईवर मात करण्यासोबतच शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणारा हा एकात्मिक जलव्यवस्थापनाचा आदर्श ठरला आहे.

यासोबतच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या माध्यमातून रस्ते विकासासोबत जलसंधारणाला चालना देण्याच्या उद्देशाने बुलढाणा पॅटर्न राबविण्यात आला. अकोल्यातील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाला राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने ३५ तलाव बांधून दिले. रस्ते बांधणीसाठी



**महाराष्ट्रातील ३५८ तालुक्यांपैकी ३०५ तालुके दुष्काळग्रस्त जाहीर करण्यात आले आहेत. या तालुक्यांमध्ये जलसंधारणाच्या कामांवर विशेष लक्ष द्यावे लागणार आहे. या पृष्ठभूमीवर, यंदाच्या अॅग्रो व्हिजन कृषी प्रदर्शनात दुष्काळावरील उपाययोजना, दुष्काळापूर्वीचे नियोजन, जलसंधारण, जलपुनर्भरण, जलव्यवस्थापन इत्यादी विषयांवर चर्चा होणार आहे. पाण्याचा प्रश्न कसा सुटेल, याचा विचार करण्यावर भर दिला जाईल. दुष्काळ आणि जलसंधारण या संदर्भात केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांचे चिंतन....**

लागणारी माती देताना त्याबदल्यात विनामूल्य जलसाठे निर्माण करण्याचे हे 'मॉडेल' आर्थिक बचतीसोबतच पर्यावरणीय समतोल राखण्याचे उत्तम उदाहरण आहे. बीजोत्पादनात झालेली विक्रमी वाढ, फलोत्पादनातून मिळणारे कोट्यवधींचे उत्पन्न आणि आसपासच्या १९ गावांच्या भूजल पातळीत झालेली सुधारणा, ही या प्रकल्पाच्या यशाची फलश्रुती आहे. जलसंधारणासाठी पूलवजा बंधाऱ्यांची निर्मिती आणि जुन्या कोल्हापुरी बंधाऱ्यांचे आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने पुनर्वसन करणे, हेही महत्त्वाचे उपक्रम आहेत. योग्य तांत्रिक नियोजनातून एकाच प्रकल्पाद्वारे वाहतूक सुविधा आणि जलसाठवण या दोन्ही गरजा पूर्ण करता येतात. अशा उपाययोजनांमुळे जलसाठवण क्षमता वाढविणे, खर्चात बचत करणे आणि शेतीला पाण्याचा शाश्वत आधार देणे शक्य होते. रस्ते विकास आणि पर्यावरण संवर्धन यांची सांगड घालून दुष्काळाच्या संकटावर मात करण्यासाठी आमचे सातत्याने प्रयत्न सुरू आहेत.

दुष्काळमुक्त महाराष्ट्राची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी केवळ शासन किंवा एखादी संस्था पुरेशी ठरणार नाही. पायाभूत सुविधा निर्माण करणे, तांत्रिक मार्गदर्शन उपलब्ध करून देणे, विविध विभागांमध्ये समन्वय साधणे आणि आवश्यक निधी उपलब्ध करून देणे ही भूमिका शासन पार पाडत आहे. त्याचवेळी ग्रामपंचायतींनी गावाच्या पाण्याचा हिशेब ठेवला पाहिजे. गावात किती पाऊस पडतो, किती पाणी वाहून जाते, किती पाणी जमिनीत मुरते, किती जलसाठा उपलब्ध आहे आणि पिण्यासाठी तसेच शेतीसाठी किती पाण्याची गरज आहे, याचा विचार करून ग्रामस्तरावर जलआराखडा तयार केला पाहिजे. शेतकऱ्यांनीही जलसंधारणाच्या कामांमध्ये सक्रिय सहभाग घेतला पाहिजे. पाणी अडविण्याच्या संरचनांची देखभाल, नाल्यांमध्ये कचरा आणि अडथळे निर्माण होऊ न देणे, पाणलोट क्षेत्रातील मातीची धूप रोखणे, वृक्षारोपण करणे आणि उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे, या कामात शेतकरी व ग्रामस्थांची भूमिका महत्त्वाची आहे. उद्योगांनी सामाजिक उत्तरदायित्वाच्या निधीतून जलसंधारणाच्या कामांना हातभार लावावा. स्वयंसेवी संस्थांनी लोकसहभाग निर्माण करावा, तर तज्ज्ञांनी वैज्ञानिक दृष्टिकोनातून मार्गदर्शन करावे. अशा सर्व घटकांच्या एकत्रित प्रयत्नांतूनच जलसंधारणाची चळवळ व्यापक होऊ शकते.

पाण्याच्या प्रश्नाकडे फक्त एका हंगामापुरते पाहून चालणार नाही. आज आपण पाणी अडविण्यासाठी आणि जमिनीत जिरविण्यासाठी जे प्रयत्न करू, त्याचे परिणाम पुढील अनेक वर्षे ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होतील. जलसाठे निर्माण करणे ही सुरुवात आहे; त्यांचे संवर्धन करणे, नियमित देखभाल करणे आणि पाण्याचा शाश्वत वापर सुनिश्चित करणे ही त्यापुढील महत्त्वाची पायरी आहे. जलसंधारणाच्या कामांमध्ये लोकांचा सहभाग केवळ श्रमदानापुरता मर्यादित नसावा. गावातील पाण्याबाबत निर्णय घेणे, कामांचे प्राधान्य निश्चित करणे, त्यांची गुणवत्ता तपासणे आणि निर्माण झालेल्या जलसंपत्तीचे संरक्षण करणे, या सर्व बाबींमध्ये लोकसहभाग आवश्यक आहे.

महाराष्ट्राला जलसमृद्ध आणि दुष्काळाच्या संकटाला अधिक सक्षमपणे तोंड देणारे राज्य बनवायचे असेल, तर जलसंधारणाला लोकचळवळीचे स्वरूप द्यावे लागेल. पाण्याचा प्रत्येक थेंब अडविणे, जमिनीत जिरविणे, त्याचा योग्य वापर करणे आणि पुढील पिढ्यांसाठी जलसंपत्ती जतन करणे, हा या कार्याचा अविभाज्य भाग बनला पाहिजे. शासन, प्रशासन, शेतकरी, ग्रामपंचायती, उद्योग, स्वयंसेवी संस्था आणि सामान्य नागरिक यांनी एकत्र येऊन जर हा जलसंधारणाचा संकल्प स्वीकारला, तर दुष्काळाच्या झळा कमी करण्याच्या दिशेने आपण ठोस पावले उचलू शकू. जलसंवर्धनातून ग्रामसमृद्धी आणि ग्रामसमृद्धीतून महाराष्ट्राची समृद्धी साध्य करण्याचा हाच शाश्वत मार्ग आहे.

यंदा २७ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत होणाऱ्या अॅग्रो व्हिजन कृषी प्रदर्शनात यासंदर्भात सकारात्मक चर्चा होणार आहे. पावसाने दडी मारली तरीही गावांमध्ये दुष्काळसदृश परिस्थितीचा सामना करण्याचे सामर्थ्य कसे निर्माण होईल, याबाबत अॅग्रो व्हिजनमध्ये मंथन होईल, असा विश्वास आहे.

रोखठोक

दिनेश गुणे

# संभ्रमाच्या गदारोळात शहाणपणाचीच गरज!

सुमारे ५६ वर्षांपूर्वीची गोष्ट! 'महासत्ता' म्हणून जागतिक प्रतिष्ठा मिरविणाऱ्या अमेरिकेच्या राजधानी वॉशिंग्टनमधील त्या रात्रीला अजून पहाटेची चाहूल लागली नव्हती. पोटोमॅक नदीच्या काठावर उभ्या असलेल्या वॉटरगेट संकुलातील डेमोक्रॅटिक पक्षाच्या राष्ट्रीय मुख्यालयात मात्र काही माणसे दबक्या पावलांनी वावरत होती. त्यांनी आपली ओळख लपविण्याचा बेमालूम प्रयत्न केला होता. मुख्यालयातील अनेक कागदपत्रांच्या फायली घाईघाईने उघडल्या जात होत्या. महत्त्वाची कागदपत्रे फायलींमधून बाजूला काढली जात होती. रात्रीच्या अंधारात सुरू असलेल्या त्या कारवाईत सामील असलेल्या चार-पाच जणांना चोरी करायची नव्हती. राजकीय विरोधकांच्या हालचालींवर नजर ठेवणे, परस्परांतील संभाषणाचे धागेदोरे मिळविण्यासाठी त्यांच्या फोनमध्ये काही गुप्त साधने बसवून गुप्त माहिती मिळवणे आणि निवडणुकीच्या राजकारणात आघाडी मिळवण्यासाठी प्रतिस्पर्ध्यांच्या गोटात डोकावणे, हा त्या कारवाईमागील संशयित हेतू होता. दिवस उजाडण्याआधी ही मोहीम फत्ते होईल आणि निवडणुकीच्या राजकारणात विरोधकांवर कुरघोडी मिळविणे सहज होईल असे त्या पाच जणांना कदाचित वाटत होते. विरोधकांच्या गोटातील गुपितांची काही कुलपे उघडतील, काही गुप्त माहिती हाती लागेल आणि सकाळ होण्याआधी मोहीम पूर्ण होऊन काही घडलेच नाही असे भासविणारा दिवस उजाडेल असे त्यांना वाटले असावे. पण त्या रात्रीच्या त्या लहानशा घटनेत अमेरिकेच्या राजकारणाला आणि राजकीय इतिहासाला हादरवून टाकणारे अभूतपूर्व वादळ जन्माला येत होते. डेमोक्रॅटिक पक्षाच्या मुख्यालयात घुसखोरी करणाऱ्यांनाही त्याची कल्पना नसावी. पण तसे घडले नाही. त्या एका घटनेनंतर अमेरिकेच्या राजकीय इतिहासात ते वादळ प्रचंड वेगाने घोंघावले. मोठी पडझड झाली आणि अमेरिकेच्या तत्कालीन राष्ट्राध्यक्षांना राजीनामा देऊन पायउतार व्हावे लागले. या वादळाचे नाव होते, 'वॉटरगेट'!

डेमोक्रॅटिक पक्षाच्या मुख्यालयातील संशयास्पद हालचालींचा सुगावा तेथील पहारेकऱ्यांस लागलाच आणि १७ जून १९७२ रोजी घुसलेल्या पाच जणांना पोलिसांनी अटक केली. हा एखाद्या सामान्य घरफोडीचा प्रकार असावा असे सुरुवातीला पोलिसांनाही वाटले, पण त्यांची कसून झडती घेतल्यानंतर मात्र, या घटनेचे गांभीर्य लक्षात येऊन त्यांचे धाबे दणाणले. घुसखोरांकडे सापडलेली उपकरणे, गुप्त संभाषणे टिपण्याचे प्रयत्न आणि या कारवाईमागे असलेल्या व्यक्तींचे राजकीय संबंध यामुळे तपासाला वेगळे वळण मिळाले. अमेरिकेत त्या वेळी राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक जवळ आली होती. रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सन पुन्हा निवडून येण्यासाठी सज्ज होते. अशा वेळी त्यांच्या राजकीय प्रतिस्पर्ध्यांच्या मुख्यालयात घुसखोरी झाल्याने या घटनेकडे केवळ चोरीचा कट म्हणून पाहिले जाणे शक्यच नव्हते. राजकीय हालचालींचे केंद्र असलेल्या एका इमारतीत झालेली घुसखोरी आणि जगातील सर्वांत शक्तिशाली लोकशाही देशाच्या राष्ट्राध्यक्षांभोवती निर्माण होणारे संशयाचे वर्तुळ यांच्यामधील अंतर सुरुवातीला मोठे होते. मात्र तपास जसजसा पुढे सरकत गेला, तसतसे या अंतरातील दुवे उलगडू लागले. थेट राष्ट्राध्यक्ष निक्सन यांच्या निवडणूक मोहिमेशी निगडित व्यक्तींशी घुसखोरांचा संबंध असल्याचे समोर आले. या प्रकरणाने अमेरिकेच्या राजकारणात खळबळ उडवली.

याच टप्प्यावर, माध्यमांनी निर्णायक भूमिका बजावली. 'वॉशिंग्टन पोस्ट' या वृत्तपत्राच्या बॉब वुडवर्ड आणि कार्ल बर्नस्टीन या दोन पत्रकारांनी या प्रकरणाचा सातत्याने पाठपुरावा सुरू केला. केवळ एक खळबळजनक बातमी प्रसिद्ध करणे आणि बायलाईन मिरविणे, एवढेच त्या दोघांसमोरील आव्हान नव्हते. या प्रकरणात संबंधित असलेल्या काही प्रतिष्ठित व्यक्ती, त्यांमधील आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार, एकमेकांशी असलेल्या राजकीय संबंधांचा गुंता आणि परस्परविरोधी दावे या साऱ्याची संगतवार उकल करून त्यामागील सत्य शोधण्याची जबाबदारी आणि मोठी जोखीमही त्यांच्यावर होती. हाती आलेल्या प्रत्येक माहितीची पुराव्यानिशी खातरजमा करणे, गोपनीय सूत्रांकडून मिळालेल्या तपशिलांची सखोल पडताळणी करणे आणि दबावाला न जुमानता तपास सुरू ठेवणे, हे त्यांच्या कामाचे वैशिष्ट्य होते. त्यांच्या वृत्तांकनामुळे वॉटरगेट प्रकरणातील संशयाचे धागे हळूहळू स्पष्ट होऊ लागले. या पत्रकारांना माहिती पुरवणाऱ्या एका गोपनीय सूत्राची ओळख अनेक वर्षे गुप्त राहिली. त्याला 'डीप थ्रोट' या सांकेतिक नावाने ओळखले जात असे. पुढे २००५ मध्ये एफबीआयचे माजी उपसंचालक मार्क फेल्ट यांनीच हे सूत्र आपण असल्याचे जाहीर केले आणि सत्तेच्या दालनांमध्ये घडणाऱ्या घटनांवर प्रकाश टाकणारी माहिती उजेडात आली.

मात्र, 'वॉटरगेट' नावाने जागतिक राजकीय पटलावर सर्वाधिक 'हिट' ठरलेल्या या प्रकरणाची कथा केवळ दोन पत्रकारांच्या चिकाटीची किंवा काही घुसखोरांच्या अटकेची कथा नव्हती. तिच्या मुळाशी सत्तेचा हव्यास, विरोधकांवर पाळत ठेवण्याची वृत्ती आणि गैरप्रकार उघडकीस आल्यानंतर त्यांना झाकण्याची धडपड होती. घुसखोरीच्या प्रकरणातून लक्ष हटवणे, संबंधित व्यक्तींना पैसे देऊन गप्प ठेवण्याचे प्रयत्न करणे आणि तपासाच्या दिशेवर परिणाम घडवून आणणे, अशा बाबी यातून पुढे आल्या. १९७३ मध्ये अमेरिकेच्या सिनेटने वॉटरगेट प्रकरणाच्या चौकशीसाठी विशेष समिती स्थापन केली. समितीच्या सार्वजनिक सुनावण्यांचे दूरचित्रवाणीवरून प्रसारण होऊ लागले. त्यामुळे अमेरिकेतील सामान्य नागरिकांनाही या प्रकरणातील तपशील थेट पाहता आणि ऐकता आले. व्हाईट हाऊसमध्ये नेमके काय घडले होते, निवडणूक मोहिमेशी संबंधित व्यक्तींची भूमिका काय होती आणि राष्ट्राध्यक्षांच्या कार्यालयाला या प्रकरणाची कितपत माहिती होती, या प्रश्नांनी देशाचे राजकारण ढवळून निघाले. या सुनावण्यांमध्ये माजी व्हाईट हाऊस सल्लागार जॉन डीन यांच्या साक्षीला विशेष महत्त्व प्राप्त झाले. प्रशासनाच्या अंतर्गत घडामोडींची माहिती असलेल्या डीन यांनी प्रकरण हाताळण्याच्या पद्धतीबद्दल गंभीर बाबी मांडल्या. राष्ट्राध्यक्षांच्या कार्यालयातील चर्चांबद्दल आणि तपासात अडथळे आणण्याच्या प्रयत्नांबद्दल समोर आलेल्या माहितीनंतर निक्सन प्रशासनावरील दबाव वाढत गेला. व्हाईट हाऊसच्या दाराआड चाललेल्या राजकारणाचे स्वरूप आता देशासमोर उघड होऊ लागले होते.

या प्रकरणातील सर्वांत नाट्यमय वळण मात्र राष्ट्राध्यक्षांच्या कार्यालयातील संभाषणांच्या ध्वनिमुद्रणांमुळे आले. या ध्वनिमुद्रणांवरून व्हाईट हाऊस आणि तपास यंत्रणांमध्ये संघर्ष निर्माण झाला. राष्ट्राध्यक्षांच्या अधिकारांना मर्यादा आहेत का, चौकशीच्या प्रक्रियेत न्यायालयांना अध्यक्षीय कार्यालयातील पुरावे मागवता येतात का, राष्ट्रीय सत्तेच्या सर्वोच्च पदावर असलेल्या व्यक्तीलाही कायद्याच्या चौकटीत राहावे लागते का, हे प्रश्न केवळ अमेरिकेपुरते मर्यादित राहिले नाहीत. ते लोकशाही व्यवस्थेच्या मूलभूत स्वरूपाशी संबंधित होते. २४ जुलै १९७४ रोजी अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने युनायटेड स्टेट्स विरुद्ध निक्सन या प्रकरणात एकमताने महत्त्वपूर्ण निर्णय दिला. राष्ट्राध्यक्षांनी मागणी केलेली ध्वनिमुद्रणे सादर करावी, असा आदेश न्यायालयाने दिला आणि हे प्रकरण निक्सन यांच्या अंगाशी येऊ लागले. पदावर राहण्याच्या त्यांच्या क्षमतेवरच प्रश्नचिन्ह उभे राहिले. न्यायालयीन प्रक्रियेने आणि सार्वजनिक चर्चेने त्यांच्या प्रशासनाभोवतीचे संरक्षण कमकुवत केले होते. एकेकाळी प्रचंड राजकीय ताकद असलेल्या राष्ट्राध्यक्षांना आता आपल्या पदाच्या भविष्याचा विचार करावा लागत होता. ऑगस्ट १९७४ मध्ये परिस्थिती निर्णायक टप्प्यावर पोहोचली. ८ ऑगस्ट रोजी रिचर्ड निक्सन यांनी दूरचित्रवाणीवरील भाषणातून राष्ट्राध्यक्षपदाचा राजीनामा देण्याची घोषणा केली. एका घुसखोरीपासून सुरू झालेल्या प्रकरणाचा शेवट राष्ट्राध्यक्षांच्या राजीनाम्यात झाला होता. हा केवळ एका राजकीय नेत्याचा पराभव नव्हता; तर सत्तेच्या गैरवापरावर नियंत्रण ठेवणाऱ्या लोकशाही संस्थांच्या सामर्थ्याची कसोटी होती.

वॉटरगेट प्रकरणाने राजकारणातील कुरघोडीच्या, सत्ताकारणाच्या कारवायांचा नवा पट जगासमोर उलगडला गेला. राजकारणात, विशेषतः सत्तेच्या राजकारणात सर्वत्र असे चालतच असते, ही बाब उघड झाली. अशा कारवाया गुप्तपणे चालतात, कधी त्या सर्वांत सुरक्षित वाटणाऱ्या, कडेकोट बंदोबस्ताच्या चौकटीत जन्म घेतात, तर कधी त्याची सुरक्षा भेदून गुपिते बाहेर काढण्याचे तंत्र त्यावरच कुरघोडी करते. काही अज्ञात शक्ती सक्रिय झाल्याखेरीज अशी गुपिते बाहेर पडत नाहीत, हेदेखील या प्रकरणानंतर स्पष्ट झाले. विरोधकांवर पाळत ठेवणे, गैरप्रकार उघड करणाऱ्यांना गप्प करण्याचा प्रयत्न करणे, तपासावर प्रभाव टाकणे आणि सार्वजनिक संस्थांना पक्षीय हितासाठी वापरणे, या प्रवृत्ती जगात सर्वत्र राजकारणात सक्रिय असतात, हे स्पष्ट झाले. आता तर हे एवढे सार्वत्रिक सवयीचे झाले आहे, की गुपितांचा गौप्यस्फोट, गुप्त माहिती उघड करून कोणा एखाद्यावर दबाव टाकण्यासारखे काही घडले, तर त्याचा धक्का बसत नाही. त्याचे कोणास फारसे आश्चर्यही वाटत नाही.

राजकीय पक्षांचे किंवा सत्ताकारणातील महत्त्वाच्या मोहऱ्यांचे कोअर ग्रुप, त्यांच्या गुप्त बैठका, त्यामध्ये होणारी चर्चा, निर्णय, रणनीती किंवा विमर्श तयार करण्याचे धोरण, विरोधकांना कोंडीत पकडण्याच्या राजकारणाचा आराखडा, विरोधकांच्या विरोधात वापरावयाचे प्रचार-अपप्रचाराचे तंत्र हा लोकशाही सत्ताकारणातील जुनाच भाग आहे. अनेकदा तो यशस्वी ठरला तर प्रचंड प्रभावी ठरतो, पण फसला तर तो सर्वाधिक घातकही ठरतो. अलिकडच्या काही राजकीय घडामोडींतून ही बाब उघडकीस आली आणि अशा प्रकारांच्या जन्माचे धागेदोरे थेट अमेरिकेतील वॉटरगेट प्रकरणाच्या आठवणींपर्यंत पोहोचले. असे तंत्र सर्वच राजकीय पक्ष आणि सत्ताकारणातील सारे मोहरे आपापल्या सोयीनुसार वापरत असतात, हे याआधी अनेकदा स्पष्ट झाले असल्याने, अलिकडच्या घडामोडी फारशा धक्कादायक आणि आश्चर्यकारक वाटण्यासारख्या नाहीत. अर्थात, त्याचे काही राजकीय व सामाजिक परिणाम अथवा दुष्परिणामही होतात. काही वेळा एखाद्या व्यक्तीलाही त्याचे परिणाम सोसावे लागतात. वॉटरगेट प्रकरणात तेच झाले होते. संवादाचा अभाव, परस्परांवरील विश्वासाचा अभाव आणि सहमतीच्या राजकारणाचा ऱ्हास ही बहुधा अशा घडामोडींमागील महत्त्वाची कारणे असू शकतात, असे ५६ वर्षांपूर्वीच्या त्या जागतिक राजकारणास हादरा देणाऱ्या घटनेनंतर अनेकांस वाटले होते. बंद दरवाजांआड होणाऱ्या बैठका ही सार्वजनिक चर्चेची बाब नसते. त्यामुळे ज्या विश्वासाने अशा बैठकांमध्ये मतांची देवाणघेवाण होते, चर्चा होते आणि रणनीती ठरविली जाते, त्या विश्वासाला अशा घडामोडींमुळे तडा जात असतो. अशा चर्चा उघड होऊ नयेत याच मुळात असलेल्या अपेक्षेस जेव्हा धक्का पोहोचतो, तेव्हा त्यामुळे कोणाला तरी त्याचे परिणाम थेट किंवा अप्रत्यक्षपणे भोगावे लागतात. राजकीय पक्षांनी जनसंपर्कासाठी नेमलेल्या यंत्रणा, माहितीचे विश्लेषण करण्याकरिता नेमण्यात आलेल्या यंत्रणा किंवा अन्य काही अदृश्य शक्तींचा अशा घडामोडींवर प्रभाव असतो, हेदेखील अलिकडे गुपित राहिलेले नाही. अपप्रचार आणि टुलकिट, फेक नॅरेटिव्हचा प्रसार ही अलिकडच्या राजकारणाची सर्वच राजकीय घटकांना वाटणारी मोठी चिंता आहे. अशा माध्यमांतून बनावट बातम्यांचे पीक फैलावले. अफवांना ऊत येतो आणि सामान्य माणसांमध्ये संभ्रम पसरतो. खरे काय आणि खोटे काय हे सामान्यांच्या आकलनापलीकडचे होऊन जाते. अनेकदा, राजकीय पक्ष आणि सामाजिक आंदोलने यांमध्ये अशा खऱ्याखोट्याची बेमालूम सरमिसळ करण्याचे प्रयत्न होतात आणि समाजाच्या विविध घटकांमध्ये परस्परांविषयी संशयाचे वातावरणही तयार होते. अशा कामांसाठी वापरल्या जाणाऱ्या फौजांविषयी आजकाल समाजमाध्यमांत चर्चा होत असते. काही वेळा ती केवळ कुजबूज असते, तर काही वेळा त्यातून अनेक गुपितांचे नवनवे धागेदेखील उघड होऊन घडामोडींमागचे वास्तव उजेडात येऊ शकते.

राजकारणात असे 'नॅरेटिव्ह सेट करणे' किंवा गुप्त बैठकांमध्ये रणनीती आखणे या बाबी नवीन नाहीत. इतिहासात आणि आधुनिक राजकारणात त्याची अनेक उदाहरणे आढळतात. वॉटरगेट प्रकरणाप्रमाणेच, सुमारे दहा वर्षांपूर्वी गाजलेले केंब्रिज अनालिटिका प्रकरण आजही चर्चिले जाते. फेसबुकसारख्या समाजमाध्यांवर सक्रिय असलेल्या कोट्यवधी वापरकर्त्यांची गोपनीय माहिती गोळा करून त्यांचे मानसशास्त्र समजून घेण्यात आले आणि त्यानुसार ब्रेक्झिट व अमेरिकेच्या अध्यक्षीय निवडणुकीत विशिष्ट विमर्श (नॅरेटिव्ह) पसरविण्याचा प्रकार घडल्याची चर्चा जगभर गाजली होती. महाराष्ट्राच्या राजकारणातही, बंद दरवाजाआड झालेल्या चर्चेचे दाखले देत काही गुपिते फोडल्याच्या आविर्भावात राजकारणास वेगळे वळण देण्याचा फसलेला एक प्रयोग अलिकडच्या काही वर्षांपूर्वी गाजला होता.

वेगवेगळी आंदोलने असोत किंवा सामाजिक प्रश्नांवरून उठणारी वादळे असोत, अशा काळात त्याला पाठिंबा देणारे किंवा विरोधाकरिता जनमत तयार करणारे विमर्श पसरविण्याचे राजकारणदेखील नवे नाही. त्यासाठी त्या आंदोलनांमध्ये, राजकारणामध्ये किंवा समाजामध्ये असणारे स्वघोषित समर्थकही सक्रिय होऊन आपापली रणनीती तयार करत असतात. आपापल्या सोयीची मतपेढी धरून ठेवण्यासाठी असे विमर्श तयार होत असल्याचे याआधीही अनेकदा स्पष्ट झाले आहे. राजकीय पक्षांनी धोरण ठरविणे किंवा रणनीती आखणे हा राजकारणाचा अविभाज्य आणि अपरिहार्य भाग असतो. तो किती खरा, किती खोटा हे ठरविण्याचे तारतम्य वापरून संभ्रमित न होता त्याकडे जागरूकतेने पाहणे ही सामान्य जनतेची जबाबदारी असते. आजकाल उपलब्ध असणारे फॅक्ट चेक नावाचे एक साधनही त्यासाठी मदतीला येऊ शकते. कारण, अशा घडामोडी कधीही जाहीरपणे घडत नसतात. पडद्यामागच्या घडामोडींच्या सत्यतेवर नेहमीच प्रश्नचिन्हे उमटवावीच लागतात. त्यामुळे, सत्यता तपासण्याच्या सर्व निकषांवर त्या घडामोडी घासूनपुसून घेणे गरजेचेही असते. ■

dineshgune@gmail.com

रविवारची पत्रे

## बस्तरची शोधयात्रा

**'बस्तरची शोधयात्रा' या माहितीपटाची निर्मिती छत्तीसगड-बस्तरमध्ये दंतेवाडा जिल्ह्यात कार्यरत असणाऱ्या बनफूल जनकल्याण समिती यांच्यातर्फे नुकतीच करण्यात आलेली आहे. या माहितीपटाचे लोकार्पण पुण्यात रविवार, २५ ऑक्टोबर रोजी होणार आहे....**

नक्षलवादाच्या छायेतील छत्तीसगडमधील दंतेवाडा परिसरात दोन तपांहून अधिककाळ वैद्यकीय सेवाकार्य करणे हे फार मोठे अवघड व आव्हानात्मक कार्य आहे. सर्वसामान्य व्यक्तीच्या कल्पनेच्या आवाक्यापलीकडचे असलेले हे काम महाराष्ट्रातील डॉ. राम व सुनीता गोडबोले हे दाम्पत्य अत्यंत चिवटपणे करीत आहेत. सुनीताताई या मूळच्या पुण्याच्या तर डॉ. राम गोडबोले हे साताराचे. कमालीच्या शांतपणे व निरलसपणे चालणारे यांचे हे काम प्रसिद्धीपरांगमुखतेमुळे महाराष्ट्रालाच काहीसे अपरिचित राहिलेले होते. या दाम्पत्याला यंदाचा 'पद्मश्री पुरस्कार' (वैद्यकीय सेवा) नुकताच प्रदान करण्यात आला. लोकांच्या मनात बस्तर या परिसराविषयी कमालीचे कुतूहल जागृत झाले. बस्तरचे प्रश्न व एकूणच तेथील आदिवासींचे भावविश्व माहितीपत्र-चित्रफितीच्या माध्यमातून लोकांपुढे आणण्याचा चंग बनफूल परिवाराचे पुण्यातील कार्यकर्ते महेश भुस्कुटे यांनी बांधला. सुमारे दोन वर्षांच्या अथक परिश्रमानंतर हे काम पूर्णत्वास गेले आहे. या माहितीपटाच्या दिग्दर्शिका विनिता अनगळ यांनी बस्तरमधील वनवासींच्या प्रश्नांची मांडणी, त्याची कारणमीमांसा करत आदिवासींचे भावविश्व हळुवारपणे उलगडत नेले आहे. माहितीपटाचे लोकार्पण रा. स्व. संघाचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य व ज्येष्ठ कार्यकर्ते भय्याजी जोशी यांच्या हस्ते स. प. महाविद्यालयाच्या लेडी रमाबाई सभागृहात रविवारी (२५ ऑक्टोबर) होत आहे.

एकेकाळी मध्यप्रदेशचा भाग असलेला तत्कालीन बस्तर जिल्हा हा देशभरातील अत्यंत मागास जिल्ह्यांपैकी एक म्हणून ओळखला जात असे. तेथील आदिम आदिवासी जनजाती राहात असलेल्या अबुजमाडसारख्या प्रदेशात त्या काळी कलेक्टरच्या रितसर परवानगीशिवाय प्रवेश मिळत नसे. बस्तरच्या दंडकारण्यातला आदिवासी समाज हा अत्यंत पारंपारिक, आपल्या चालीरीतींना कवटाळून बसणारा व भौतिकदृष्ट्या अतिमागास आहे. येथील आदिवासी हा नुसता आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागास नसून त्यापैकी बहुतेक कुटुंबाचे अर्थकारण हे अत्यंत हलाखीचे व जेमतेम असते. अंधश्रद्धा व आत्यंतिक रूढी परंपरावादी दृष्टिकोन यामुळे या आदिवासींवर आधुनिक उपचार करणेही कमालीचे आव्हानात्मक होऊन बसते. बदल व प्रागतिक दृष्टिकोन स्वीकारण्यास ते सहजी राजी होत नाहीत. अशावेळी वैद्यकीय सेवेचे महत्त्व मोठे होते. गंभीर आजारांच्या उपचाराबाबत पुनःपुन्हा नियमितपणे पाठपुरावा करणे हेही अत्यंत जिकिरीचे काम असते. बस्तरमधील आदिवासींचे शोषण, मलेरिया, माता व बालकांचे कुपोषण, भ्रष्टाचार, सन्मान नसणे, दुय्यम नागरिकत्वाची वागणूक मिळणे हे प्रमुख प्रश्न आहेत. या सर्वांकडे शहरी समाजाचे झालेले दुर्लक्ष कारणीभूत आहे. यातून मग एखादा आदिवासी माणूस बंदूक उचलायला राजी होतो म्हणून वर्तमानकाळात तरी आपण या समाजाच्या उत्थानासाठी विशेषत्वाने प्रयत्न केले पाहिजेत, हे गोडबोले दाम्पत्याचे म्हणणे पटणारे आहे. 'सरकार आणि सुरक्षा दलांच्या मोहिमांमुळे नक्षलवादी संपतील, पण नक्षलवादाचे काय? तो मुळापासून संपण्यासाठी आपल्यालाच काम करावे लागेल. स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव नसलेल्या या जनजाती समाजात आत्मभान येण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतील' हे सुनीताताईंचे म्हणणे विचार करायला लावणारे आहे. बस्तरमधील प्रश्नांमधून उलगडत जाणारी ही शोधयात्रा उत्तरात परिवर्तित होण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज आहे.

**विवेक गिरीधारी**/९४२२२३१९६७

■■■

## पदरापासून पासवर्डपर्यंत!

१९९० चे दशक भारतीय समाजाच्या परिवर्तनाचा महत्त्वाचा टप्पा ठरले. उदारीकरणामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेत बदल घडत असतानाच भारतीय स्त्रीच्या आयुष्यातही नव्या शक्यतांची दारे उघडू लागली. घर, संसार आणि कुटुंब यांच्याभोवती केंद्रित असलेल्या तिच्या विश्वाची व्याप्ती वाढू लागली. घरातील कपाटाची चावी सांभाळण्यापासून डिजिटल जगातील पासवर्ड सांभाळण्यापर्यंतचा तिचा प्रवास हा केवळ तंत्रज्ञानाचा नसून आत्मविश्वास, शिक्षण आणि स्वावलंबनाचा प्रवास आहे. एकेकाळी पदर हा भारतीय स्त्रीच्या संस्कारांचा, जबाबदारीचा आणि कौटुंबिक भूमिकेचा प्रतीक मानला जायचा. आईच्या पदराला धरून शाळेत जाणाऱ्या मुलीसमोर मोठे होताना अनेक सामाजिक चौकटी असायच्या. शिक्षण घ्यायचे, पण किती पुढे जायचे? नोकरी करायची, पण घर सांभाळूनच! स्वप्ने पाहायची, पण समाजाच्या अपेक्षा आणि परिस्थितीच्या मर्यादा लक्षात घेऊन! अशा वातावरणातही अनेक महिलांनी स्वतःच्या कर्तृत्वाने या चौकटी ओलांडण्यास सुरुवात केली.

९० च्या दशकानंतर मुलींच्या शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलू लागला. महाविद्यालयीन शिक्षण, संगणक, व्यवस्थापन, वैद्यकीय आणि अभियांत्रिकी क्षेत्रांत मुलींचा सहभाग वाढला. आर्थिक स्वावलंबन हे केवळ उत्पन्नाचे साधन न राहता आत्मविश्वास, निर्णयस्वातंत्र्य आणि स्वतंत्र ओळखीचा आधार बनले. महिलांनी आपल्या कर्तृत्वातून घराची जबाबदारी सांभाळतानाच समाजाच्या प्रगतीतही महत्त्वाचे योगदान दिले. त्यानंतर मोबाईल आणि इंटरनेटच्या युगाने या प्रवासाला नवी दिशा दिली. ज्या हातांनी घरासाठी भाजीची यादी लिहिली, त्याच हातांनी ऑनलाईन व्यवहार, डिजिटल शिक्षण आणि व्यवसाय हाताळायला सुरुवात केली. पूर्वी प्रामुख्याने आई, पत्नी किंवा सून म्हणून ओळखल्या जाणाऱ्या स्त्रीने डॉक्टर, अभियंता, प्राध्यापक, पोलिस अधिकारी, उद्योजिका, पत्रकार, शेतकरी, पायलट, वैज्ञानिक आणि प्रशासकीय अधिकारी म्हणून स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली. या परिवर्तनात ग्रामीण आणि निमशहरी भागांतील महिलांचे योगदानही तितकेच महत्त्वाचे आहे. बचत गट, लघुउद्योग, शेतीपूरक व्यवसाय आणि ऑनलाईन बाजारपेठ यांच्या माध्यमातून महिलांनी आर्थिक निर्णयप्रक्रियेत आपले स्थान निर्माण केले. मोबाईलच्या एका स्क्रीनने त्यांच्यासाठी माहिती, संवाद आणि व्यवसायाच्या नव्या संधी उपलब्ध करून दिल्या. आजची स्त्री केवळ बदल स्वीकारत नाही, तर बदल घडवते आहे. ती घर आणि करीअर यांच्यात समतोल साधते, स्वतःचे निर्णय घेते, आर्थिक नियोजन करते आणि पुढील पिढीला समान संधी मिळाव्यात यासाठी प्रयत्नशील असते. मात्र, सुरक्षितता, समान वेतन, शिक्षणाच्या समान संधी, कामाच्या ठिकाणी समानता आणि सामाजिक पूर्वग्रह यांसारखी आव्हाने अद्याप कायम आहेत. त्यामुळे स्त्री-सक्षमीकरणाचा प्रवास अजूनही सुरू आहे. गेल्या तीन दशकांकडे पाहिले तर परिवर्तनाची दिशा स्पष्ट होते. पदर अजूनही आहे; त्याचबरोबर पासवर्डही आहे. परंपरेशी नाते जपत आधुनिकतेचा स्वीकार करणारी भारतीय स्त्री आपल्या अस्तित्वाची नवी व्याख्या लिहीत आहे.

'पदरापासून पासवर्डपर्यंत' हा प्रवास केवळ काळानुसार बदललेल्या जीवनशैलीचा नाही, तर स्वतःच्या क्षमतेची जाणीव झालेल्या, स्वप्नांना दिशा देणाऱ्या आणि स्वतःच्या कर्तृत्वाने समाज बदलणाऱ्या भारतीय स्त्रीच्या आत्मविश्वासाचा प्रवास आहे. तिची ही कहाणी केवळ परिवर्तनाची नाही, तर पुढील पिढ्यांना नवी क्षितिजे खुली करून देणाऱ्या एका समर्थ पिढीची प्रेरणादायी गाथा आहे. ■

**धनश्री विवेक ठाकरे**/७५१७७९९०५७

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/






# सोलापुरात भीम-धम्म गीतांनी रंगली 'धम्म पहाट'

## पारमिता फाउंडेशनच्या उपक्रमास रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ ऑक्टोबर-**

तथागत भगवान गौतम बुद्धांच्या करुणा, मैत्री, शांती आणि प्रज्ञेचा संदेश देणाऱ्या भीम व बुद्धगीतांच्या सुरांनी डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात मंगलमय वातावरण निर्माण झाले. ७० व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त पारमिता फाउंडेशनच्या वतीने आयोजित 'धम्म पहाट' या अनुपम धर्मांतर सोहळ्यात विविध गायकांनी सादर केलेल्या गीतांनी रसिकांची मने जिंकली.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून राज्य राखीव पोलीस गट क्रमांक १, सोलापूरच्या समादेशक डॉ. दीपाली काळे उपस्थित होत्या. प्रारंभी भंते सुमेधजी नागसेन यांनी उपस्थितांना त्रिशरण, पंचशील आणि धम्मदेसना दिली. सोलापूर शहरात प्रथमच आयोजित या कार्यक्रमाची संकल्पना ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते दत्ता गायकवाड यांची होती. कार्यक्रमाचे संयोजक सुधीर चंदनशिवे आणि पारमिता फाउंडेशनच्या सदस्या प्रा. डॉ. वनिता चंदनशिवे यांच्या हस्ते पाहुणे व गायक कलावंतांचे पुष्पगुच्छ, पंचशील उपरणे आणि 'चैतन्याचे प्रणेते' हा ग्रंथ देऊन स्वागत करण्यात आले.

सुनिता गायकवाड यांनी 'प्रथम नमो गौतमा' या गीताने कार्यक्रमाची सुरुवात केली. युवा गायक राजगंधर्व सदाफुले यांनी पहाडी आवाजात 'कबीरा कहे ये जग अंधा' आणि 'जगात गाजा वाजा भीमराव एकच राजा' ही गीते सादर करून प्रेक्षकांची दाद मिळवली. प्रा. शंकर खळसोडे यांच्या 'चंद्र तारे झोपी गेले' या गीताने रसिकांना भावुक केले. वर्षा सोनवले यांनी 'तुम्ही खाता त्या भाकरीवर बाबासाहेबांची सही हाय रं' हे गीत सादर करताच प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

सुप्रिया माने यांनी 'पहा पहा मंजुळा हा भिमरायाचा मळा' हे गीत गोड आवाजात सादर केले, तर सुनंदा शेंडगे यांनी 'हे खरंच आहे खरं भीमराव रामजी आंबेडकर' हे गीत गायले. रमेश माळशिकारे यांनी भारदस्त आवाजात 'तथागतांच्या चरणावरती विजयादशमी दिनी' हे गीत सादर करून धम्मचक्र प्रवर्तन दिनाचा सोहळा सुरेल स्वरांत उभा केला.महेश कांबळे (ढोलकी), यश वाघमारे (ढोलक), राजकुमार सावळगी (सिंथेसायझर) आणि अभिषेक दनाने (ऑक्टोपॅड) यांनी संगीताची साथ देत कार्यक्रमाची रंगत वाढवली. कार्यक्रमाचे ओघवते निवेदन प्रा. डॉ. अंजना गायकवाड यांनी केले. संगीत संयोजनाची जबाबदारी प्रा. शंकर खळसोडे यांनी सांभाळली. शेवटी प्रा. डॉ. वनिता चंदनशिवे यांनी आभार मानले.

यावेळी ज्येष्ठ साहित्यिक योगीराज वाघमारे, प्रा. डॉ. एम. डी. शिंदे, सेवानिवृत्त अधिकारी अनिल विपत, प्रा. डॉ. रेखा ओव्हाळ, डॉ. धम्मपाल माशाळकर, मधुकर आठवले, सुमेध डोलारे, अण्णासाहेब भालशंकर, धम्मरक्षीता कांबळे, सूर्यमनी गायकवाड, अशोक आगावणे, शिवपुत्र घटकांबळे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

# जिल्ह्यात साडेतीन लाख सदस्यांची ई-केवायसी अपूर्ण

## जिल्हा पुरवठा अधिकारी ओंकार पडोळे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ ऑक्टोबर-**

जिल्ह्यातील ई-केवायसी प्रगती अहवालानुसार, १९ ऑक्टोबरपर्यंत ई-केवायसी पूर्णत्वाचे प्रमाण ८०.४७ टक्के झाले आहे. १५ ऑक्टोबर रोजी हे प्रमाण ८०.३४ टक्के होते. चार दिवसांत ई-केवायसी पूर्णत्वाच्या प्रमाणात ०.१३ टक्क्यांची वाढ झाली आहे. जिल्ह्यातील ११ तालुक्यांमध्ये एकूण १७ लाख ७९ हजार ८१५ आधार संलग्न सदस्य असून, त्यापैकी १० लाख ४४ हजार ०६६ सदस्यांची ई-केवायसी पूर्ण झाली आहे. जिल्ह्यात अद्याप ३ लाख ४७ हजार ५११ सदस्यांची ई-केवायसी पूर्ण झालेली नाही. अशी माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी ओंकार पडोळे यांनी दिली आहे.

ई-केवायसी प्रक्रियेत सांगोला तालुक्याचे प्रमाण सर्वाधिक ८५.६२ टक्के आहे. त्यानंतर पंढरपूर तालुक्यात ८२.६४ टक्के, माढा तालुक्यात ८२.२० टक्के, उत्तर सोलापूर तालुक्यात ८१.११ टक्के आणि अक्कलकोट तालुक्यात ८०.५९ टक्के ई-केवायसी पूर्ण झाली आहे. करमाळा तालुक्यात ८०.४६ टक्के, दक्षिण सोलापूरमध्ये ७९.४३ टक्के, मंगळवेढा तालुक्यात ७९.१२ टक्के, माळशिरस तालुक्यात ७८.५६ टक्के, मोहोळ तालुक्यात ७८.३८ टक्के आणि बार्शी तालुक्यात ७७.९६ टक्के ई-केवायसी पूर्णत्वाची नोंद आहे. एकूण आधार संलग्न सदस्यांच्या तुलनेत हे प्रमाण १९.५३ टक्के आहे. तालुकानिहाय अपूर्ण ई-केवायसीमध्ये माळशिरस तालुक्यात सर्वाधिक ५८ हजार ६०२ सदस्य, बार्शी तालुक्यात ४८ हजार ४९४, माढा तालुक्यात ३४ हजार ११४, पंढरपूर तालुक्यात ३१ हजार ३५८ आणि दक्षिण सोलापूर तालुक्यात ३१ हजार १५१ सदस्यांचा समावेश आहे.

ई-केवायसी प्रक्रियेत काही तालुक्यांमध्ये सुधारणा दिसून येत असली, तरी जिल्ह्याचे एकूण प्रमाण अद्याप ८१ टक्क्यांच्या खाली आहे.

त्यामुळे उर्वरित पात्र सदस्यांची ई-केवायसी पूर्ण करण्यासाठी तालुकानिहाय प्रगतीचा आढावा घेणे आणि प्रलंबित प्रकरणे निकाली काढणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### सांगोला आघाडीवर, बार्शी शेवटी

१९ ऑक्टोबरच्या अहवालानुसार सांगोला तालुका ८५.६२ टक्क्यांसह प्रथम क्रमांकावर, तर बार्शी तालुका ७७.९६ टक्क्यांसह शेवटच्या क्रमांकावर आहे. जिल्ह्याची एकूण प्रगती ८०.४७ टक्के असून, १९.५३ टक्के सदस्यांची ई-केवायसी अद्याप अपूर्ण आहे.







# वाचनातून व्यक्तिमत्त्व समृध्द होते : डॉ. संदीप लोखंडे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ ऑक्टोबर-**

भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ आणि मिसाईल मॅन डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स येथे वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. संदीप लोखंडे यांनी विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व विशद करत नियमित वाचनातून ज्ञान, विचारशक्ती आणि व्यक्तिमत्त्वाचा विकास कसा साधता येतो, याविषयी मार्गदर्शन केले.

उपप्राचार्य प्रा. बी. आर. पाटील यांनी वाचनामुळे आपले जीवन कसे समृद्ध झाले, याविषयी अनुभव कथन केले. प्रा. प्रशांत खोत यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन महाविद्यालयाचे समन्वयक प्रा. अजित देवसाळे यांनी केले. या कार्यक्रमाला प्रा. डॉ. मीनल पांढरे, प्रा. रश्मी शहा यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. प्राचार्य डॉ. सत्यजित शहा यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

# कृषि विज्ञान केंद्र व राष्ट्रीय डाळींब संशोधन केंद्रातर्फे महिला किसान दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, २४ ऑक्टोबर-**

का. प्र. शबरी कृषि प्रतिष्ठान सोलापूर संचलित कृषि विज्ञान केंद्र व राष्ट्रीय डाळींब संशोधन केंद्रातर्फे महिला किसान दिन आरळी (ता. अक्कलकोट) येथे साजरा करण्यात आला.



यावेळी कृषि विज्ञान केंद्राचे वरीष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख डॉ. लालासाहेब तांबडे अध्यक्षस्थानी होते. यावेली राष्ट्रीय डाळींब संशोधन केंद्राच्या प्रधान शास्त्रज्ञा डॉ. पींकी रायगोंड, डॉ. शिल्पा परशूराम, डॉ. नम्रता गीरी, कृषि विज्ञान केंद्राचे प्र. अ. गोंजारी विषय विशेषज्ञ, अमोल शास्त्री, विषय विशेषज्ञ समाधान जवळगे, विषय विशेषज्ञ, रोहित लंगोटे तांत्रिक सहाय्यक उपस्थित होते.

अध्यक्षीय मार्गदर्शनात बोलताना डॉ. ला. रा. तांबडे यांनी शेती क्षेत्रात महिलांचा निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढविण्यासाठी त्यांच्या तांत्रिक ज्ञानात भर पडण्यासाठी यंदाची सोयाबीन पिकाचे समुह आद्यरेखा प्रात्यक्षिक लाभार्थी म्हणून महिलांना प्राधान्य देण्यात आले आहे. जेणेकरून त्यांना पिक उत्पादनात महत्वाचे बारकावे समजावेत. डॉ. नम्रता गिरी यांनी अन्नप्रक्रियेमध्ये असणाऱ्या संधी महिलांना आर्थिक सक्षम करतील त्यासाठी महिलांनी पूढाकार घ्यावा असे प्रतिपादन केले.

प्रदिप गोंजारी यांनी प्रास्ताविक केले. यावेळी दृष्काळ परिस्थितीत सोयाबीन, तूर पिकाची योग्य पध्दतीने नियोजन करणाऱ्या कृषि उद्योजीका, जीजाई नॅनो सेंद्रिय परसबाग करणार्या महिलांचा सन्मानही करण्यात आला. यामध्ये कोंडाबाई काळे, आयेशा कालेखान, उषा गाडेकर, पुष्पावती बिराजदार, अमुरुद पठाण, सुप्रिया गायकवाड इत्यादी महिलांचा समावेश होता. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन विषय विशेषज्ञ अमोल शास्त्री यांनी केले.

# लोकमंगल कॉलेजेस्‌मध्ये ३ दिवसीय आयात-निर्यात कार्यशाळेचा समारोप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ ऑक्टोबर-**

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कॉलेजेस, वडाळा आणि पुणे येथील 'ईआयएफटी' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'आयात-निर्यात' विषयावरील तीन दिवसीय विशेष कार्यशाळेचा समारोप आणि प्रमाणपत्र वितरण सोहळा महाविद्यालयाच्या मुख्य सभागृहात अत्यंत उत्साही वातावरणात संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा आमदार सुभाष देशमुख यांनी भूषवले. या सोहळ्यासाठी प्रमुख अतिथी म्हणून 'ईआयएफटी' कंपनीचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी (उएज) करण मुथा, इन्स्टिट्यूशनल रिलेशन अँड स्ट्रॅटेजिक अलायन्सेसच्या बिझनेस डेव्हलपमेंट असोसिएट सौ. स्मिता सावंत, पुणे 'ईआयएफटी'चे महाव्यवस्थापक निलेश पांचाळ आणि प्रसिद्ध महिला उद्योजिका कृती गुंडेवार उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात लोकमंगल कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सचिन फुगे यांच्या प्रास्ताविकाने झाली. कार्यक्रमाच्या पुढील सत्रात तीन दिवसीय कार्यशाळेत प्रत्यक्ष सहभागी झालेल्या प्रशिक्षणार्थींनी आपले मनोगत व्यक्त केले. यामध्ये सुचित साळुंखे, श्रुती वीर, उदय पाटील आणि किरणकुमार हाके या प्रशिक्षणार्थींनी आपले अनुभव सांगताना ही कार्यशाळा त्यांच्या व्यावसायिक भविष्यासाठी अत्यंत दिशादर्शक ठरल्याची भावना व्यक्त केली. यानंतर प्रमाणपत्र वितरण सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते कार्यशाळा यशस्वीरीत्या पूर्ण करणाऱ्या सर्व ३५ सहभागी प्रशिक्षणार्थींना अधिकृत प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. आमदार सुभाष बापू देशमुख यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतातून विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. अजित कुरे यांनी केले.






# कुटुंब वात्सल्य मेळावा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर-**

हॅलो मेडिकल फाउंडेशन अणदूर व सोलापूर मनपा यांच्या संयुक्त विद्यमाने व अलायव्हस लाईफ सायन्सेसच्या सहयोगाने कुटुंब वात्सल्य मेळावा व अति जोखमीच्या गरोदर मातांचे मोफत आरोग्य शिबिर उत्साहात संपन्न झाले. यात १३५ सदस्य व ६० गरोदर माता उपस्थिती होत्या.

हुडको कॉलिनी कुमठा नाका समाज मंदिर येथे याचे उद्घाटन डॉ. मंजिरी कुलकर्णी, डॉ. समन तांबोळी, डॉ. मेहजबीन उल हक, डॉ. फिरदोस सय्यद यांच्या उपस्थितीत झाले. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. प्रकल्प समन्वयक जावेद शेख यांनी प्रास्ताविक केले. या कार्यक्रमामध्ये मोफत रक्त तपासणी व औषधे गोळ्या देण्यात आले. ही कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नागेश इंगळे समाज मंदिरचे संस्थापक, जकप्पा कांबळे व संपूर्ण प्रकल्पातील सुपरवायझर पल्लवी भातलवंडे, कविता बनसोडे, प्रियांका कांबळे, प्रतिभा रच्चा, वंदना एकबोटे, दिनकर गाडवे, बालाजी जाधव, कविता राठोड, लक्ष्मी दुपारगुडे, म्हाळप्पा गळाकाटे यांनी परिश्रम घेतले.

# अशासकीय सदस्य नियुक्तीसाठी १५ नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ

### जिल्हा प्राणी क्लेष प्रतिबंधक सोसायटी व्यवस्थापकीय समितीसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर-**

जिल्हा प्राणी क्लेष प्रतिबंधक सोसायटीच्या (एसपीसीए) व्यवस्थापकीय समितीवरील १० ते ११ अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यात येणार आहे. या नियुक्तीसाठी जिल्ह्यातील चार क्षेत्रांतील इच्छुक व्यक्तींना अर्ज करता येणार आहे. यामध्ये जिल्ह्यातील गोशाळा किंवा पांजरापोळ संस्थांपैकी एका संस्थेचे अध्यक्ष, प्राणी कल्याणविषयक कार्य करणाऱ्या सेवाभावी संस्थेचे दोन सदस्य, एसपीसीए शासन सदस्य सर्वसाधारण समितीने नामनिर्देशित केलेल्या दोन व्यक्ती, तसेच प्राणी कल्याणासाठी कार्य करणारे मानवहितकारक उपक्रमांतील पाच ते सहा कार्यकर्ते यांचा समावेश आहे. इच्छुकांनी आपले अर्ज जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय कार्यालय, नेहरूनगर, विजापूर रोड, सोलापूर - ४१३००४ येथे डॉ. डी. ए. गिडे (९३०९१३१६४७) यांच्याकडे कार्यालयीन वेळेत दि. १५ नोव्हेंबर २०२६ पर्यंत पाठवावेत, असे आवाहन जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय तथा एसपीसीएचे सदस्य सचिव डॉ. अनिल तांबे यांनी केले आहे.

# कायदेशीर दत्तक प्रक्रियेतून बालकाला मिळाले हक्काचे घर

## जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्या हस्ते बालक हस्तांतरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर-**

अनाथ, निराधार तसेच काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांना सुरक्षित, प्रेमळ आणि हक्काचे कुटुंब मिळावे, यासाठी दत्तक विधानाची प्रक्रिया कायदेशीर मार्गाने पूर्ण करणे आवश्यक आहे. याच अनुषंगाने सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयात कायदेशीर दत्तक विधानाची प्रक्रिया पार पडली. या प्रक्रियेद्वारे एका बालकाला हक्काचे घर मिळाले. जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्या हस्ते बालक हस्तांतरण व प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.

जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयांतर्गत जिल्हा बाल संरक्षण कक्षाच्या वतीने दत्तक विधान प्रक्रियेबाबत जनजागृती करण्यात येत आहे. दत्तक प्रक्रियेमध्ये बालकाचे सर्वोत्तम हित, सुरक्षितता आणि उज्वल भविष्य यांना प्राधान्य दिले जाते. बालकाला कुटुंबाचा आधार, प्रेम आणि सुरक्षित वातावरण मिळावे, हा या प्रक्रियेचा मुख्य उद्देश आहे.



यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी इच्छुक दत्तक पालकांनी शासनाच्या अधिकृत केंद्रीय दत्तक संसाधन प्राधिकरणाच्या (सीएआरए) माध्यमातून नोंदणी करून विहित कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन केले. दत्तक घेऊ इच्छिणाऱ्या पात्र दाम्पत्यांनी तसेच नियमानुसार पात्र अविवाहित व्यक्तींनी अधिकृत संकेतस्थळावर नोंदणी करणे, आवश्यक कागदपत्रे सादर करणे, गृहअभ्यास अहवालाची प्रक्रिया पूर्ण करणे, बालकाचे नियमानुसार संदर्भीकरण करून कायदेशीर दत्तक आदेशाची प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे.

बालकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अनधिकृत मार्गाने दत्तक प्रक्रिया करणे टाळावे. शासनाच्या अधिकृत यंत्रणेमार्फतच दत्तक प्रक्रिया पूर्ण करून बालकांना कायदेशीर संरक्षण आणि कुटुंबाचा आधार मिळवून द्यावा, असे आवाहनही यावेळी करण्यात आले. या वेळी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी अविनाश मगर, जिल्हा परिविक्षा अधिकारी वैशाली भोसले, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी नितीन थोरात, चाइल्डलाइन समन्वयक आनंद ढेपे, समुपदेशक मल्लिनाथ तमशेट्टी, पर्यवेक्षक विश्वेश्वर वाघमारे, अनोज कदम, नवरंगे बालकाश्रमच्या अधीक्षक राजश्री गाडे तसेच दत्तक पालक उपस्थित होते.

# सेवा संकल्प अभियानातून वागदरी आरोग्य केंद्राच्या कामकाजाची झाडाझडती

## दर्जेदार सेवांबद्दल जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांकडून समाधान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ ऑक्टोबर-**

ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आणि वेळेत आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी, तसेच शासकीय आरोग्य योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचावा, या उद्देशाने राबविण्यात येत असलेल्या 'सेवा संकल्प अभियानांतर्गत' वागदरी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची पाहणी करण्यात आली. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपूरवाड यांनी आपल्या पथकासह आरोग्य केंद्राला भेट देऊन विविध सेवांचा आढावा घेतला.

या भेटीदरम्यान आरोग्य केंद्रामार्फत रुग्णांना पुरविण्यात येणाऱ्या वैद्यकीय सुविधा, औषधांचा पुरवठा, परिसरातील स्वच्छता आणि शासनाच्या विविध आरोग्यविषयक योजनांची अंमलबजावणी यांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. ग्रामीण आरोग्य व्यवस्थेतील महत्त्वाचा दुवा असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्राचे कामकाज अधिक प्रभावी राहावे आणि नागरिकांना स्थानिक पातळीवरच आवश्यक वैद्यकीय सुविधा मिळाव्यात, या दृष्टीने पाहणीला महत्त्व प्राप्त झाले.



तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. अश्विन करजखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या कामकाजाबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कोपूरवाड यांनी समाधान व्यक्त केले. आरोग्य केंद्रातील स्वच्छता, रुग्णांना दिल्या जाणाऱ्या सेवा आणि एकूण व्यवस्थापनाबाबत त्यांनी सकारात्मक भूमिका मांडत वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कामाचे कौतुक केले.आरोग्य केंद्राच्या कामकाजाबद्दल समाधान व्यक्त करत जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी संबंधित वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी आणि संपूर्ण पथकाचे कौतुक केले. ग्रामीण भागातील नागरिकांना अधिक दर्जेदार आरोग्यसेवा देण्यासाठी आरोग्य यंत्रणेतील समन्वय आणि कार्यक्षमतेला या भेटीमुळे महत्त्व प्राप्त झाले.

यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्र वागदरीचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सय्यद अतिक आणि डॉ. दशवंत अनुजा यांच्यासह अधिकारी, कर्मचारी व आशा स्वयंसेविका उपस्थित होत्या.

### ग्रामीण आरोग्यसेवेचा दर्जा उंचावण्यावर भर

शासकीय आरोग्य यंत्रणेच्या कामकाजात प्रत्यक्ष पाहणी, सेवा-सुविधांचे मूल्यमापन आणि कर्मचाऱ्यांच्या कामाची दखल यांना महत्त्व आहे. 'सेवा संकल्प अभियान' हे केवळ तपासणीपुरते मर्यादित न राहता आरोग्यसेवेतील गुणवत्ता, उपलब्ध सुविधा आणि नागरिकांचा सेवांवरील विश्वास वाढविण्यासाठी उपयुक्त ठरू शकते. वागदरी आरोग्य केंद्राच्या पाहणीच्या निमित्ताने ग्रामीण भागातील आरोग्यसेवा अधिक सक्षम करण्याच्या प्रयत्नांना अधोरेखित करण्यात आले.

**मध्य रेल्वे**
**सोलापुर मंडळ**
**विद्युत कर्षण वितरण कार्य**

वरिष्ठ विभागीय इलेक्ट्रिकल अभियंता (टीआरडी), मध्य रेल्वे, सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्यातर्फे, रेल्वेच्या ई-प्रोक्युरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक इलेक्ट्रिकल कंत्राटदारांकडून खालील कामासाठी ऑनलाइन ई-निविदा मागवत आहेत. निविदा पद्धत: दोन पाकीट पद्धत निविदा क्र.: SUR/TD/T/2026/17R कामाचे नाव: मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील दौंड-वाडी विभागामध्ये 96 फायबर ओपीजीडब्ल्यू एईसी कंडक्टरची तरतूद करणे (पुन्हा निविदा आमंत्रण) अंदाजित खर्च: 27,27,46,901.11/- इसारा अनामत रक्कम : 54,54,900/- काम पूर्ण करण्याचा कालावधी : 24 महिने प्रस्तावाची वैधता: 90 दिवस वेबसाइटवर निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ: १८.११.२०२६ रोजी १५:०० वाजता

**व.वि.वि.इं. (क.वि.)**

धोकादायक आणि स्फोटक वस्तू घेऊन प्रवास करणे हा दंडनीय गुन्हा आहे. 45

**खरेदीपुर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः सोलापूर येथील रहिवाशांना या खरेदीपुर्व जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन:-** डि ाा व सब डि ाा सोलापूर पैकी तालुका दक्षिण सोलापूर पैकी मौजे कुंभारी येथील गट क्र.५६३ (२/४) ५ पैकी कनकंटला नगर येथील प्लॉट क्र.१ यांचे ११८.९६ चौ.मी. व प्लॉट क्र.२ यांसी क्षेत्र १४८.६८ चौ.मी. असे एकूण दोन्ही प्लॉटचे क्षेत्र एकत्रित क्षेत्रफळ २६७.६४ चौ.मी. म्हणजेच २८८० चौ. फुट. यासी प्लॉट क्र.१ ची चतु:सिमा- पूर्वेस- १५ फुट रस्ता, दक्षिणेस- प्लॉट क्र.२, पश्चिमेस- प्लॉट क्र.२२ व उत्तरेस- ३० फुटी रस्ता व प्लॉट क्र.२ ची चतुः सिमा पूर्वेस : १५ फुट रस्ता, दक्षिणेस : प्लॉट क्र.३, पश्चिमेस : प्लॉट क्र.२१, उत्तरेस : प्लॉट क्र.१

येणेप्रमाणे वर नमूद मिळकत ही **श्री. धनराज राजशेखर बारोळे** यांचे मालकी व कब्जेवहिवाटीची आहे. सदरहु मालकांनी सदरहु मिळकत आमचे अशिलांना खरेदी देण्याचे ठरविले आहे. तसेच सदरहु मालकांनी सदरहु मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याची हमी व खात्री आमचे अशिलांस दिलेली आहे. त्यापोटी आमचे अशिलांकडून इसारापोटी रक्कमही स्विकारलेला आहे.

तरी परंतु सदर मिळकतीवर अन्य कोणाचा हक्क, दावा, लिज, गहाण, दान, बक्षीस, पोटगी, खरेदी-विक्री व इतर स्वरुपाचे करार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांच्या आत आपले हक्काचे व अधिकाराचे लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्यावर आणून देऊन खात्री करुन घ्यावी. जर मुदतीत कोणाची हरकत न आल्यास सदरील शेतजमीन ही निर्वेध व निजोखमी आहे असे समजून आमचे आमचे अशिलांनी सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. तद्‌नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस दिली. ता. २४/१०/२०२६.

सही/-
**ॲड. प्रियंका शिवानंद होरगिनमठ**
बी.ए., एलएल.बी.
रा. १९-क, भवानी पेठ, जम्मा चाळ, सोलापूर.
मो.नं. ९७६६६३१४४९

# तिलकचे अर्धशतक; भारताचा विजय

## न्यूझीलंडवर चार गड्यांनी मात

**क्राइस्टचर्च, २४ ऑक्टोबर**

शनिवारी येथे झालेल्या एका थरारक दुसऱ्या टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात भारताने न्यूझीलंडचा ४ गडी राखून पराभव केला. या विजयासह भारताने पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत २-० अशी आघाडी घेतली आहे. या सामन्यात तिलक वर्माने अवघ्या २६ चेंडूंत नाबाद ५१ धावांची खेळी करत भारताच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. १८० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, एका टप्प्यावर भारताची अवस्था ५ बाद ७० धावा अशी, तर १५ व्या षटकापर्यंत ६ बाद ११२ धावा अशी बिकट झाली होती. मात्र, तिलक वर्माने सामन्याचे पारडे फिरवत २६ चेंडूंत सहा चौकार व एका षट्कारसह नाबाद ५१ धावा केल्या व संघाला विजयापर्यंत पोहोचवले. भारताने हा विजय शेवटच्या चेंडूवर साकारला.

प्रथम फलंदाजी करताना न्यूझीलंडने २० षटकांत ५ बाद १८० धावा उभारल्या व भारतासमोर विजयासाठी १८१ धावांचे लक्ष्य ठेवले. या आव्हानात्मक परिस्थितीत नितीश कुमार रेड्डीने तिलक वर्माला उत्तम साथ दिली. नितीशकुमारने १३ चेंडूत नाबाद २६ धावा केल्या. या दोघांनी आक्रमक प्रत्युत्तर देत १८१ धावांचे लक्ष्य गाठले.

सातव्या गड्यासाठी त्यांच्यात झालेली अभेद्य भागीदारी सामन्याचे पारडे फिरवणारी ठरली व भारताने १९.५ षटकांत ६ बाद १८१ धावा करीत विजय नोंदविला.

तिलकने आपल्या निर्णायक खेळीत २५ चेंडूत अर्धशतक पूर्ण केले. रेड्डीने त्याला मोलाची साथ दिली; या जोडीने अवघ्या ३० चेंडूत नाबाद ६९ धावांची भागीदारी करत भारताच्या अविस्मरणीय पुनरागमनावर शिक्कामोर्तब केले.

एका वेळी भारताचा पराभव निश्चित वाटत होता, कारण मिचेल सँटनरने आपल्या चार षटकांत २१ धावा देऊन भारताचा मधला क्रम कोलमडून टाकला होता.

संजू सॅमसन (१४) जेकब डफीच्या गोलंदाजीवर बाद झाला, तर वैभव सूर्यवंशी (४) नॅथन स्मिथचा बळी ठरला. अभिषेक शर्माने २१ चेंडूत २७ धावा केल्या, पण तोही सँटनरचा बळी ठरला.




न्यूझीलंडविरुद्ध विजय मिळविल्यानंतर आनंद साजरा करताना नितीश कुमार रेड्डी




फटकेबाजी करताना भारताचा अभिषेक शर्मा

भारताचा कर्णधार श्रेयस अय्यर केवळ सात धावा करू शकला आणि सँटनरच्या गोलंदाजीवर त्रिफळाचीत झाला. त्यानंतर सँटनरने अक्षर पटेलला (११) बाद केले, ज्यामुळे भारताची स्थिती १०.५ षटकांत ५ बाद ७० अशी अत्यंत कठीण झाली होती.

मात्र, नमन धीरने १७ चेंडूत एक चौकार व तीन षट्कारांसह ३१ धावांची आक्रमक खेळी करत भारताच्या आशा पुन्हा जिवंत केल्या. त्याने तिलकसोबत काही मोलाच्या धावा जोडल्या, पण १५ व्या षटकात तो सँटनरच्या गोलंदाजीवर बाद झाला. तिलकने संयम राखला आणि नियमितपणे चौकार-षट्कार मारत आवश्यक धावगती आवाक्यात ठेवली. रेड्डीने योग्य वेळी केलेल्या आक्रमक फलंदाजीमुळे सामन्यावरील पकड भारताकडे कायम राहिली. या नाबाद भागीदारीच्या जोरावर भारताने अत्यंत तणावपूर्ण शेवटच्या षटकात विजयाचे लक्ष्य गाठले.

तत्पूर्वी, भारताने गोलंदाजीत उत्तम कामगिरी केली होती, तरीही ग्लेन फिलिप्स व बेव्हन जेकब्सच्या अर्धशतकांच्या जोरावर न्यूझीलंडने ५ बाद १८० धावा उभारल्या.

फिलिप्सने ४३ चेंडूत ७० धावांची धडाकेबाज खेळी केली, तर जेकब्सने ४६ चेंडूत ५८ धावांचे योगदान दिले. या दोघांनी चौथ्या गड्यासाठी ११६ धावांची भागीदारी करत न्यूझीलंडला सुरुवातीच्या पडझडीतून सावरले.

भारताच्या गोलंदाजांनी सुरुवातीलाच धक्के दिल्याने न्यूझीलंडची अवस्था सहाव्या षटकापर्यंत ३ बाद ४१ अशी झाली होती. मात्र, फिलिप्स व जेकब्सने संयमाने डाव सावरला. अर्शदीप सिंगने टिम सिफर्टला (७) बाद केले.

यानंतर प्रिन्स यादवने फिन ॲलनला (१६ धावा) माघारी धाडले, तर भुवनेश्वर कुमारने डॅरिल मिचेलला (६ धावा) बाद केले. तिसरे षटक संपण्यापूर्वीच न्यूझीलंडची स्थिती २ बाद १८ अशी बिकट झाली होती.

सहाव्या षटकात ॲलन बाद झाल्यामुळे न्यूझीलंडची धावसंख्या ३ बाद ४१ अशी झाली होती, ज्यामुळे डाव सावरण्याची जबाबदारी फिलिप्स आणि जेकब्स यांच्यावर आली.

या जोडीने महत्त्वपूर्ण भागीदारी करत १४ व्या षटकात न्यूझीलंडला १०० धावांचा टप्पा ओलांडून दिला आणि एका भक्कम फिनिशसाठी पाया रचला.

फिलिप्सने अवघ्या ३३ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले; त्या टप्प्यापर्यंत त्याने तीन चौकार आणि तीन षटकार मारले होते. अखेरीस त्याने एकूण चार चौकार आणि चार षटकार लगावले.

दुसरीकडे, जेकब्सने ४० चेंडूत अर्धशतक गाठले. त्याने पाच चौकार आणि एक षटकार मारत फिलिप्सच्या आक्रमक फलंदाजीला उत्तम साथ दिली. चौथ्या गड्यासाठीच्या या जोडीने ६९ चेंडूत १०० धावांची भागीदारी केली. सुरुवातीच्या धक्क्यांनंतर या दोन फलंदाजांनी मिळालेल्या संधींचा पुरेपूर फायदा घेत संघाचा डाव पुन्हा उभा केला. १८ व्या षटकात अर्शदीपच्या गोलंदाजीवर नमन धीरने फिलिप्सला झेलबाद केले आणि त्यांची खेळी संपुष्टात आली. या विकेटमुळे १५७ धावांची भागीदारी खंडित झाली.

त्यानंतर लगेचच जेकब्सही बाद झाला; नितीश कुमार रेड्डीच्या गोलंदाजीवर तो ५८ धावा करून माघारी परतला. यामुळे न्यूझीलंडची स्थिती ५ बाद १६५ धावा अशी झाली. अर्शदीप भारताचा सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला, ज्याने आपल्या चार षटकांत ३३ धावा देऊन दोन बळी मिळवले. प्रिन्सने ३० धावा देत एक बळी घेतला, तर भुवनेश्वरने ५० धावांत एक बळी मिळवला.

अक्षर पटेलने किफायती गोलंदाजी करत आपल्या चार षटकांत २८ धावा दिल्या, मात्र त्याला एकही बळी मिळाला नाही. नितीश रेड्डीने तीन षटकांत ३१ धावा देऊन एक बळी घेतला.

शेवटच्या टप्प्यात मायकेल ब्रेसवेलने आक्रमक फलंदाजी करत एक चौकार आणि एक षटकार लगावला. न्यूझीलंडने शेवटच्या दोन षटकांत २३ धावा जोडल्या आणि एक सन्मानजनक धावसंख्या गाठली.

(वृत्तसंस्था)



## शालेय शहर कबड्डी स्पर्धेत 'एलबीपीएम'च्या मुली विजेत्या

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २४ ऑक्टोबर -**

सातरस्ता मोदीखाना येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयाच्या १९ वर्षांखालील मुलींच्या कबड्डी संघाने शालेय शहर स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले. या विजयासह महाविद्यालयाच्या संघाने सांगोला येथे होणाऱ्या पुणे विभागीय कबड्डी स्पर्धेत प्रवेश मिळविला आहे. राजीव गांधी इनडोअर स्टेडियम येथे झालेल्या अंतिम सामन्यात त्यांनी ही कामगिरी केली. या संघास प्रशिक्षक प्रा. शरणबसवेश्वर वांगी आणि प्रा. अमर पवार यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे रयत शिक्षण संस्थेच्या मध्य विभागाचे चेअरमन संजीव पाटील, प्राचार्य डॉ. सुरेश ढेरे यांनी अभिनंदन केले. तसेच पुणे विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

**विजेता संघ :** मेघना घोडमिसे (कर्णधार) ऐश्वर्या कांबळे, कावेरी मधर्ले, गायत्री बेलदवरु, महिमा जगले, अपूर्वा गायकवाड, पूर्वा पवार, श्रिया गायकवाड, दीपाली होनमाने, इंद्रायणी वाघमोडे, साक्षी देवकते, धनश्री चव्हाण.




## 'आयएमएस'च्या ६ खेळाडूंची विभागीय तलवारबाजी स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २४ ऑक्टोबर -**

येथील इंडियन मॉडेल स्कूलच्या ६ खेळाडूंची पुणे विभागीय शालेय तलवारबाजी स्पर्धेसाठी निवड झाली. पार्क जिमखाना हॉल येथे झालेल्या शालेय शहर तलवारबाजी स्पर्धेतून ही निवड झाली. या खेळाडूंना क्रीडा शिक्षक अक्षय माने यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल संस्थापक अध्यक्ष ए. डी.जोशी, सचिव अमोल जोशी, श्री साई महिला प्रतिष्ठानच्या सचिवा सायली जोशी, मुख्याध्यापिका सुजाता बुट्टे व ममता बसवंती यांनी अभिनंदन केले.

**कामगिरी :** १४ वर्षाखालील मुली : फॉईल : शुभ्रा तोरवी (रौप्य), आनंदी बरडे (कांस्य).

१७ वर्षाखालील मुले : फॉईल : अतुल चन्ना (कांस्य).

१७ वर्षाखालील मुली फॉईल : समृद्धी तिपणे व कार्तिकी चव्हाण (कांस्य),

१९ वर्षाखालील मुली : फॉईल आयेशा पठाण (कांस्य).

## महाविद्यालयीन ज्युदो स्पर्धेत उमा महाविद्यालयाची उल्लेखनीय कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२४ ऑक्टोबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ अंतर्गत झालेल्या आंतर महाविद्यालयीन ज्युदो स्पर्धेत उमा महाविद्यालयाच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली.

विठ्ठलराव शिंदे महाविद्यालय टेंभुर्णी (ता. माढा) येथे झालेल्या स्पर्धेत त्यांनी ही कामगिरी केली. त्यांना शारीरिक शिक्षण संचालक डॉ. आनंद ढवण, कार्यालयीन अधीक्षक सज्जन लोंढे तसेच गोरख खताळ, पैगंबर शेख, व तुकाराम लोखंडे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष तथा माजी आमदार प्रशांत परिचारक, उपाध्यक्ष मुकुंद परिचारक, सचिव




राजगोपालजी भट्टड, खजिनदार रमेश लाड, विश्वस्त ॲड. प्रणव परिचारक, डॉ. मिलिंद परिचारक, इतर संस्था पदाधिकारी व प्राचार्य डॉ. धिरजकुमार बाड यांनी अभिनंदन केले.

**कामगिरी : पुरुष :** सार्थक रामचंद्र वाघमोडे (७३ किलो वजनी गट, रौप्य), पृथ्वीराज अनिल नरळे (८१ किलो वजनी गट, कांस्य ), शिवशंकर सुभाष आसबे (१०० किलो वजनी गट, कांस्य). **महिला :** साक्षी सुभाष सागर हिने(४५ किलो, कांस्य).

## विभागीय बास्केटबॉल स्पर्धेत पानगल प्रशाला उपविजेता



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २४ ऑक्टोबर -**

सांगोला विद्यामंदिर येथे झालेल्या पुणे विभागीय शालेय बास्केटबॉल स्पर्धेत एम.ए. पानगल अँगल उर्दू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या संघाने १९ वर्षाखालील मुलांच्या गटात उपविजेतेपद संपादिले.

उपांत्य फेरीत अहमदनगर ग्रामीण संघास हरवून त्यांनी अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम सामन्यात पुणे शहरबरोबर झालेल्या कडव्या लढतीत त्यांना उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. संघास क्रीडाशिक्षक नावेद मुन्शी, इकबाल दलाल व अल्ताफ सिद्दिकी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे प्राचार्य डॉ. हारून रशीद बागबान, फौजिया शेख, फरजाना नदाफ, फरहात शेख,जाकीर शहापुरे, रियाज सय्यद, इद्रीस पेरमपल्ली आदींनी अभिनंदन केले.

**उपविजेता संघ :** रेहान तगाला, इम्माद काझी, सुऐबन तुळजापुरे, अब्दुल खालिक काझी, नोमान मुजावर, आमिर शेख, झोहेब बागवान, साद चौधरी, इब्राहिम शेख, अब्दुल्ला कमिशनर, मोहम्मद इनामदार, राकिब शेख.



## शहर शूटिंगबॉल स्पर्धेत बेगम कमरुन्निसा कारीगर गर्ल्स हायस्कूल विजेते

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २४ ऑक्टोबर -**

शालेय शहर शूटिंगबॉल स्पर्धेत बेगम कमरुन्निसा कारीगर गर्ल्स हायस्कूल व जुनिअर कॉलेजने १७ वर्षाखालील मुलींच्या गटात विजेतेपद पटकावले. १९ वर्षाखालील मुलींच्या गटात मात्र त्यांना उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

सुभाष उद्यान येथे झालेल्या स्पर्धेत त्यांनी ही कामगिरी केली. या विजयी संघास क्रीडा शिक्षिका अनिसा नालबंद, सईदा दारूवाले, वसीम बागवान व शहबाज कुरेशी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे प्राचार्या तहसीना शेख व आरिफ पठाण आदींनी अभिनंदन केले.

**विजयी संघ :** मुस्कान बागवान, खतीजा पटेल, जिया कौसर धवलगी, सॉलेहा कोकटनुर, बीबी आयशा मनीयार, झिकरा ताबोळी, रुबीना हलियाल, तसलीम शेख, सोबीया सय्यद, आशिया बागवान, बीबी मरियन मसूद, आयशा उस्ताद.

## संतोष पाटील महाविद्यालयाच्या महिला उपविजेत्या

### आंतरमहाविद्यालयीन खो-खो स्पर्धा



**तभा वृत्तसेवा**
**दक्षिण सोलापूर, दि. २४ ऑक्टोबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूरअंतर्गत झालेल्या आंतर महाविद्यालयीन खो-खो स्पर्धेत मंद्रूप (ता. दक्षिण सोलापूर) येथील संतोष भीमराव पाटील महाविद्यालयाच्या महिला संघाने उपविजेतेपद पटकावले. तर पुरुष संघाने कांस्यपदक मिळवले.

महिला संघाने पंढरपूरच्या स्वेरी अभियांत्रिकीस व सांगोला महाविद्यालयाच्या संघांना पराभूत करत उपविजेतेपदावर नाव कोरले. तर पुरुष संघाने मंगळवेढ्याच्या दलितमित्र कदम गुरूजी सायन्स कॉलेजच्या संघाला नमवत घोडदौड केली. तर संगमेश्वर महाविद्यालयासोबतचा सामना बरोबरीत राहिला.

या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक डॉ. एस. एस. तोरवी यांचे मार्गदर्शन लाभले. संघ व्यवस्थापक म्हणून प्रा. डॉ. बी. एस. कोरे, प्रा. डॉ. संगमेश्वर निंबर्गी यांनी काम पाहिले. विजेत्या खेळाडूंचे सोलापूर जिल्हा समाजसेवा मंडळ संस्थेचे अध्यक्ष पी. एल. कोळी, उपाध्यक्ष डॉ. सी. जी. हविनाळे, ॲड. संदेश कोळी, सचिव एम. डी. कमळे, सहसचिव प्रा. सुबोध कोळी, खजिनदार प्रा. व्ही. के. पाटील, विश्वस्त नागेश बिराजदार व प्राचार्य डॉ. एम. एन. जगताप, प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.





## श्री शिवाजी महाविद्यालयाची ज्युदो स्पर्धेत चमकदार कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २३ ऑक्टोबर**

टेंभुर्णी येथे झालेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या आंतरमहाविद्यालयीन ज्युदो स्पर्धेत श्री शिवाजी महाविद्यालयाच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली.

या खेळाडूंना महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक डॉ. हरिदास बारसकर, डॉ. विजयानंद निंबाळकर व डॉ. रामहरी नागटिळक यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, सचिव पी. टी. पाटील, सहसचिव अरुण देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे, प्राचार्य डॉ. ए. बी. शेख, संतोष कवडे आदींनी अभिनंदन केले.

**कामगिरी :** करण ढाणे (८१ किलो, प्रथम), बाळासाहेब दळवी (द्वितीय), स्वामीसमर्थ माळी (९० किलो, द्वितीय), सागर खराडे (६६ किलो, द्वितीय), रोहन माळी ( ७३ किलो वजन गट, तृतीय).

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# ‘डीसीसी’च्या निवडणुकीत उतरणारच

## माजी आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील; पक्षाचा मुद्दा ठरणार गौण

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २४ ऑक्टोबर -**

जिल्ह्यात सहकारी संस्थेची निवडणूक ही पक्षीय पातळीवर लढवली जात नाही. याच परंपरेनूसार आपण सर्वांशी संपर्क साधून जिल्ह्याची घडी पूर्ववत करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन माजी आमदार रणजीतसिंह मोहिते पाटील यांनी केले. तसेच बँकेच्या निवडणुकीत व्यक्तीशः उतरणार असल्याचे संकेत दिले.



शिवरत्न बंगल्यावर सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विचारविनिमय बैठक पार पडली. यावेळी ते बोलत होते. यावेळी खासदार धैर्यशील मोहिते पाटील, आमदार अभिजीत पाटील, धनाजी साठे, ज्येष्ठ नेते लक्ष्मण ढोबळे, सविता राजे भोसले, देवानंद बागल शिवानंद पाटील, अनिकेत देशमुख, प्रथमेश म्हेत्रे, शिवानंद पाटील यांच्यासह जिल्हाभरातील प्रमुख नेते व कार्यकर्ते उपस्थित होते.

मोहिते पाटील पुढे म्हणाले, जिल्हा बँकेच्या माध्यमातून पंढरपूर येथे तीस एकर मैदानात केशर मातीचे प्रदर्शन भरवले. त्यासाठी सव्वा ते दीड कोटी रुपये खर्च झाला तरी केवळ बारा ते तेरा लाख बँकेचे खर्च झाली असून बाकीचे सव्वा ते दीड कोटी रक्कम आपण इतर माध्यमातून उपलब्ध केल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी जिल्हाभरातून आलेल्या विविध नेत्यांनी मनोगते व्यक्त केली. बाळासाहेब पाटील यांनी आपले वडील भाई एस एम पाटील यांनी स्वतः साठी अथवा संस्थेसाठी एकही रुपया घेतलेला नव्हता. त्यावेळी दिलेल्या कर्जाची वसुली चालू असतानाही संचालक म्हणून लांच्छनास्पद आरोप केले गेल्याचे सांगत मोहिते-पाटील यांनी पॅनल उभा करावे आम्ही त्यांच्या पाठीशी असल्याचे सांगितले,

तेजस बोबडे, पंढरपूरचे तळेकर, सिद्धेश्वर सहकारीचे माजी संचालक भारत जाधव, मंगळवेढ्याचे भारत पाटील, करमाळ्याचे दशरथ कांबळे, ॲड. दीपक पवार, शिवानंद पाटील, डॉ. अनिकेत देशमुख, बार्शीचे विश्वास बारबोले, जेष्ठ नेते लक्ष्मण ढोबळे आदींनी मनोगते व्यक्त केली. माजी आमदार धनाजी साठे यांनी जिल्ह्याची घडी पूर्ववत बसविण्यासाठी योग्य रीतीने प्रयत्न करून निवडणूक लढवावी असे मार्गदर्शन केले. आमदार अभिजीत पाटील यांनी जिल्हा बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत अधिकाऱ्यांनी तफावत असणारे आकडे सादर केल्याचे सांगितले. यावेळी सर्वांनी मोहिते पाटील यांनी संपूर्ण पॅनेल उभा करून डीसीसीची निवडणूक लढवावी असे मत व्यक्त केले.

### मोहिते-पाटलांनी ताकद दाखवण्याचे सर्वांचे आवाहन

सोमवार २६ ऑक्टोबरपासून निवडणूक प्रक्रिया चालू होत आहे. इच्छुकांनी आपली नावे नोंदवावीत, असे आवाहन खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी केले. सर्वच वक्त्यांचा आपल्या भाषणातून रणजीत सिंह व धैर्यशील मोहिते-पाटील यांनी आता मैदानात उतरून पुन्हा एकदा जिल्ह्यात आपली ताकद दाखवण्याची वेळ आल्याचे म्हणण्याचा सूर दिसून आला.

# टेंभुर्णीत एमडी ड्रग्जसह ११.६१ लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. २४ ऑक्टोबर -**

टेंभुर्णी शहरातील कुर्डुवाडी पुलाजवळील सर्व्हिस रोडवर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गुरुवारी (दि.२२ ऑक्टोबर) दुपारी कारवाई करत ५.५२ ग्रॅम वजनाचा मेफेड्रोन (एमडी) हा अमली पदार्थ जप्त केला. याप्रकरणी एकावर टेंभुर्णी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

गुरुवारी दुपारी तीनच्या सुमारास पुणे-सोलापूर महामार्गावरील कुर्डुवाडी पुलाजवळील सर्व्हिस रोडवर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ही कारवाई केली. कारवाईत अमली पदार्थासह कार, दोन मोबाईल फोन, डिजिटल वजनकाटा, रोख रक्कम आणि प्लास्टिकच्या रिकाम्या पिशव्या असा एकूण ११ लाख ६१ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. संशयित गौतम अजित भोसले (वय ३८, रा. वेणेगाव) याच्याकडे ५.५२ ग्रॅम वजनाचा मेफेड्रोन हा अमली पदार्थ आढळून आला.

पोलिसांनी केलेल्या कारवाईत १६ हजार ५०० रुपये किमतीचा मेफेड्रोन, एक लाख २० हजार रुपये किमतीचा मोबाईल, १० हजार रुपये किमतीचा आणखी एक मोबाईल, एक हजार रुपये किमतीचा डिजिटल वजनकाटा, १४ हजार रुपये रोख रक्कम, दहा लाख रुपये किमतीची कार आणि प्लास्टिकच्या रिकाम्या पिशव्या असा एकूण ११ लाख ६१ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस कॉन्स्टेबल बाळराजे घाडगे यांनी फिर्याद दिली. त्यानुसार टेंभुर्णी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. प्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक मुळे, स्थानिक गुन्हे शाखा, सोलापूर ग्रामीण करीत आहेत.

## महत्वाचे...



### टेंभुर्णीत ‘एमएसईबी’च्या कारभाराविरोधात ‘बमुपा’चे निवेदन

**टेंभुर्णी, दि. २४ ऑक्टोबर -**

टेंभुर्णीकर आधीच दुष्काळाने होरपळून गेले आहेत, त्यात एमएसईबीने भरमसाठ आणि अंदाजे बिले देऊन जनतेची लूट करत असल्याचा आरोप बहुजन मुक्ती पार्टीने केला आहे.याबाबत आंदोलनाचा इशारा देणारे निवेदन अभियंता राजेंद्र पाटील यांना दिले आहे. एमएसईबी प्रशासन लोकांच्या इच्छेविरुद्ध जबरदस्तीने स्मार्ट मीटर बसवत आहे. ज्यांची जुनी मीटर आहेत, त्यांना रीडिंग न घेता अंदाजे दुप्पट बिले दिली जात आहेत. याबाबत जाब विचारायला गेलेल्या सामान्य ग्राहकांना तेथील कर्मचाऱ्यांकडून उलट-सुलट उत्तरे दिली जातात, नीट बोलले जात नाही, अपमानास्पद वागणूक दिली जाते, असे निवेदनात म्हटले आहे. यावेळी आप्पा किर्ते, निलेश खरात, हनुमंत सरवदे, बहुजन मुक्ती पार्टी टेंभुर्णी शहराध्यक्ष प्रशांत गायकवाड, बहुजन मुक्ती पार्टी माढा लोकसभा प्रभारी महेंद्र सोनवणे आदी हजर होते.




### हक्काच्या पेन्शनसाठी पंढरपूर येथे मेळाव्याचे आयोजन

**पंढरपूर, दि. २४ ऑक्टोबर -**

देशभरातील ८१ लाख सेवानिवृत्त कर्मचारी हक्काच्या पेन्शन पासून वंचित असून याबाबत शासनाकडे पाठपुरावा करण्यासाठी बुधवार दि. २८ रोजी पंढरपूर येथे जिल्हास्तरीय मेळाव्याच्या आयोजन केले आहे. मेळाव्याचे उद्घाटन नगराध्यक्ष प्रणिता भालके यांच्या हस्ते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश येंडे त्यांच्या उपस्थितीत होणार आहे. निवृत्त कर्मचारी समन्वय समितीच्या वतीने पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.यावेळी समितीचे अध्यक्ष हरि नरखेडकर, सचिव शशिकांत ठोकळे, सल्लागार शिवाजी दळवी, कार्याध्यक्ष अशोक कोडगुळे, वसंत अभंगराव, बाळासाहेब साळुंखे, विजय गायकवाड, बापू शिंदे आदी उपस्थित होते.

### वडजी गावातील भांडखोर गटांनी दिला शाळेला संगणक भेट

**सोलापूर, दि. २४ ऑक्टोबर -**

सोलापूर तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वडजी गावात दोन गटांमध्ये झालेल्या वाद सोलापूर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक कुंदन गावडे यांनी दोन्ही गटांना समुपदेशन करून वाद सामंजस्याने मिटविला. त्यांच्या सल्ल्यानूसार दोन्ही गटांतील व्यक्तींनी सकारात्मक विचारसरणी स्वीकारून गावातील जिल्हा परिषद शाळेला संगणक भेट दिला. किरकोळ कारणावरुन दोन गटात वाद होता. पोलिसांनी तो मिटवून समाजासाठी आणि स्वतःच्या भविष्यासाठी विधायक कार्य करण्याचा सल्ला दिला. पोलिसांच्या समुपदेशनाला सकारात्मक प्रतिसाद देत दोन्ही गटांनी एकत्र येत जिल्हा परिषद शाळेला संगणक भेट दिला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शिक्षण घेण्यास मदत होणार आहे. सोलापूर तालुका पोलीस ठाण्याकडून अवलंबिलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# मंद्रुपच्या प्रवेशद्वारावरच कचऱ्याचे ढीग

## ग्रामपंचायतीकडून कायमस्वरूपी उपाययोजनांची गरज

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रूप, दि. २४ ऑक्टोबर -**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील मोठे गाव असलेल्या मंद्रूपच्या प्रवेशद्वारावरच कचऱ्याचे ढीग साचल्याचे चित्र आहे. बसस्थानकापासून महात्मा फुले शाळेपर्यंत महामार्गालगत कचरा टाकला जात असल्याने परिसरात अस्वच्छता पसरली आहे.



गावाच्या प्रवेशद्वारावरच दिसणारे हे चित्र मंद्रूपच्या प्रतिमेला धक्का देणारे ठरत आहे. तसेच येळेगावकडून मंद्रूपमध्ये येताना पुलाजवळही मोठ्या प्रमाणात टाकाऊ पदार्थ आणि कचरा दिसून येतो. या परिसरात रस्त्यावर कपडेही पडलेले आहेत. या महामार्गावरून प्रवास करणाऱ्यांच्या नजरेस पडणाऱ्या अस्वच्छतेमुळे गावाची प्रतिमा मलिन होत आहे.

सुका आणि ओला कचरा वेगळा टाकण्यासाठी कचरा कुंड्या उपलब्ध असतानाही त्यांचा योग्य वापर होत नसल्याचे दिसते. नागरिकांसह काही व्यावसायिकांकडूनही टाकाऊ पदार्थांची योग्य विल्हेवाट लावण्याबाबत जागरूकता आवश्यक आहे. उघड्यावर टाकलेल्या कचऱ्यामुळे मोकाट जनावरांचा वावरही वाढत आहे.

गाव स्वच्छ ठेवणे आणि कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे ही ग्रामपंचायतीची महत्त्वाची जबाबदारी आहे. केवळ कचरा उचलण्यापुरते मर्यादित न राहता, मंद्रूपची प्रतिमा जपण्यासाठी प्रवेशमार्गावरील अस्वच्छतेचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवावा, अशी अपेक्षा आहे.

# सेंट्रल किचन पध्दतीला होतोय विरोध

- शालेय पोषण आहार कर्मचारी संघटना आक्रमक
- निर्णय रद्द न केल्यास आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २४ ऑक्टोबर -**

महाराष्ट्र शासनाने शालेय पोषण आहारासाठी सुरू केलेल्या सेंट्रल किचन पद्धतीला महाराष्ट्र राज्य शालेय पोषण आहार कर्मचारी संघटना (आयटक), सोलापूर जिल्ह्याच्या वतीने तीव्र विरोध होत आहे. निर्णय रद्द न झाल्यास आंदोलनाचा इशारा दिला आहे.




सेंट्रल कीचन पद्धतीमुळे राज्यातील लाखो स्वयंपाकी व मदतनीस महिलांच्या रोजगारावर गदा येण्याची भीती व्यक्त केली आहे. ही पद्धत तातडीने रद्द करून पूर्वीप्रमाणे स्वयंपाकी व मदतनीसांना रोजगार उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी संघटनेने केली आहे. संघटनेचे राज्य संघटक कॉम्रेड विठ्ठल सुळे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हा शिक्षणाधिकारी यांना यासंदर्भातील निवेदन सादर करण्यात आले. गेल्या सहा महिन्यांपासून शालेय पोषण आहार योजनेतील स्वयंपाकी व मदतनीसांचे मानधन तसेच इतर खर्चाची रक्कम शासनाकडून मिळालेली नाही. त्यामुळे आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या कामगारांना तातडीने थकीत मानधन देण्यात यावे. सेंट्रल किचन पद्धत रद्द करून शाळांमध्ये पूर्वीप्रमाणेच स्वयंपाकी व मदतनीसांच्या माध्यमातून पोषण आहार तयार करण्याची व्यवस्था सुरू ठेवावी, असे निवेदनात म्हटले आहे.

शासनाने सेंट्रल किचन पद्धतीचा निर्णय रद्द केला नाही, तर संविधानिक व लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा संघटनेने दिला आहे. निवेदनावर जिल्हाध्यक्ष कॉम्रेड विठ्ठल सुळे, जिल्हा सचिव सीमा खटकाळे, आदित्य घोडके आदींच्या सह्या आहेत.

# मातोश्री ईश्वरम्मा विद्यालय व ज्युनिअर कॉलेजमध्ये महिलांनी घेतला महाभोंडल्याचा आनंद

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२४ ऑक्टोबर -**

श्री रुक्मिणी विद्यापीठ या संस्थेच्या वतीने मातोश्री ईश्वरम्मा विद्यालय व ज्युनिअर कॉलेज पंढरपूर या प्रशालेत खास महिलांसाठी व मुलींसाठी महाभोंडल्याचे आयोजन केले होते.




कार्यक्रमाच्या सुरुवातीला संस्था सचिवा सुनेत्रा पवार यांचे व महिलांचे हस्ते हत्तीची पूजा झाली. यामध्ये महिलांनी सूप नाचवणे, घागर फुंकणे, फुगे फुगवणे याबरोबर दांडिया नृत्य तसेच ऐलमा पैलमा गणेश देवा आदी गाण्याबरोबर सर्व फेर धरून गाणीही गायली.

सुनेत्रा पवार यांनी दुष्काळाची दाहकता बघता सर्वांनी पाणी बचतीचा आणि जल संवर्धनाचा संकल्प करावा. घरातील भाजी, तांदूळ धुतलेले पाणी आपल्या परिसरातील झाडांना घाला असे आवाहन केले. खास निवेदिका डॉ.वनिता घाडगे यांनी महिलांना प्रोत्साहित करून महिलांचा विविध स्पर्धात, गाण्यात अधिका अधिक सहभाग नोंदविला.

कार्यक्रमासाठी सुप्रिया पवार, वैशाली साळुंखे, वसुधा कुंभार, सविता लोखंडे यांच्यासह प्राचार्या नंदिनी गायकवाड, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. प्रत्येक महिलेस छोटीशी भेट व खिरापत देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

कार्यक्रमासाठी स्वाती कोळेकर, मनीषा पाटील, सोनाली खोत, सुवर्णा जगदाळे, भोईटे यांनी विशेष परिश्रम घेतले.



# मोकाट श्वानांची समस्या सोडविण्यासाठी विशेष बैठक

## पंढरपूर नगरपरिषदेत झाली बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२४ ऑक्टोबर -**

पंढरपूर शहरातील मोकाट श्वानांच्या समस्येचे निवारण करण्यासाठी व नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने उपाययोजना निश्चितीसाठी पंढरपूर नगरपरिषदेच्या सभागृहात विशेष बैठक झाली.

बैठकीस शिक्षक, प्राचार्य, बसस्थानक व रेल्वेस्थानक व्यवस्थापक उपस्थित होते. यावेळी शहरातील शाळा-महाविद्यालये, बसस्थानक आणि रेल्वेस्थानक परिसरातील मोकाट श्वानांमुळे नर्माण होणाऱ्या समस्या, नागरिकांच्या सुरक्षिततेचे प्रश्न आणि उपाययोजनांबाबत चर्चा झाली.

नागरिकांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासोबतच प्राण्यांबाबतच्या लागू नियमांचे पालन करून या समस्येवर प्रभावी आणि मानवी दृष्टिकोनातून उपाययोजना करणे आवश्यक आहे. यासाठी संबंधित यंत्रणांमध्ये समन्वय साधून पुढील कार्यवाहीवर भर देणार आहे.

# ‘सहकार शिरोमणी’ लवकरच देणार १०० रुपयांचा हफ्ता

## चेअरमन काळे; ऊस उत्पादक, कामगारांची दिवाळी गोड करणार



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२४ ऑक्टोबर -**

सहकार शिरोमणी कारखान्याने जाहीर केल्याप्रमाणे मागील गळीतास आलेल्या ऊसास रुपये १०० चा हप्ता लवकरच शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे. मागील सिझनमध्ये जिल्हयात सर्वाधिक दर दिलेला असून, चालु गळीत हंगामात जिल्ह्यातील इतर कारखान्याचे बरोबरीने ऊस दर देण्यात येणार असल्याचे कारखान्याचे चेअरमन कल्याणराव काळे यांनी सांगितले.

सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याची ३५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा चेअरमन कल्याणराव काळे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी ते बोलत होते. कारखान्याचे सभासद व मागील गळीत हंगामामध्ये गळीतास आलेल्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दिपावलीनिमित्त कुपनद्वारे कारखाना कार्यस्थळावर आणि पंढरपूर येथे साखर वाटप करण्याचे धोरण सहयोगी ओंकार शुगर कार्पोरेशनशी चर्चा करुन निश्चित केल्याचेही काळे म्हणाले.

गळीत हंगामाचे सुरुवातीपासून ते २०२३ अखेर ज्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांकडे कारखान्याची थकित येणेबाकी आहे, त्यांच्या थकित रक्कमेवर २५ टक्के सवलत व संपुर्ण व्याज माफ करण्यात येणार आहे. सर्व थकबाकीदारांनी दोन महिन्यात ऊस गळीतास देवून / रोखीने थकित रक्कमा भराव्यात. मुदतीत या सवलतीचा लाभ घ्यावा. सरसकट सर्व कामगारांना २० टक्के पगार वाढ करण्याची संचालक मंडळाने शिफारस केली असल्याचेही काळे यांनी सांगितले.

विषयाचे वाचन प्र.कार्यकारी संचालक पोपटराव घोगरे यांनी केले. यावेळी कारखान्याचे व्हा.चेअरमन तसेच आजी, माजी सर्व संचालक, सभासद, ऊस उत्पादक उपस्थित होते.

### कारखाना लवकरात लवकर कर्जमुक्त करणार

सहयोग ओंकार शुगर कार्पोरेशनच्या माध्यमातुन अहवाल सालात कारखान्याने विविध बँकांकडून घेतलेल्या कर्जाची व्याजासह एकूण ४७२०.१८ लाख परतफेड केलेली आहे. उर्वरीत कर्जही ओटीएस स्कीम अंतर्गत लवकरच भरणा करण्यात येणार आहोत. सर्वाचे हित डोळ्यासमोर ठेवुन सहयोग तत्वावरील चालविणेचा निर्णय योग्य आहे. लवकरात लवकर आपला कारखाना कर्ज मुक्त करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे चेअरमन काळे यांनी सांगितले.

## निधन वृत्त...

### अरुण जोशी



**सोलापूर, दि. २४ ऑक्टोबर-**

विजापूर रोडवरील नम्रता सोसायटी येथील रहिवाशी अरुण शंकर जोशी (वय ७८) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुन, एक मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे ते सेवानिवृत्त अधिकारी होते. प्रसिध्द बांधकाम व्यावसायिक राघवेंद्र जोशी यांचे ते वडील होत. मोदी स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

## क्राईम वृत्त...

### पगार होत नसल्याने कर्मचाऱ्याचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि.२४ ऑक्टोबर-**
मागील दोन महिन्यापासून पगार होत नसल्याने करमाळा तालुक्यातील हंबेवाडी येथील संगमेश्वर विद्यालयाच्या कर्मचाऱ्याने पिकांवर फवारणी करण्याचे औषध पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. अजितकुमार दिगंबर बंडगर (वय-४६, रा.विहाळ, ता.करमाळा) असे त्या कर्मचाऱ्याचे नाव आहे. अजितकुमार बंडगर हे हंबेवाडी येथील संगमेश्वर विद्यालय-संगोबा येथे कामावर आहेत. मागील दोन महिन्यांपासून त्यांचा पगारच झाला नाही. त्यामुळे त्यांनी गुरुवारी सकाळी रोगर औषध पिऊन टाकले. याचा त्रास होऊ लागल्याने त्यांना करमाळा येथील आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचार करुन पुतण्या सिध्दांत बंडगर याने सोलीपुरातील शासकीय रुग्णालयात पुढील उपचारासाठी दाखल केले.

### धावत्या रेल्वेतून पडलेल्या वयोवृध्दाचा मृत्यू

**सोलापूर, दि.२४ ऑक्टोबर-**
धावत्या रेल्वेतून पडून जखमी झालेल्या एका ७९ वर्षीय वृध्द इसमाचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात गुरुवारी मध्यरात्री मृत्यू झाला. म्हाळप्पा सिध्दप्पा निंबाळ (रा.मिरजगी, ता. अक्कलकोट) असे मयत वृध्दाचे नाव आहे. बुधवारी मध्यरात्री पावणे बारा वाजण्याच्या सुमारास ते अक्कलकोट तालुक्यातील दुधनी बोरोटी रेल्वे स्थानकादरम्यान जखमी अवस्थेत मिळून आले होते. एका खासगी दवाखान्यात प्राथमिक उपचार करुन पुढील उपचारासाठी सोलापूर लोहमार्ग पोलिस शिपाई सरवदे यांनी सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. याठिकाणी उपचार सुरु असताना त्यांचा मृत्यू झाला.

### वाहन चालविण्याच्या वादातून तरुणावर वार

**सोलापूर, दि.२४ ऑक्टोबर-**
वाहन चालविण्याच्या वादातून एका तरुणाच्या डोक्यावर आणि शरीरावर ब्लेडने वार करण्यात आल्याची घटना जुना कुंभारी नाका परिसरात घडली. याप्रकरणी राघवेंद्र हणमंतु खुने (रा. वेणुगोपाल नगर, सोलापूर) आणि त्याचा एक अज्ञात साथीदार असे दोघांविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत अजय अंबादास मोने (रा.भारतरत्न इंदिरा नगर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, बुधवारी सायंकाळी जुना कुंभारी नाका येथील बी प्रकाश बार येथे वाहन चालविण्याच्या कारणावरुन यातील आरोपीशी वाद झाला असता आरोपीने माझ्यावर ब्लेडने वार केले. मपोह वाघमोडे ह्या पुढील तपास करत आहेत.





सोलापूर : कोजागिरी पौर्णिमेला तुळजाभवानीच्या दर्शनासाठी सोलापुरातून तुळजापूरला पायी चालत जाणारे भाविक. (छाया : केवल तिवारी)

# शिवलाड तेली समाजातर्फे काठी-पालखीचे श्रीक्षेत्र तुळजापूरकडे प्रस्थान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ ऑक्टोबर-**
श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून चालत आलेल्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक परंपरेनुसार, सोलापूर शहरातील शिवलाड तेली समाजाच्या वतीने आश्विन पौर्णिमेनिमित्त श्रीक्षेत्र तुळजापूरकडे जाणाऱ्या मानाच्या काठी व पालखीचे उत्साही वातावरणात प्रस्थान करण्यात आले. प्रारंभी आमदार विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते काठी व पालखीचे पूजन करण्यात आले.

या धार्मिक व पारंपरिक सोहळ्यानिमित्त सोलापूर शहर मध्यवर्ती नवरात्र महोत्सव मंडळाचे अध्यक्ष विजय पुकाळे, सचिव दत्तात्रेय मेनकुदळे, मल्लिनाथ सोलापुरे, निलेश शिंदे, प्रवीण वाले यांच्या हस्ते विधिवत पूजन संपन्न झाले. याप्रसंगी परंपरा जपणाऱ्या मानकऱ्यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी तेली समाजाचे ट्रस्टी सल्लागार मानकरी कैशव सोनसळे, अर्जुन मंठाळकर, सिद्राम मंठाळकर, अमित मंठाळकर, प्रशांत मंठाळकर, राजकुमार मंठाळकर, सचिन म्हेत्रे, शंतनु कुमठेकर, ऋषभ मंठाळकर, प्रविणचंद्र उळागड्डे, संतोष गवांडकर, संतोष सोनसळे, वैभव मंठाळकर, राहुल मंठाळकर, स्वप्निल मंठाळकर, रोहन मंठाळकर उपस्थित होते.

## ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचा पदभार आता राठोडांकडे

**पाणीटंचाई, जलजीवन मिशनच्या रखडलेल्या कामांच्या पार्श्वभूमीवर जबाबदारीत बदल**

> मंगळवेढा तालुक्याची पूर्णवेळ जबाबदारी माझ्याकडे आहे. सर्वात जास्त पाणीटंचाई मंगळवेढा तालुक्यात आहे. मुख्यालय आणि मंगळवेढाचे कामकाज पाहताना जिकिरीचे होत असल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांना विनंती अर्ज केल्यानंतर माझी मूळ पदावर नियुक्ती झाली आहे. अशी माहिती मंगळवेढ्याचे उपअभियंता प्रसाद काटकर यांनी दिली.

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ ऑक्टोबर**
जिल्ह्यात पाणीटंचाईचे संकट आणि जलजीवन मिशनअंतर्गत रखडलेल्या कामांचा प्रश्न ऐरणीवर असतानाच, जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या प्रभारी कार्यकारी अभियंतापदाची जबाबदारी बदलण्यात आली आहे. मंगळवेढ्याचे उपअभियंता प्रसाद काटकर यांच्याकडील पदभार आता अक्कलकोटचे उपअभियंता व्ही. डी. राठोड यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. राठोड यांनी पदभार स्वीकारून कामकाजाला सुरुवात केली आहे.

ग्रामीण भागातील पाणीपुरवठा योजनांची अंमलबजावणी, पाणीटंचाईवरील उपाययोजना आणि जलजीवन मिशनच्या कामांना गती देण्याच्या दृष्टीने या विभागाची भूमिका महत्त्वाची आहे. मात्र, या महत्त्वाच्या विभागाला अद्याप पूर्णवेळ कार्यकारी अभियंता मिळालेला नाही.

प्रभारी अधिकाऱ्यांच्या बदलांबरोबरच विभागाच्या नियमित कामकाजावर आणि प्रलंबित योजनांच्या पूर्ततेवरही लक्ष केंद्रित करण्याची गरज निर्माण झाली आहे.

तत्कालीन कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी यांच्यानंतर या विभागाला पूर्णवेळ अधिकारी मिळालेला नाही. त्यानंतर काही दिवसांपूर्वी मंगळवेढ्याचे उपअभियंता प्रसाद काटकर यांच्याकडे प्रभारी पदभार देण्यात आला होता. आता त्यांच्याकडील जबाबदारी राठोड यांच्याकडे सोपविण्यात आली आहे.

### रेल्वेत आढळला २१ वर्षीय तरुणीचा मृतदेह

**सोलापूर, दि.२४ ऑक्टोबर-**
सोलापूर रेल्वे स्थानकावर थांबलेल्या अजमेर एक्सप्रेसमध्ये एका २१ वर्षीय तरुणीचा मृतदेह आढळला. संगीता गणेश मादगुंडी (वय-२१, रा.दत्तनगर, सोलापूर) असे त्या तरुणीचे नाव आहे.

संगीता मादगुंडी ही तरुणी बुधवार, दि.२१ ऑक्टोबर रोजी रात्रीच्या सुमारास घरातून काही एक न सांगता बाहेर गेली होती. गुरुवार, दि.२२ ऑक्टोबर रोजी रेल्वेमध्ये ती बेशुध्दावस्थेत आढळली. सोलापूर लोहमार्ग पोलिस ठाण्याचे हवालदार व्हटकर यांनी तिला उपचारासाठी शासकीय रुग्णालयाचा दाखल केले. उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. सुरुवातीला तिची नोंद अनोळखी म्हणून झाली होती.

## दुष्काळामुळे आरोग्यावरील परिणाम यावर मंगळवारी चर्चासत्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ ऑक्टोबर-**
यावर्षी महाराष्ट्रात सरासरी पेक्षा अत्यल्प पाऊस झाल्याने गंभीर दुष्काळ परिस्थिती निर्माण झाली आहे. महाराष्ट्र सरकारने ३०५ तालुके दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर केले आहेत त्यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील सर्व अकरा तालुक्यांचा समावेश आहे.

अस्तित्व संस्था सांगोला व सपोर्ट फाउंडेशन सोलापूर च्या वतीने येत्या मंगळवारी सकाळी अकरा वाजता लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात दुष्काळाचे महिला व मुलींच्या आरोग्यावर होणारा परिणाम व उपाय यावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. चर्चासत्राचे उद्घाटन सोलापूर जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या सरिता मोकाशी यांच्याहस्ते होणार असून प्रमुख मार्गदर्शिका म्हणून स्त्री आरोग्य विषयाच्या अभ्यासक मेधा काळे व डॉ नयना व्यवहारे उपस्थित राहणार आहेत.

चर्चा सत्राचे अध्यक्षस्थान सपोर्ट फाउंडेशन च्या अध्यक्षा रेश्मा कदम या भूषविणार असून सोलापूर शहर व परिसरातील महिला व मुलींनी या चर्चासत्रासाठी बहुसंख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन सपोर्ट फाउंडेशन व अस्तित्व संस्थे तर्फे पल्लवी वडने, तब्बू नगारे व सुवर्णा वाघमारे यांनी केले आहे.

# अश्विनी रुग्णालयच्या निवडणुकीत बिपीनभाई पटेलसह अन्य उमेदवार विजयी


बिपिनभाई पटेल


भैरुलाल कोठारी


चंद्रशेखर स्वामी


डॉ. विजय पाटील


जयेशभाई पटेल


कौस्तुभ करवा


किशोरी राठी


मनीष रांभिया


मेहुल पटेल


रमेश व्हटकर


संपत तापडिया


संजीव पाटील


शैलेश शहा


यशोदा डागा

**कुचन, गोसकी यांचा पराभव**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ ऑक्टोबर-**
येथील अश्विनी सहकारी रुग्णालयच्या १२ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत बिपीनभाई पटेल यांच्यासह अन्य दहा उमेदवार विजयी झाले आहेत. या निवडणुकीत अश्विनी रुग्णालयचे संस्थापक तथा माजी खासदार स्व.गंगाधरपंत कुचन यांचे चिरंजीव अरविंद कुचन आणि पद्मशाली ज्ञाती संस्थेचे कार्यकारिणी सदस्य राजाराम गोसकी यांना पराभवाचा सामना करावा लागला.

जिल्हाधिकारी एस.कार्तिकेयन यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून तर उपजिल्हाधिकारी लक्ष्मण कसेकर यांनी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले. यशोदाबाई डागा, किशोरी राठी, रमेश व्हटकर, शैलेश शहा, संपत तापडिया हे यापुर्वी बिनविरोध निवडून आले. उर्वरित १० जागांसाठी १२ उमेदवार रिंगणात उतरले होते.

विजयी उमेदवारांची नावे याप्रमाणे ; करवा कौस्तुभ विश्वनाथ, पटेल बिपिनभाई महिजीभाई, पटेल जयेशभाई रमेशभाई, पटेल मेहुल बिपिनभाई, डॉ.प्रधान राजीव मधुकर, पाटील संजीव जयकुमार, डॉ. पाटील विजय काकासाहेब, कोठारी भैरुलाल मोहनलाल, स्वामी चंद्रशेखर सिध्दलिंगय्या, रांभिया मनीष केशवजी. दरम्यान, विशिष्ट भागातील उमेदवारांचा पराभव झाल्याने चर्चांना उधाण आले आहे.

## विजापूर रोड मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळातर्फे भक्तांसाठी पाणी बॉटलचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ ऑक्टोबर-**
विजापूर रोड मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळाच्या वतीने तुळजापूर ला पायी जाणाऱ्या भक्तांसाठी पाणी बॉटल चे वाटप करण्यात आले. उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांच्या हस्ते श्री तुळजाभवानी मातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी महेश देवकर,मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष विश्वनाथ कोळी, संस्थापक सदस्य विजय शाबादी,अंबादास कोळी,अशोक भांजे, महेश घाडगे, उमा देगीनाळ, प्रीती उडानशिव, वैशाली चव्हाण, रवि कोळी, विश्वनाथ आवटे, विश्वनाथ आमणे, गिरीश मंद्रूपकर उपस्थित होते. सागर पुकाळे यांनी प्रास्ताविक केले. विश्वनाथ कोळी यांनी आभार मानले.




## 'सजगता आणि काळजी' हीच सायबर गुन्ह्यांपासून बचावाची गुरुकिल्ली



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ ऑक्टोबर-**
तंत्रज्ञानाचा वापर करताना 'सजगता आणि काळजी' हीच सायबर गुन्ह्यांपासून बचावाची गुरुकिल्ली आहे, असे सायबर तज्ज्ञांनी सांगितले. सोलापूर शहर पोलिस आयुक्तालय व क्राइम पत्रकार संघाच्यावतीने सायबर गुन्हेविषयक कार्यशाळेत बोलताना असेही सांगण्यात आले की, सोशल मीडिया फसवणूक अशा सायबर गुन्ह्यांपासून सावध राहा. वैयक्तिक व आर्थिक माहिती अनोळखी व्यक्तींना देऊ नका.

यावेळी पोलिस उपायुक्तद्वय अश्विनी पाटील, प्रितम यावलकर, सहाय्यक पोलिस आयुक्त दिलीप पवार, गुन्हे शाखेचे वपोनि अरविंद माने, क्राइम पत्रकार संघाचे अध्यक्ष विशाल भांगे उपस्थित होते.

कोणत्याही प्रकारची सायबर किंवा आर्थिक फसवणूक झाल्यास नागरिकांनी १९३०, १९४५ या सायबर हेल्पलाईन क्रमांकावर किंवा सायबर पोलिस ठाण्याशी थेट संपर्क करावा, असेही सांगण्यात आले. सायबर पोलिस ठाण्याचे वपोनि भालचंद्र ढवळे यांनी प्रास्ताविक केले. इम्रान सगरी यांनी आभार मानले.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 | **RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

धाराशिव • दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## नळदुर्गमध्ये अंबाबाई भक्तांना ४०० लिटर मसाला दुधाचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२४ ऑक्टोबर -**




नळदुर्ग येथील भवानीनगर मित्रमंडळ आणि स्व. बाळ सुजित डुकरे युवा शक्तीच्या वतीने सिमोल्लंघन मैदानावर जमलेल्या शेकडो अंबाबाई भक्तांना सुमारे ४०० लिटर मसाला दुधाचे तसेच थंडगार पिण्याच्या पाण्याचे वाटप करण्यात आले.

दरवर्षीप्रमाणे यंदाही सामाजिक बांधिलकी जपत हा उपक्रम राबविण्यात आला. देवीच्या दर्शनासाठी आलेल्या थकलेल्या भाविकांना मसाला दूध आणि पाण्यामुळे दिलासा मिळाला. भाविकांनी मंडळाच्या या सेवाभावी उपक्रमाचे कौतुक केले.

यावेळी नंदकुमार डुकरे, अनिल पुदाले, महेश हजारे, रणजितसिंह ठाकूर, आकाश पुदाले, महेश जाधव, शुभम डुकरे, रवी सुरवसे, सुजित सुरवसे, संदीप हजारे, संतोष गहीरवार, वैभव भोसले, सूरज डुकरे यांच्यासह कार्यकर्त्यांनी भाविकांना दूध व पाण्याचे वाटप केले.



## संक्षिप्त वृत्त...



### भाजप नेते सुनील कर्जतकर यांची परंडा संपर्क कार्यालयास सदिच्छा भेट

**परंडा, दि.२४ ऑक्टोबर -**
भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष व विधानपरिषद सदस्य आमदार सुनील कर्जतकर यांनी परंडा येथील भाजप संपर्क कार्यालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी भाजप नेते माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांच्या हस्ते कर्जतकर यांचा सत्कार करण्यात आला. सुनील कर्जतकर यांनी पक्ष संघटनेत ४० वर्षांहून अधिक काळ पूर्णवेळ कार्यरत राहून प्रतिकूल परिस्थितीत पक्षाचा विचार रुजविण्यासाठी योगदान दिले आहे. आणीबाणीच्या काळात त्यांनी दीड वर्ष कारावासही भोगला होता. या भेटीदरम्यान सुजितसिंह ठाकूर आणि कर्जतकर यांनी पक्ष संघटनेतील जुन्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी भाजपचे तालुकाध्यक्ष अरविंदबप्पा रगडे, शहराध्यक्ष उमाकांत गोरे, जिल्हा सरचिटणीस ॲड. गणेशबप्पा खरसडे, सुबोधसिंह ठाकूर, समरजीतसिंह ठाकूर यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### 'सेवा हीच खरी भक्ती'; तलाठी संघटनेचा सेवाभावी उपक्रम

**उमरगा, दि.२४ ऑक्टोबर -**
तुळजापूर येथे श्री तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी पायी जाणाऱ्या भाविकांना उमरगा तालुका तलाठी संघटनेच्या वतीने फळे व पाण्याचे वाटप करण्यात आले. गेल्या १४ वर्षांपासून संघटनेतर्फे हा सेवाभावी उपक्रम अखंडितपणे राबविण्यात येत आहे.उन्हातान्हात पायी प्रवास करणाऱ्या भाविकांना या उपक्रमामुळे दिलासा मिळाला. धार्मिक श्रद्धेसोबत सामाजिक बांधिलकी जपत 'सेवा हीच खरी भक्ती' हा संदेश संघटनेने दिला. यावेळी संघटनेचे अध्यक्ष दीपक चव्हाण, उपाध्यक्ष मनोजकुमार यमुलवाड, सचिव बळीराम हंगरगे, जिल्हा कार्याध्यक्ष सुहास जेवळीकर, खजिनदार संदीपान माचन्ना यांच्यासह पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.



### चिवरी येथील सूर्यवंशी कुटुंबाचा सन्मान

**अणदूर, दि.२४ ऑक्टोबर -**
जागतिक शारीरिकशास्त्र दिनानिमित्त धाराशिव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात देहदान कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी तुळजापूर तालुक्यातील चिवरी येथील देहदान केलेले सेवानिवृत्त मुख्याध्यापक कै. सुभाष काशिनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबीयांचा सन्मान करण्यात आला. या सोहळ्यास डॉ. शैलेंद्र चव्हाण, डॉ. स्वाती पांढरे, आकाशवाणी केंद्राचे कार्यक्रम अधिकारी किशोर पवार, लक्ष्मी माने, जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे, पोलीस निरीक्षक दराडे, प्रफुल्ल बनसोडे, प्रसन्न सरवदे, डॉ. तानाजी लाकाळ, वैद्यकीय अधीक्षक डॉ. शफीक मुंडेवाडी, उपअधिष्ठाता डॉ. सुरेश चोरे आणि डॉ. मुकुंद माने यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी कलमाकर सूर्यवंशी, नितीन सूर्यवंशी, संतोष सूर्यवंशी, किसन शिंदे तसेच माने यांच्यासह सूर्यवंशी कुटुंबीयांचा गौरव करण्यात आला.



### तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या पाच विद्यार्थ्यांची इंटर्नशिपसाठी निवड

**धाराशिव, दि.२४ ऑक्टोबर -**
तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या रायन मोमीन, वैष्णवी पाटील, रागिणी ढोणे, सायली भोरे आणि अभिषेक इंगळे या पाच विद्यार्थ्यांची पुणे येथील 'लेंड अ हॅंड इंडिया' या स्वयंसेवी संस्थेत इंटर्नशिपसाठी निवड झाली आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना रोबोटिक्स, कोडिंग, इलेक्ट्रॉनिक्स आणि एम्बेडेड सिस्टीम यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण मिळणार आहे. महाविद्यालय आणि संस्थेमध्ये झालेल्या सामंजस्य करारानुसार, प्रशिक्षणानंतर हे विद्यार्थी ग्रामीण भागातील अटल टिंकरिंग लॅब असलेल्या शाळांमधील विद्यार्थ्यांना तांत्रिक मार्गदर्शन करणार आहेत. तसेच, विद्यार्थ्यांना नावीन्यपूर्ण प्रकल्प तयार करण्यासाठी प्रोत्साहित केले जाणार आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. पद्मसिंह पाटील, आ. राणाजगजितसिंह पाटील, मल्हार पाटील, प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने यांनी विद्यार्थ्यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# श्री आई तुळजाभवानी मातेच्या पौर्णिमा उत्सवाची आज भक्तिमय पर्वणी

**देवीजींची प्रतिष्ठापना, सोलापूरच्या काठ्यांसह छबिना, जोगवा आणि अन्नदान महाप्रसादाचे आयोजन**



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२४ ऑक्टोबर -**
महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई श्री तुळजाभवानी मातेच्या श्रीक्षेत्र तुळजापूर येथे आश्विन पौर्णिमेनिमित्त तीन दिवसीय धार्मिक उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, दि. २५ ऑक्टोबर ते मंगळवार, दि. २७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत कोजागिरी पौर्णिमा, मंदिर पौर्णिमा, देवीजींची प्रतिष्ठापना, सोलापूरच्या काठ्यांसह छबिना, जोगवा आणि अन्नदान महाप्रसाद असे विविध धार्मिक कार्यक्रम पार पडणार आहेत. या उत्सवामुळे तुळजापूर नगरीत भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे.

श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या वतीने उत्सवाचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून, तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) माया माने यांनी याबाबत माहिती दिली.

तीन दिवस चालणाऱ्या या पौर्णिमा उत्सवात धार्मिक विधी, पारंपरिक छबिना आणि अन्नदान महाप्रसादाच्या माध्यमातून तुळजाभवानी मातेच्या परंपरेला उजाळा मिळणार आहे. त्यामुळे आई तुळजाभवानीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी हा उत्सव श्रद्धा आणि भक्तिभावाची पर्वणी ठरणार आहे.

### सोमवारी मंदिर पौर्णिमेचा मुख्य सोहळा



२५ ऑक्टोबर रोजी कोजागिरी पौर्णिमा साजरी करण्यात येणार आहे. त्यानंतर २६ ऑक्टोबर रोजी मंदिर पौर्णिमेनिमित्त पहाटे श्री देवीजींची प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे. यानंतर सोलापूरच्या काठ्यांसह छबिना आणि जोगवा हे पारंपरिक धार्मिक कार्यक्रम पार पडणार आहेत. तुळजाभवानी मातेच्या धार्मिक परंपरेत महत्त्व असलेल्या या सोहळ्यामुळे भाविकांना देवीच्या परंपरेचे दर्शन घडणार आहे.

### २७ ऑक्टोबरला अन्नदान महाप्रसाद

मंगळवार, २७ ऑक्टोबर रोजी अन्नदान महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. याच दिवशी सोलापूरच्या काठ्यांसह छबिना काढण्यात येणार आहे. अन्नदानाच्या माध्यमातून भाविकांना महाप्रसादाचा लाभ घेता येणार असून, उत्सवाच्या समारोपाला धार्मिक सेवेची जोड मिळणार आहे.

## दुष्काळग्रस्त नगरपरिषद क्षेत्रांतही रोजगार हमी योजना लागू होणार?

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ ऑक्टोबर -**
दुष्काळग्रस्त तालुक्यांतील नगरपरिषद आणि नगरपंचायत क्षेत्रांतही रोजगार हमी योजनेअंतर्गत मजूरप्रधान कामे सुरू करण्याची मागणी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी राज्य शासनाकडे केली आहे. या मागणीच्या अनुषंगाने दुष्काळग्रस्त तालुक्यांतील 'अ' व 'ब' वर्ग नगरपरिषद क्षेत्रांत योजना लागू करण्याबाबत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे संबंधित मंत्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेऊन मार्ग काढणार आहेत.

दुष्काळामुळे शेतीतील उत्पन्न घटले असून, त्याचा परिणाम शहरांतील बाजारपेठा, छोटे व्यावसायिक, बांधकाम क्षेत्र आणि रोजंदारी कामगारांच्या रोजगारावर होत आहे. त्यामुळे ग्रामीण भागाबरोबरच दुष्काळग्रस्त नागरी क्षेत्रांचाही रोजगार हमी योजनेत समावेश करावा, अशी मागणी पाटील यांनी केली आहे.

या योजनेतून तलाव, बारव व विहिरींमधील गाळ काढणे, जलस्रोतांचे पुनरुज्जीवन, नाला खोलीकरण, विहीर पुनर्भरण, मृदसंधारण आणि चारा लागवडीसारखी कामे हाती घेण्याची सूचना करण्यात आली आहे. यामुळे स्थानिक मजुरांना रोजगार मिळण्यासोबतच जलसंधारण आणि चारा उपलब्धतेलाही चालना मिळू शकते.

नगरपरिषद क्षेत्रांत रोजगार हमीची कामे सुरू करण्यासाठी शासनाने विशेष परवानगी द्यावी, आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा आणि प्रशासकीय मान्यता द्यावी, अशी मागणी आमदार पाटील यांनी केली आहे. महसूलमंत्र्यांच्या बैठकीनंतर याबाबत कोणता निर्णय होतो, याकडे दुष्काळग्रस्त भागातील कामगारांचे लक्ष लागले आहे.

## कोजागिरी पौर्णिमेच्या पार्श्वभूमीवर घाटशीळ परिसर चकाचक!

### भाविकांच्या सोयीसाठी पायऱ्या, रस्त्यांची स्वच्छता...

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२४ ऑक्टोबर -**
कोजागिरी पौर्णिमेनिमित्त तुळजापूर येथे येणाऱ्या भाविकांच्या सोयी-सुविधांसाठी आणि परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी पूर्वतयारी सुरू करण्यात आली आहे. घाटशीळ मंदिरापासून घाटापर्यंत जाणाऱ्या पायऱ्यांची स्वच्छता करण्यात आली असून, रस्त्यांच्या कडेला वाढलेले गवत आणि अडथळा निर्माण करणाऱ्या झाडांच्या फांद्या हटविण्यात आल्या आहेत.

कोजागिरी पौर्णिमेच्या काळात सोलापूरसह विविध भागांतून भाविक मोठ्या संख्येने तुळजापूर येथे येतात. या पार्श्वभूमीवर भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी मंदिर परिसरासह वर्दळीच्या ठिकाणी स्वच्छता राखणे आणि रस्ते व पायऱ्या अडथळामुक्त ठेवण्यावर भर देण्यात येत आहे.



घाटशीळ परिसरात राबविण्यात आलेल्या स्वच्छता मोहिमेत बीव्हीजीच्या कर्मचाऱ्यांनी सहभाग घेत पायऱ्यांची साफसफाई, गवत काढणे आणि रस्त्यांवरील अनावश्यक झाडांच्या फांद्या हटविण्याचे काम केले. त्यामुळे परिसर स्वच्छ आणि व्यवस्थित झाला असून, भाविकांना सुरक्षितपणे ये-जा करण्यास मदत होणार आहे.

कोजागिरी पौर्णिमेदरम्यान भाविकांची संख्या लक्षात घेता, स्वच्छतेसोबतच परिसरातील व्यवस्था कायम राखण्याची गरज व्यक्त होत आहे.

## गॅस पाइपलाइन कनेक्शन अपडेटच्या नावाखाली वृद्ध महिलेची ७ लाख ९६ हजारांची फसवणूक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ ऑक्टोबर -**
गॅस पाइपलाइन कनेक्शन अपडेट करण्याच्या नावाखाली सायबर भामट्यांनी धाराशिव येथील ६६ वर्षीय वृद्ध महिलेची तब्बल ७ लाख ९६ हजार रुपयांची ऑनलाइन फसवणूक केली. लता अनिल घुगे (रा. उंबरे कोठा, बार्शी नाका परिसर, धाराशिव) यांच्यासोबत २१ ऑक्टोबर रोजी हा प्रकार घडला. याप्रकरणी २२ ऑक्टोबर रोजी दिलेल्या फिर्यादीवरून सायबर पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**बनावट बिलाची एपीके फाइल पाठवून बँक खात्यावर डल्ला**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, लता घुगे या २१ ऑक्टोबर रोजी सकाळी ११.३० ते सायंकाळी ६.१० वाजण्याच्या दरम्यान घरी असताना अज्ञात व्यक्तींनी गॅस पाइपलाइन कनेक्शन अपडेट करण्याच्या बहाण्याने त्यांच्याशी संपर्क साधला. त्यानंतर बनावट गॅस बिल अपडेट करण्यासाठी एपीके फाइल पाठविण्यात आली. या फाइलच्या माध्यमातून त्यांच्या बँक ऑफ इंडिया खात्यातून ७ लाख ९६ हजार रुपये ऑनलाइन पद्धतीने काढून घेतल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

या प्रकरणात ८७८७५८७६२९ आणि ९३४३६०५७६१ या मोबाइल क्रमांकांचा उल्लेख करण्यात आला आहे. याप्रकरणी गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास सायबर पोलीस करीत आहेत.

## भूममध्ये ४५ गोवंशीय जनावरांची दाटीवाटीने वाहतूक; दोघांविरुद्ध गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ ऑक्टोबर -**
भूम-पारडी रस्त्यावरील पांढरे देवी मंदिराजवळ ४५ गोवंशीय जनावरांची चारापाणी न देता दाटीवाटीने वाहतूक करताना भूम पोलिसांनी दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला. ही कारवाई २२ ऑक्टोबर रोजी पहाटे ५.३५ वाजण्याच्या सुमारास करण्यात आली.

अभिमान भगवान मंडलिक (वय ३२, रा. जामखेड, जि. अहिल्यानगर) आणि युसुफ सुदबुद्दीन सय्यद (वय २७, रा. खडकत, ता. आष्टी, जि. बीड) हे आयशर व पिकअप वाहनातून ३५ जर्सी गायींची वासरे आणि १० जर्सी गायी, अशी एकूण ४५ जनावरे वाहतूक करताना आढळले. जनावरांच्या चारा-पाण्याची व्यवस्था न करता त्यांना वाहनांत दाटीवाटीने भरल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले.

या प्रकरणी संबंधित दोघांविरुद्ध प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध अधिनियम १९६० मधील कलम ११ (१) (ड), ११ (१) (ई), तसेच महाराष्ट्रातील संबंधित गोवंश वाहतूकविषयक कायद्याच्या कलम ५ (ब) व ९ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## दिव्यांग शेतकऱ्याचे आंबा फळबागेचे बिल थकले

**तीन वर्षांच्या अनुदानापैकी दोन वर्षांचेच पैसे मिळाले; तिसऱ्या वर्षाच्या बिलासाठी वारंवार हेलपाटे**

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२४ ऑक्टोबर -**
महात्मा गांधी रोजगार हमी योजनेंतर्गत आंबा फळबागेची लागवड केलेल्या मस्सा (खुर्द) येथील दिव्यांग शेतकरी अण्णासाहेब चांगदेव फरताडे यांचे तिसऱ्या वर्षाचे कुशल बिल प्रलंबित असल्याने त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. वारंवार पाठपुरावा करूनही बिल मिळत नसल्याने कृषी कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण करण्याचा इशारा त्यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.



फरताडे हे एका हाताने दिव्यांग असून, त्यांनी सन २०१९-२० मध्ये महात्मा गांधी रोजगार हमी योजनेंतर्गत स्वतःच्या गट क्रमांक ६९४ मध्ये आंबा फळबागेची लागवड केली होती. नियमानुसार तीन वर्षांचे अनुदान देय असताना पहिल्या दोन वर्षांचे बिल त्यांना मिळाले; मात्र तिसऱ्या वर्षाचे कुशल बिल अद्याप प्रलंबित आहे. संबंधित कृषी सहाय्यकाने फळबागेची पाहणी करून आवश्यक पावत्या घेतल्या आणि एम.बी. रेकॉर्डमध्ये नोंद केल्याचे सांगितले होते. तरीही वारंवार कृषी कार्यालयात हेलपाटे मारून बिल मिळाले नसल्याचे फरताडे यांनी निवेदनात नमूद केले आहे.

या प्रकरणी त्यांनी तालुका कृषी अधिकारी, कळंब आणि जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्याकडे निवेदन देऊन प्रलंबित बिल तातडीने अदा करण्याची मागणी केली आहे. दिव्यांग शेतकऱ्याला आपल्या हक्काच्या पैशांसाठी वारंवार कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागत असल्याने कृषी विभाग याप्रकरणी काय भूमिका घेतो, याकडे लक्ष लागले आहे.

## दुष्काळाशी मुकाबल्यासाठी जिल्हा परिषद सरसावली; पाणी-चारा टंचाईचे पूर्वनियोजन सुरू

### विहीर पुनर्भरण, चारा लागवड आणि जलसंधारणावर भर

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ ऑक्टोबर -**
जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन आगामी काळातील पाणीटंचाई आणि चारा संकटाचा सामना करण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने पूर्वनियोजन सुरू केले आहे. ग्रामीण भागात पिण्याचे पाणी आणि पशुधनासाठी चारा उपलब्ध राहावा, यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करून उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर यांनी दिले.



त्यांच्या अध्यक्षतेखाली सर्व खातेप्रमुख आणि विभागप्रमुखांची आढावा बैठक झाली. या बैठकीत दुष्काळ निवारणाच्या उपाययोजनांसह मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला. क्षेत्रीय पाहणी करून ग्रामस्थांच्या अडचणी जाणून घ्याव्यात आणि गावपातळीवर आवश्यक उपाययोजना तातडीने राबवाव्यात, असे त्यांनी सांगितले.

आगामी काळात पाणीटंचाई निर्माण होऊ शकणारी ठिकाणे निश्चित करून पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, जलस्रोतांचे नियोजन आणि विहीर पुनर्भरणाची कामे प्राधान्याने हाती घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. विहीर पुनर्भरणासाठी उपलब्ध असलेल्या अखर्चित निधीचा नियोजनबद्ध वापर करण्यावर भर देण्यात आला.

ज्या ठिकाणी पाणी उपलब्ध आहे; मात्र ते पिण्यास योग्य नाही, अशा ठिकाणी तांत्रिक पडताळणी करून ते पाणी चारा पिकांच्या लागवडीसाठी वापरण्याच्या शक्यतेची तपासणी करण्याचे निर्देशही देण्यात आले.

दुष्काळात पशुधनासाठी चारा उपलब्ध व्हावा, यासाठी तालुकास्तरावर कार्यशाळा घेऊन एकत्रित कृती आराखडा तयार करण्यास सांगण्यात आले. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत चारा लागवडीची कामे नियोजित करावीत.

पशुसंवर्धन विभागाने चारा पिकांच्या बियाण्यांची उपलब्धता सुनिश्चित करून आवश्यकतेनुसार मोफत बियाणे वितरणाचे नियोजन करावे, असे निर्देश देण्यात आले. पाणी उपलब्ध असलेल्या भागांत चारा उत्पादन वाढविण्यासह जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यावरही भर देण्यात आला.

आकांक्षित तालुका उपक्रमांतर्गत संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्येकी दहा गावांची जबाबदारी घेऊन गावनिहाय प्रगतीचा नियमित आढावा घ्यावा, असे सांगण्यात आले. जलसंधारण आणि भूजल पुनर्भरणासाठी 'जलतारा' उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर भर देण्यात आला. प्राधान्याने निवडलेल्या दहा गावांत या उपक्रमाचे परिणाम दिसतील, अशा पद्धतीने नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

### जलसंधारणाच्या कामांना गती देण्याचे निर्देश

मनरेगांतर्गत जलसंधारण, भूजल पुनर्भरण आणि दुष्काळ निवारणाला पूरक कामे प्रभावीपणे राबविणे, आवश्यक मस्टर काढणे आणि प्रत्यक्ष कामांना सुरुवात करणे, यावर प्रशासनाने लक्ष केंद्रित करण्याचे निर्देश देण्यात आले. पाणी व चारा टंचाईचे संभाव्य संकट लक्षात घेता विभागांनी समन्वयाने काम करून उपाययोजनांचा नियमित आढावा घ्यावा, असेही बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

### दहा गावांची जबाबदारी; 'जलतारा' उपक्रमावर भर

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या अंमलबजावणीसाठी तालुकानिहाय नियमित आढावा घेऊन निर्धारित उद्दिष्टे, ग्रामसभांचे ठराव आणि प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. संपर्क अधिकाऱ्यांनी संबंधित गावांना प्रत्यक्ष भेटी देऊन कामांची प्रगती तपासावी आणि अहवाल सादर करावा. अभियानाचा दर आठवड्याला आढावा घेण्याचेही निर्देश देण्यात आले.

## संक्षिप्त...

## निलंगा नगर परिषदेतर्फे विद्यार्थ्यांसाठी इकोफ्रेंडली दिवाळी मार्गदर्शन सत्र




तभा वृत्तसेवा

निलंगा दि. २४ ऑक्टोबर : माजी मंत्री लोकनेते आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत नगराध्यक्ष संजयराज हलगरकर यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार, निलंगा नगर परिषद अंतर्गत जिल्हा परिषद मुलांची प्रशाला व जिल्हा परिषद कन्या प्रशाला येथे दिनांक २२ ऑक्टोबर २०२६ रोजी विद्यार्थ्यांसाठी इकोफ्रेंडली दिवाळी मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

या सत्रात डॉ. गीतांजली कौशिक यांनी पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच श्री. योगेश चव्हाण यांनी दुष्काळाच्या पार्श्र्वभूमीवर पाण्याचा काटकसरीने वापर आणि पाणी बचतीचे महत्त्व पटवून दिले. यावेळी विद्यार्थी व शिक्षकांना पाणी बचतीची शपथ देण्यात आली.

पर्यावरण संवर्धन, जलसंवर्धन आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक सुरेश होळकर, पाणीपुरवठा व स्वच्छता अभियंता श्रीमती प्रज्ञा पाटोळे, जिल्हा परिषद कन्या प्रशालेच्या मुख्याध्यापिका श्रीमती एस. नागमोडे आणि श्री. गौतम सातपुते यांची विशेष उपस्थिती होती.

पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करूया, पाण्याचा प्रत्येक थेंब जपूया आणि हरित निलंगाच्या निर्मितीस हातभार लावूया

## उदयगिरीत विद्यार्थी कल्याण मंडळ उद्घाटन व गुणवंतांचा सत्कार संपन्न

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. २४ ऑक्टोबर : येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात विद्यार्थी कल्याण मंडळाचे उद्घाटन व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहात संपन्न झाला, अध्यक्षस्थानी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष बसवराज पाटील नागराळकर होते तर उद्घाटक म्हणून उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे उपस्थित होते, मंचावर संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. प्रकाश तोंडारे, सहसचिव प्रशांत पेन्सलवार, कोषाध्यक्ष माधवराव नोबदे, सदस्य इंजि. मन्मथ बिरादार, श्रीमती भाग्यश्री चाकूरकर, प्रा. आडेप्पा अंजुरे, शिवराज वल्लापुरे, भीमाशंकर मुद्दा, प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के, उपप्राचार्य डॉ. एस.एन. हल्लाळे, उपप्राचार्य टी. एन. सगर, पर्यवेक्षक प्रा. एस. व्ही. मुडपे व विद्यार्थी कल्याण मंडळाचे प्रभारी प्रा. डॉ. एस. एन. लांडगे यांची उपस्थिती होती. विविध मान्यवरांनी ठेवलेल्या पारितोषिकांचे वितरण बारावी, पदवी व पदव्युत्तर गुणवंत विद्यार्थ्यांना करण्यात आले, दीपप्रज्वलनाने मान्यवरांच्या हस्ते कल्याण मंडळाचे उद्घाटन झाले व विद्यार्थ्यांना शपथ देण्यात आली, प्रातिनिधिक पाच विद्यार्थ्यांना परीक्षा फीची रक्कम परत करण्यात आली.

यावेळी बोलताना उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे म्हणाले, विद्यार्थी कल्याण मंडळाच्या माध्यमातून नेतृत्व क्षमता विकसित होत असते, विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घेऊन समाजाचे प्रश्र्न समजून सोडवण्याचा प्रयत्न करावा. अध्यक्षीय समारोपात बसवराज पाटील नागराळकर म्हणाले, विद्यार्थ्यांनी संकल्प केल्यास यश अशक्य नाही, न्यूनगंड व नकारात्मक विचार सोडून द्यावेत अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली, प्रास्ताविक प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के यांनी केले, सूत्रसंचालन प्रा. डॉ. अर्चना मोरे यांनी केले, पारितोषिक वितरणाचे वाचन प्रा. डॉ. ए. यु. नागरगोजे, प्रा. डॉ. आर. बी. अलापुरे, प्रा. प्रवीण जाहुरे, प्रा. डॉ. एम.जे. कुलकर्णी यांनी केले तर आभार विद्यापीठ प्रतिनिधी आसिया पठाण हिने मानले.

# औशात मंगळवारी १३१ व्या आग्गी सोहळ्याचे आयोजन

## स्वामी निवासस्थान ते विरभद्रेश्वर मंदिरापर्यंत भव्य मिरवणूक





तभा वृत्तसेवा

औसा दि. २४ आँक्टोंबर : २१ व्या शतकाच्या उंबरठ्यावर आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगातही संस्कृती, परंपरा आणि आग्गी सोहळा आजही तेवढ्याच श्रद्धेने औसा शहरात टिकून आहे.ओसा शहरातील वीरभद्र मंदीरात गेल्या १३१वर्षापासून ते आजपर्यंत अखंडपणे सुरू असलेला सोहळा रामलिंग सातलिंग स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली अलोक रामलिंग स्वामी करीत असून या पारंपरिक आख्खी सोहळ्याचे आयोजन मंगळवार दि. २७ रोजी सायंकाळी ६वा. करण्यात आले आहे.

संताची भूमी म्हणून ओळख असलेल्या औशात अनेक पारंपरिक पद्धतीने सोहळा साजरा करण्यात येतो. अशी औसा शहराची २१व्या शतकातही नवी ओळख आहे. स्वातंत्रपुर्व काळापासून सुरू असलेली परंपरा आजही तेवढ्याच भक्ती भावाने, श्रद्धेने सुरू आहे.आज या परंपरेची पाचवी पिढी असून १३१ वर्षापासून अखंडपणे सुरू आहे.

इरय्या स्वामी यांनी सुरू केलेला आग्गी सोहळा आजही सुरू असून .मृगय्या स्वामी,बसय्या स्वामी,सातलिंग स्वामी यांनी अखंडपणे सुरू ठेवला होता. यानंतर रामलिंग स्वामी यांनी आपल्या पाचव्य पिढीत अखंडपणे अद्वितीय,अदभूत असा सोहळा पारंपारिक पद्धतीने सुरू ठेवला आहे.

इतर सोहळ्याप्रमाणे आग्गी सोहळा अखंडितपणे सुरू ठेवणे साधी, सोपी आणि सहज होणारी गोष्ट नाही.यासाठी मोठा त्याग, श्रध्दा, भक्ती गरजेची असते. आणि स्वामी परिवाराच्या वतीने गेल्या पाच पिढ्यांपासून जपवणूक केली आहे.यावर्षी रामलिंग सातलिंग स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार दि.२७ रोजी स्वामी यांच्या निवासस्थानापासून ते वीरभद्रेश्र्वर मंदीर परिसरातून नगरप्रदक्षिणा वाजत गाजत होणार आहे.

दुपारच्या सत्रात महाप्रसाद होणार आहे.तर सायंकाळी ६ वाजता आग्गी सोहळा साजरा करण्यात येणार आहे.

अग्नीच्या कोळशावरून चालण्याची परंपरा या वर्षी रामलिंग स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली अलोक रामलिंग स्वामी वैज्ञानिक दृष्टिकोनातून पुर्ण करणार आहेत. भाविक भक्तांनी महाप्रसाद व आग्गी सोहळ्याचा लाभ घ्यावा. असे आवाहन स्वामी परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

## पुणे–लातूर दिवाळी स्पेशल रेल्वे सुरू करण्याची मागणी



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २४ ऑक्टोबर : लातूर-मुंबई रेल्वेस मुरुड रेल्वे स्थानकावर थांबा मिळाल्याबद्दल रेल्वे संघर्ष समिती, मुरुड यांच्या वतीने खासदार डॉ. शिवाजीराव काळगे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पुणे-लातूर दिवाळी स्पेशल रेल्वे सुरू करण्यासह रेल्वेच्या विविध प्रलंबित प्रश्र्नांबाबत त्यांना निवेदन देण्यात आले.

मागील वर्षी मध्य रेल्वेच्या वतीने लातूर-पुणे दिवाळी स्पेशल रेल्वे सुरू करण्यात आली होती. या गाडीला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळाला होता. पुणे शहरात लातूर व धाराशिव जिल्ह्यातील अनेक नागरिक रोजगार, नोकरी आणि शिक्षणाच्या निमित्ताने वास्तव्यास आहेत. दिवाळी सणासाठी आपल्या गावी येणाऱ्या नागरिकांची आणि विद्यार्थ्यांची संख्या मोठी असते.

मात्र सणासुदीच्या काळात खासगी ट्रॅव्हल्सच्या तिकीटदरात दुप्पट-तिप्पट वाढ होत असल्याने सर्वसामान्य नागरिक आणि विद्यार्थ्यांना प्रवास करणे आर्थिकदृष्ट्या परवडत नाही. रेल्वे प्रवास तुलनेने कमी खर्चिक आणि सुरक्षित असल्यामुळे पुणे येथे राहणाऱ्या लातूर व धाराशिव जिल्ह्यातील नागरिकांसाठी पुणे-लातूर दिवाळी स्पेशल रेल्वे सुरू करावी, अशी मागणी रेल्वे संघर्ष समितीच्या वतीने करण्यात आली.

## दिवाळीत ग्राहकांची फसवणूक रोखण्यासाठी विशेष तपासणी मोहीम राबवा

## ग्राहक संरक्षणचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन




तभा वृत्तसेवा

चाकूर दि. २४ ऑक्टोबर : दिवाळीच्या सणात मिठाई, सुका मेवा, फराळ आणि पॅकबंद खाद्यपदार्थांच्या विक्रीत ग्राहकांची फसवणूक रोखण्यासाठी लातूर जिल्ह्यात विशेष तपासणी मोहीम राबवावी, अशी मागणी जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे सदस्य तथा लोककल्याण ग्राहक संरक्षण संस्थेचे मराठवाडा समन्वयक संग्राम वाघमारे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

सदरील निवेदनात दिवाळीत खाद्यपदार्थांचे वजन, दर्जा, उत्पादन व वापराची मुदत आणि छापील किंमतीबाबत ग्राहकांची दिशाभूल होण्याची शक्यता असून मुदतबाह्य वस्तूंची विक्री तसेच एमआरपीपेक्षा अधिक दर आकारण्याचे प्रकार वाढू शकतात. ते रोखण्यासाठी वैध मापनशास्त्र विभाग आणि अन्न व औषध प्रशासनाने संयुक्त तपासणी मोहीम राबवून नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

पुढे पॅकबंद वस्तूंवरील उत्पादकाचे नाव, निव्वळ वजन, उत्पादनाचा महिना व वर्ष, कमाल, किरकोळ किंमत आणि ग्राहक तक्रार निवारणाची माहिती तपासावी. तसेच खाद्यपदार्थांचा दर्जा, स्वच्छता, साठवणूक व अन्नसुरक्षेच्या नियमांची पडताळणी करून ग्राहकांसाठी तक्रार नोंदविण्याचे दूरध्वनी क्रमांक आणि ई-मेल प्रसिद्ध करावेत, असे म्हटले आहे. तपासणीतील अनियमितता आणि त्यावरील कारवाईचा आढावा घेऊनच

दिवाळीपूर्वीच प्रभावी उपाययोजना करून ग्राहकांना सुरक्षित, दर्जेदार खाद्यपदार्थ योग्य किंमतीत उपलब्ध करून द्यावेत, असे आवाहनही लोककल्याण ग्राहक संरक्षण संस्थेने केले आहे.

या निवेदनावर जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे नूतन सदस्य तथा लोककल्याण ग्राहक संरक्षण संस्थेचे पदाधिकारी संग्राम वाघमारे, किशन धुळशेट्टे, अविनाश सवई, विशाल कणसे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## चाकूर तालुका कृषी कार्यालयात गुटख्याच्या पिचकाऱ्यांनी वॉशरूम जाम तर शौचालय घाण

# महाराष्ट्रात गुटखा बंदी मग कर्मचाऱ्यांना गुटखा भेटतो कोठून ?





तभा वृत्तसेवा /सतिश गाडेकर

चाकूर दि. २४ ऑक्टोबर : महाराष्ट्रात गुटखा, पानमसाला विक्री, साठवणूक आणि सेवनावर कडक बंदी असताना, शेतकऱ्यांचे हित जोपासणारे तालुका कृषी कार्यालयच शासनाच्या गुटखा बंदीच्या आदेशाची पायमल्ली करीत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

तालुका कृषी कार्यालयातील वॉशरूम (बेसिन) गुटखा खाऊन मारलेल्या पिचकाऱ्यांनी पूर्णपणे जाम झाले आहे. तर शौचालयामध्ये सर्वत्र गुटख्याच्या पिचकाऱ्या, घाण आणि दुर्गंधी पसरली आहे. त्यामुळे कार्यालयात कामानिमित्त येणाऱ्या शेतकऱ्यांना, महिलांना नाक दाबून जावे लागत आहे. ही अत्यंत लाजिरवाणी बाब समोर आली आहे.

महाराष्ट्र शासनाने अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत गुटख्यावर बंदी घातली आहे मग प्रश्र्न असा निर्माण होतो की, शासकीय कार्यालयातच कर्मचाऱ्यांना गुटखा मिळतो कुठून? जर कार्यालयातच कर्मचारी खुलेआम गुटखा खाऊन पिचकाऱ्या मारल्या जात असल्याने येथील कर्मचाऱ्यांना कोणाचाही वचक राहिला नसल्याचे जनतेतून बोलले जात आहे.विषेश म्हणजे या कार्यालयात महिला कर्मचारीही आहेत या महिलांच्या व शेतकऱ्यांच्या समोरच कर्मचारी गुटखा खातात.

शासकीय कार्यालय हे जनतेचे मंदिर असते. तिथे स्वच्छता आणि शिस्त असणे अपेक्षित आहे. मात्र येथे स्वच्छ भारत अभियानाचीच पायमल्ली होत आहे. वॉशरूम जाम झाल्याने पाणी तुंबून राहते आणि रोगराई पसरण्याचा धोका निर्माण झाला आहे.

अधिकारी कर्मचाऱ्यांनीच नियम पाळला नाही तर शेतकऱ्यांनी काय आदर्श घ्यायचा? अशी संतप्त सवाल शेतकऱ्यांतून व्यक्त केला जात आहे.

तालुका कृषी अधिकारी यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन संबंधित गुटखा खाणाऱ्या कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करावी.कार्यालयात गुटखा मुक्त कार्यालय आणि थुंकण्यास सक्त मनाई चे फलक लावावेत.दररोज स्वच्छता केली जावी आणि सीसीटीव्ही फुटेज तपासून घाण करणाऱ्यांना दंड आकारण्यात यावा.

जोपर्यंत शासकीय कर्मचारीच गुटखामुक्त होत नाहीत, तोपर्यंत महाराष्ट्र गुटखामुक्त होणार कसा? असा सवाल आता नागरिकांतून उपस्थित होत आहे.

## देविदास बनसोडे यांचे निधन



तभा वृत्तसेवा

औसा दि. २४ ऑक्टोबर : येथील सेवानिवृत्त कर्मचारी तथा सामाजिक कार्यकर्ते देविदास विठठलराव बनसोडे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले असून त्यांच्यावर आज सकाळी११ वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत .

सेवानिवृत्ती नंतर त्यांनी सामाजिक क्षेत्रात खूप कामं केली असून गोर गरिबांना सधळ हातानी नेहमी मदत करण्यास तत्पर असायचे . औसा शहरासह तालुक्यात दादा या नावानी प्रसिध्द होते . त्यांना संगिताची खूप आवड होती . भजनासाठी ते कोठेही जात असतं असे बहुरंगी व्यक्ती असलेले दादा पुन्हा होणे नाही .

त्यांच्या पश्च्यात चार मुले, एक मुलगी, सूना, नात, नातू असा परिवार आहे

## आपापसातील संबंधाबरोबरच व्यवहार सुसह्य होण्यासाठी कौशल्य तुमचे महत्त्वाचे ठरतात : हंगरगे




तभा वृत्तसेवा

उदगीर दि. २४ ऑक्टोबर : आयुष्य सुखी करायचे असेल तर एक दुसऱ्याला समजून घेणे अनिवार्य आहे. इतरांशी संबंध प्रस्थापित करत असताना कौशल्य तुमचे, जीवन कसं जगावं? यासाठी महत्त्वाचे ठरतात, त्यामुळे संबंध सलोख्याचे होऊन व्यवहार सुसह्य होतात असे मत रमेश हंगरगे यांनी व्यक्त केले.

चला कवितेच्या बनात या उपक्रमांतर्गत गेल्या सोळा वर्षापासून सातत्याने चालू असलेल्या वाचक संवादाचे ३७१ वे पुष्प श्रीमती प्रेमला नळगिरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. यावेळी आदर्श शिक्षक, सेवानिवृत्त केंद्रप्रमुख श्री रमेश हंगरगे यांनी श्री अनंत खेर लिखित कौशल्य तुमचे, जीवन कसं जगावं? या साहित्यकृतीवर अत्यंत विनोदी शैलीत अगदी सहजतेने संवाद साधला. यावेळी बोलताना ते म्हणाले की मानवी शरीर हा एक अद्भुत चमत्कार आहे. जस हे शरीर टिकवण्यासाठी अन्न-पाणी याची गरज असते तसं आपल्या शरीरातच अदृश्य स्वरूपाने असलेल आपलं मन स्तुति ऐकण्यासाठी आसुसलेला असत. मात्र स्तुती ही व्यक्ती पेक्षा कार्याची करावी त्यामुळे त्या कार्यास शरीरही साथ देते.

यानंतर झालेल्या चर्चेत उपस्थितांपैकी तुळशीदास बिरादार, मोहनराव निडवंचे, सूर्यकांत पांचाळ यांच्यासह अनेकांनी सहभाग नोंदवला. यावेळी उपस्थितांना जन्म दिनाची ग्रंथ भेट देण्यात आली.

शेवटी अध्यक्षीय समारोपात श्रीमती प्रेमला नळगिरे म्हणाल्या की, वाचक संवाद हा एक परिपूर्ण कार्यक्रम आहे. कारण यात तज्ञ व अभ्यासू व्यक्तींना पाचारण केलं जातं. इथं स्वतःची कौशल्य वापरून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले जाते. सुखी जीवनासाठी तुमची कौशल्य वापरा असा संदेश लेखकाने या पुस्तकाच्या माध्यमातून दिलेला आहे असेही त्या म्हणाल्या.

मुरलीधर जाधव साहेब यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर आभार गोविंदराव सावरगावे यांनी मांडले. या कार्यक्रमाचे यशस्वीततेसाठी प्रा. राजपाल पाटील, हनुमंत म्हेत्रे, संजय गिरी, तुकाराम बिरादार, प्रा.सुरेश शिंदे बेंबरेकर , प्रा. राजेंद्र एकंबेकर, यशवंत बिरादार व संयोजक अनंत कदम यांच्यासह अनेकांनी परिश्रम घेतले.

# दुष्काळात मोफत रूग्णवाहिका सेवेचा शिवसंकल्प

## शेतकरी, शेतमजूर, महामार्गावरील अपघातग्रस्तांना दिलासा




तभा वृत्तसेवा

औसा दि २४ आँक्टोंबर : दुष्काळाने शेतीचे अर्थकारण कोलमडले, रोजगाराच्या संधी कमी झाल्या आणि ग्रामीण कुटुंबांपुढे उदरनिर्वाहाचा प्रश्र्न उभा राहिला. अशा परिस्थितीत आजारपण किंवा अपघाताचे संकट ओढवले तर रुग्णालयापर्यंत पोहोचण्याचा खर्चही कुटुंबासाठी मोठी चिंता ठरतो. ही अडचण लक्षात घेऊन तालुक्यातील उजनी येथील शिवसंकल्प फाउंडेशन फॉर रूरल ट्रान्सफॉर्मेशनने गरजू रुग्णांसाठी रुग्णवाहिका सेवा पूर्णपणे मोफत करण्याचा पुढाकार घेतला आहे. दुष्काळाच्या कठीण काळात आर्थिकदृष्ट्या दुर्बल शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण कुटुंबांना दिलासा देणारा उपक्रम ठरत आहे.

उजनीपासून ३० किलोमीटरच्या परिघातील गरजू रुग्णांसह राष्ट्रीय महामार्गावरील अपघातग्रस्तांना तातडीने रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात येणार आहे. औसा, लातूर, तुळजापूर, धाराशिव, सोलापूर आणि बार्शी येथील रुग्णालयांपर्यंत रुग्णांना पोहोचविण्यासाठी सेवा उपयोगी ठरणार आहे. आर्थिक अडचणींमुळे उपचारांसाठी विलंब होऊ नये. आणि आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना वेळेत वैद्यकीय मदत मिळावी. हा या उपक्रमामागील उद्देश आहे.

### गरजूसाठी आधार डॉ. मुद्दसीर सय्यद

गेल्या चार वर्षांत ५०० हून अधिक रुग्णांना या सेवेचा लाभ मिळाला आहे. एका दुर्दैवी घटनेतून सुरू झालेली सेवा आज ग्रामीण भागातील गरजू रूग्णांसाठी मोठाआधार ठरत असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ. मुद्दसीर सय्यद यांनी दिली.

### एका दुर्दैवी घटनेतून सेवेचा शिवसंकल्प.

उजनी येथील शेतकरी स्व. मारुती श्रीरंग ढवण यांचा ३ एप्रिल २०२२ रोजी राष्ट्रीय महामार्गावरील अपघातात मृत्यू झाला. या वेळी वेळेत रुग्णवाहिका न मिळाल्याने ग्रामीण भागातील आरोग्यसेवेची उणीव प्रकर्षाने जाणवली. भविष्यात अन्य कोणत्याही कुटुंबावर अशी वेळ येऊ नये. या भावनेतून शिवसंकल्प फाउंडेशनचे विश्र्वस्त, स्वयंसेवक, ग्रामस्थ, मित्र आणि नातेवाईक एकत्र आले. लोकसहभागातून ८ ऑगस्ट २०२२ रोजी कृषिरत्न श्री. बी. बी. ठोंबरे, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू डॉ. अशोक ढवण आणि गावातील इतर मान्यवरांच्या उपस्थितीत रुग्णवाहिका सेवा सुरू झाली. चार तालुक्यांच्या सीमावर्ती भागातील उजनी हे या सेवेचे केंद्र बनले. मोठ्या आरोग्य सुविधांसाठी ४० ते ५० किलोमीटरचे अंतर पार करावे लागणाऱ्या ग्रामीण रुग्णांसाठी हीच सेवा आज आधार ठरत आहे. रुग्णवाहिकेसोबतच वाचन चळवळ, शिक्षण आणि पर्यावरण संवर्धन या विषयावर शिवसंकल्प कार्यरत आहे.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## आरोग्य तपासणी शिबिराला प्रतिसाद

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २४ ऑक्टोबर : महा विधी सेवा शिबीर आणि शासकीय योजनांच्या महामेळाव्यानिमित्त लातूर जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. यामध्ये सुमारे ८७ नागरिकांची रक्तदाब तपासणी, ८५ नागरिकांची मधुमेह तपासणी, ३७ नागरिकांची सर्वसाधारण रक्त तपासणी, २५ नागरिकांची एक्स-रे तपासणी आणि ०३ नागरिकांची कॅन्सर (कर्करोग) तपासणी करण्यात आली.

याशिवाय, जनकल्याणकारी योजनांचा विस्तार करत ९० पात्र लाभार्थ्यांना आयुष्यमान भारत कार्ड काढून देण्यात आले, तर ३२ नागरिकांची निक्षय मित्र म्हणून नोंदणी करण्यात आली. शिबिरातील वैद्यकीय तपासणी दरम्यान रक्तदाबाचे ९ आणि मधुमेहाचे ४ संशयित रुग्ण आढळून आले असून, या सर्व रुग्णांना पुढील आवश्यक वैद्यकीय तपासण्या व योग्य उपचारासाठी आरोग्य विभागाद्वारे मार्गदर्शन करण्यात आले.



## विविध वृत्त.....

### माजी सैनिक, विधवा आणि पाल्यांसाठी उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २४ ऑक्टोबर : जिह्यातील माजी सैनिक, माजी सैनिकांच्या विधवा पत्नी व त्यांच्या पाल्यांना उद्योग आणि स्वयंरोजगाराच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम तसेच स्वावलंबी बनवण्यासाठी लातूर जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाच्या वतीने सन २०२६-२७ या वर्षाकरिता उद्योजकता विकासावर आधारित विशेष प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हे प्रशिक्षण कार्यक्रम महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्याचे प्रस्तावित असून, याद्वारे सहभागी लाभार्थ्यांना यशस्वी उद्योजक बनण्यासाठी आवश्यक असणारे सर्वसमावेशक मार्गदर्शन पुरवले जाणार आहे.

यामध्ये प्रामुख्याने योग्य व्यवसायाची निवड करणे, सूक्ष्म व्यवसाय नियोजन, नवीन उद्योग-व्यवसाय उभारणीची प्रक्रिया, विविध शासकीय कर्ज व अनुदान योजनांची माहिती, प्रभावी वित्तीय नियोजन आणि स्वयंरोजगारासह रोजगार निर्मितीच्या विविध संधींबाबत सखोल प्रशिक्षण आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन दिले जाईल.

माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबाला आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. तरी लातूर जिल्ह्यातील ज्या इच्छुक माजी सैनिकांना, त्यांच्या विधवा पत्नींना अथवा पाल्यांना या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावयाचा आहे, त्यांनी ३० ऑक्टोबर २०२६ पर्यंत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, लातूर येथे उपस्थित राहून आपली नाव नोंदणी पूर्ण करावी, असे आवाहन लातूरचे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (नि.) यांनी केले आहे.

### विचार शलाकाची बैठक संपन्न



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २४ ऑक्टोबर : जेष्ठ विचारवंत प्रा . डॉ . नागोराव कुंभार संपादित विचारलाका हितचिंतकांची बैठक संपन्न झाली .

या बैठकीला रामकुमार रायवाडी कर, माधव बावगे, डॉ. अशोक नारनवरे, डॉ अनिल जायभाये, डॉ. विवेक सौताडेकर, रंजीत आचार्य, गंगाधर डिगोळे, डॉ. संजय गवई, प्रा . भाऊसाहेब उमाटे, डॉ . गणेश बेळंबे, उत्तरेश्र्वर बिराजदार, विराज साळुंखे, संजय व्यवहारे गणपत तेलंगे, गंगाधर गवळी, सुधीर भोसले, रुक्साना मुल्ला, हनुमंत मुंडे, डॉ गणेश गोमारे यांची उपस्थिती होती .

यावेळी उपस्थितांनी आपले मनोगत व्यक्त केले युनिक फाऊंडेशन प्रकाशन च्या वतीने प्रकाशित विशारशलाका ग्रंथामध्ये३०० लेख असून३६२० पाने आहेत . याची किंमत५११०/ असली तरी सवलती मध्ये हा ग्रंथ३७००/ मध्ये असून बाय हॅड हवा असल्यास तो३२००/ मध्ये उपलब्ध असून त्यासाठी राहूल लोंढे मो नं .७३८५५२१३३६ यांच्याशी संवाद साधावा या ग्रंथांचे सहा खंड असून पहिला- स्वातंत्र्य, समता आणि न्याय, दुसरा- लोकशाही- धर्मनिरपेक्षता, तिसरा- महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर, अण्णाभाऊ साठे, चौथा- प्रबोधन आणि सामाजिक चळवळी, पाचवा- शिक्षण आणि समाज तर सहावा- चार्वाक दर्शन, जैन दर्शन, बौद्ध दर्शन, महात्मा बसवेश्र्वर दर्शन . असे आहेत .

गेल्या ३९ वर्षांपासून हे मासिक वैचारिक बांधिलकीने सुरु ठेवले आहे या बैठकीत प्रास्ताविक राहूल लोंढे यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ. संजय गवई यांनी तर ३ उपस्थितांचे आभार भाऊसाहेब उमाटे यांनी मानले

### दयानंद विज्ञान महाविद्यालयाची कोल्हापूर व रत्नागिरी येथे सहल

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २४ ऑक्टोबर : येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित, दयानंद विज्ञान महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र विभागातर्फे एनईपी-२०२० अंतर्गत स्किल डेव्हलपमेंट तसेच ऑन दि जॉब ट्रेनिंगचा एक भाग म्हणून बी.एस्सी.तृतीय वर्ष सूक्ष्मजीवशास्त्र विद्यार्थ्यांसाठी औद्योगिक अभ्यास सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ यांचे औद्योगिक कार्य या विषयाची माहिती मिळावी म्हणून एस.जी. फायटोफार्मा कोल्हापूर व गद्रे मराइन एक्सपोर्ट प्रायव्हेट लिमिटेड रत्नागिरी येथे शैक्षणिक सहल व भेटीचे आयोजन केलेहोते. प्र. प्राचार्य डॉ. सिद्धेश्र्वर बेल्लाळे व डॉ. राहुल मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. महेश करळे यांनी सहलीचे नियोजन केले होते. ३१ विद्यार्थी, २ प्राध्यापक, कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदविला.

### जि. प. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा दुष्काळग्रस्तांना मदतीचा हात

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २४ ऑक्टोबर : महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद सेवानिवृत्त कर्मचारी संघटना, लातूर यांचेवतीने दुष्काळ ग्रस्तांसाठी त्यांना मिळणाऱ्या निवृत्ती वेतनातून आर्थिक मदत करण्याचे बैठकीत ठरले. संघटनेतील पदाधिकारी व सदस्य यांनी या कामी स्वत: होऊन पुढाकार घेतला आहे. महाराष्ट्रात सध्या भीषण दुष्काळाची स्थिती उद्भवली असून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. आपण जरी जेष्ठ नागरिक असलो तरी आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो. या उदात्त भावनेने संघटनेतील सर्व सदस्यांनी यथाशक्ती मदत करण्याचे आवाहन करण्यात आले. या दातृत्वाच्या कामास जिल्हा परिषद शिक्षकेत्तर सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे संघटनेचे अध्यक्ष भातंब्रेकर, उपाध्यक्ष एनाडले, भारत काळे, सचिव मन्मथ शेटे, कोषध्यक्ष वसंत कातळे, भिसे, रवि सरदेशमुख, इंजि. आळंगे झेड. ए. सय्यद, देशमुख,` व इतर यांनी सांगितले.

## लातूरमध्ये व्हॉईस ऑफ मीडियाचा दोन दिवसीय मेळावा; महिला पत्रकारितेला बळ देण्यासाठी सकारात्मक पाऊल राज्यभरातून अनेक पत्रकार महिला उपस्थित



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २४ ऑक्टोबर : पत्रकारितेला नवी ऊर्जा देतानाच महिला पत्रकारितेला अधिक सक्षम, स्वावलंबी आणि प्रतिष्ठित बनविण्याच्या उद्देशाने 'व्हॉईस ऑफ मीडिया' महिला विंगच्या वतीने लातूर येथे आयोजित दोन दिवसीय राज्यस्तरीय महिला पत्रकार अधिवेशनाचा उत्साहपूर्ण प्रारंभ झाला. औसा रोडवरील थोरमोटे लॉन्स येथे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या व उद्योजिका सुनंदाताई पवार, प्रसिद्ध वृत्तनिवेदिका व पत्रकार फराह खान आणि लातूर जिल्हा परिषद सदस्या आशा भिसे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून अधिवेशनाचे उद्घाटन करण्यात आले. महिला पत्रकारांच्या कर्तृत्वाचा गौरव, त्यांच्या समस्या आणि आव्हानांवर चर्चा तसेच पत्रकारितेतील त्यांचे स्थान अधिक भक्कम करण्याच्या दृष्टीने हे अधिवेशन महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

या उद्घाटन सोहळ्याला व्हॉईस ऑफ मीडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल म्हस्के, राष्ट्रीय महासचिव दिव्या भोसले, राष्ट्रीय संघटक व सर्व विंगप्रमुख रश्मी मारवाडी, प्रदेशाध्यक्ष विजय चोरडिया, उपाध्यक्ष संगम कोटलवार आणि महिला प्रदेशाध्यक्ष वैशाली पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. राज्याच्या विविध भागांतून आलेल्या महिला पत्रकार आणि पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीमुळे अधिवेशनस्थळी उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

या प्रसंगी 'व्हॉईस ऑफ मीडिया वर्ल्ड' या मुखपत्राच्या महिला पत्रकार अधिवेशन विशेषांकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. राज्यातील महिला पत्रकारांचा जीवनप्रवास, त्यांचे संघर्ष, कर्तृत्व आणि पत्रकारितेतील योगदान यांचा वेध या विशेषांकातून घेण्यात आला आहे. कार्यकारी संपादक रश्मी मारवाडी आणि वैशाली पाटील यांनी महिला पत्रकारांच्या कार्याचा आणि अनुभवांचा शब्दरूपात मागोवा घेतला आहे. महिला पत्रकारांच्या कार्याची दखल घेणारा आणि त्यांच्या प्रेरणादायी प्रवासाला उजाळा देणारा हा विशेषांक अधिवेशनाचे एक महत्त्वाचे आकर्षण ठरला.

अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी पहिल्या सत्रात महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या महिला पदाधिकाऱ्यांनी व्हॉईस ऑफ मीडियाची वाटचाल, संघटनेचे कार्य आणि पत्रकारितेतील बदलती आव्हाने याविषयी आपले मनोगत व्यक्त केले. महिला पत्रकारांना संघटित व्यासपीठ मिळणे, त्यांच्यात परस्पर संवाद आणि सहकार्य वाढणे तसेच त्यांच्या व्यावसायिक विकासासाठी नव्या संधी उपलब्ध होणे, या दृष्टीने अशा अधिवेशनांची आवश्यकता असल्याची भावना यावेळी व्यक्त झाली.

आजच्या बदलत्या माध्यमविश्र्वात महिला पत्रकारांना केवळ व्यावसायिक स्पर्धेलाच सामोरे जावे लागत नाही, तर सुरक्षितता, कामाच्या ठिकाणचे प्रश्न, आर्थिक स्वावलंबन, आरोग्य आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या यांसारख्या अनेक आघाड्यांवरही संघर्ष करावा लागतो. या पार्श्र्वभूमीवर महिला पत्रकारांचे हक्क, त्यांची सुरक्षितता, आर्थिक स्वावलंबन आणि व्यावसायिक सक्षमीकरण यांवर विचारमंथन घडवून आणणे, हा या अधिवेशनामागील प्रमुख उद्देश आहे. महिला पत्रकारांना सक्षम करण्यासाठी सकारात्मक दिशा देणारे आणि त्यांच्या प्रश्नांना संघटित आवाज देणारे व्यासपीठ म्हणून या अधिवेशनाकडे पाहिले जात आहे.

दोन दिवस चालणाऱ्या या अधिवेशनात एकूण सहा ते आठ सत्रांच्या माध्यमातून महिला पत्रकारितेशी संबंधित विविध विषयांवर मार्गदर्शन आणि चर्चा होणार आहे. अनुभवी महिला मार्गदर्शकांच्या सहभागातून पत्रकारितेतील संधी, आव्हाने, अधिकार आणि स्वावलंबनाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला जाणार आहे. पहिल्या दिवसाचा समारोप सांस्कृतिक कार्यक्रमाने होणार असून, रविवारी अधिवेशनाचा समारोप होईल.

महिला पत्रकारांच्या अनुभवांना व्यासपीठ देणे, त्यांच्या प्रश्नांवर सामूहिकपणे विचार करणे आणि पत्रकारितेच्या क्षेत्रात त्यांना अधिक सक्षमपणे वाटचाल करता यावी यासाठी प्रेरणा देणे, या उद्देशाने लातूरच्या भूमीत सुरू झालेला हा दोन दिवसीय मेळावा महिला पत्रकारितेच्या वाटचालीतील एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरण्याची अपेक्षा आहे.

## मोफत कायदेशीर विषयक मार्गदर्शनासह शासकीय योजनांचा गरजू नागरिकांपर्यंत पोहचविणे गरजेचे : न्यायमूर्ती मोरे

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २४ ऑक्टोबर : शासकीय लोककल्याणकारी योजनांपासून समाजातील कोणताही पात्र आणि गरजू घटक वंचित राहू नये, यासाठी न्यायव्यवस्था आणि प्रशासनाने अत्यंत संवेदनशीलतेने काम करणे गरजेचे आहे. अशा घटकांपर्यंत कायदेविषयक माहिती आणि शासकीय योजना पोहोचविणे आवश्यक असून यासाठी विधी सेवा समितीमार्फत महा विधी सेवा शिबिरांचे आयोजन करण्यात येत असल्याचे मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती तथा लातूर जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती संदीपकुमार मोरे यांनी सांगितले. लातूर येथील दिवाणजी मंगल कार्यालयात आयोजित महा विधी सेवा शिबीर आणि शासकीय योजनांच्या महामेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण आणि महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या निर्देशानुसार लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व जिल्हा प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने या महा विधी सेवा शिबीर आणि शासकीय योजनांच्या महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन वृक्षाजलार्पण अर्थात रोपट्याला पाणी अर्पण करून अनोख्या पद्धतीने करण्यात आला. या माध्यमातून लातूर जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी जलसंवर्धन, पाणी बचत आणि पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यात आला.

या प्रसंगी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती सुशील घोडेस्वार, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश संजय भारुका, जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल कुमार मीना, महानगरपालिका आयुक्त राहूल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव व्यंकटेश गिरवलकर आणि जिल्हा वकील मंडळाचे अध्यक्ष ड. शिवकुमार जाधव यांच्यासह न्यायिक अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, वकील, पक्षकार, विविध योजनांचे लाभार्थी व नागरिक मोठ्या संख्येने प्रमुख उपस्थिती होती.

सर्वसामान्य नागरिकांच्या कल्याणासाठी शासन अनेक योजना राबवित असते. या योजनांपासून एकही पात्र व्यक्ती वंचित राहू नये, यासाठी विधी सेवा समितीच्यावतीने शासकीय योजनांचा महामेळावा घेवून योजनांविषयी जनजागृती करण्यात येत आहे. या माध्यमातून गरजू लोकांपर्यंत योजनांची माहिती पोहचण्यास मदत होईल. विधी सेवा समितीच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांना मोफत कायदेशीर सल्ला व मदतीसोबतच शासकीय योजनांचा लाभ थेट लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत, असे न्यायमूर्ती मोरे सांगितले.

## आज नागरी सहकारी बँकांच्या कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २४ ऑक्टोबर : भारतीय रिझर्व्ह बँक (आरबीआय) आणि लातूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि. २५ ऑक्टोबर रोजी रविवारी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत जेएसपीएम शैक्षणिक संकुलातील सभागृह, एमआयडीसी, लातूर येथे नागरी सहकारी बँकांच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यशाळा होणार आहे. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी लातूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशनचे अध्यक्ष तथा माजी आमदार शिवाजीराव पाटील कव्हेकर हे उपस्थित राहणार आहेत. महाराष्ट्र नागरी सहकारी बँक फेडरेशनचे राज्यअध्यक्ष अजय ब्रम्हेचा, आरबीआयच्या ट्रेनिंग मॅनेजर कृष्णा फुटाण, आरबीआय, नागपूरचे सहाय्यक व्यवस्थापक कैवल्य साकळगावकर हे मार्गदर्शन करणार आहेत. लातूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशनचे उपाध्यक्ष सुहास पाचपुते यांचीही उपस्थिती राहणार आहे. या प्रशिक्षण कार्यशाळेत नागरी सहकारी बँकांसमोरील विविध आव्हाने व अडचणी, सायबर सुरक्षा, भारतीय रिझर्व्ह बँक व शासनाची धोरणे, तसेच बँकिंग क्षेत्रातील वेगाने होणारे बदल आदी विषयांवर मार्गदर्शन होणार आहे. बदलत्या बँकिंग व्यवस्थेत अधिकारी व कर्मचार्यांचे ज्ञान अद्ययावत करणे, सायबर सुरक्षेविषयी जागरूकता वाढविणे, बँकिंग व्यवहार अधिक सक्षम व सुरक्षित करण्याच्या दृष्टीने ही कार्यशाळा महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

## आधुनिक तंत्रज्ञान, संशोधन आणि रुग्णकेंद्रित पुनर्वसनाला 'इलेक्ट्रोकॉन-२६' मधून चालना डॉ. प्रसर्ट सकुलश्रीप्रसर्ट यांचा आशावाद; एमआयटीत तिसरी आंतरराष्ट्रीय इलेक्ट्रोथेरपी परिषद उत्साहात




तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २४ ऑक्टोबर : आधुनिक तंत्रज्ञान, जागतिक स्तरावरील संशोधन आणि प्रगत उपचारपद्धतींची माहिती फिजिओथेरपी क्षेत्रातील विद्यार्थी, संशोधक आणि व्यावसायिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने लातूरमध्ये आयोजित 'इलेक्ट्रोकॉन-२६' ही तिसरी आंतरराष्ट्रीय इलेक्ट्रोथेरपी परिषद महत्त्वपूर्ण ठरत आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन आणि रुग्णकेंद्रित पुनर्वसन यांची सांगड घालत फिजिओथेरपी क्षेत्राच्या प्रगतीला चालना देणाऱ्या या परिषदेत आधुनिक उपचारतंत्रांवर विचारमंथन होत आहे. आधुनिक तंत्रज्ञान, संशोशन आणि रुग्णकेंद्रित पुनर्वसनाला 'इलेक्ट्रोकॉन-२६' मधून चालना मिळेल, असा आशावाद थायलंड मधील महिडोल विद्यापीठाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. प्रसर्ट सकुलश्रीप्रसर्ट यांनी व्यक्त केला.

माईर्स पुणे संचलित महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फिजिओथेरपी, लातूर आणि महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने एमआयटी कॅम्पसमधील संत ज्ञानेश्र्वर डोम येथे आयोजित परिषदेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. प्रसर्ट सकुलश्रीप्रसर्ट बोलत होते. यावेळी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या अलाईड हेल्थ सायन्सेसचे अधिष्ठाता डॉ. वाय. प्रवीण कुमार, विद्यापीठाचे निरीक्षक डॉ. विजय भारतीय, परिषदेचे अध्यक्ष तथा एमआयपीटीचे प्राचार्य डॉ. सुभाष खत्री, सचिव डॉ. विश्र्वनाथ पावडशेट्टी यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना डॉ. प्रसर्ट सकुलश्रीप्रसर्ट म्हणाले की, उच्च तीव्रतेच्या लेझर प्रकाशाचा वापर करून शरीरातील खोलवर असलेल्या स्नायू, कंडरा, अस्थिबंध आणि सांध्यांशी संबंधित विकारांच्या व्यवस्थापनासाठी एचआयएलटीचा उपयोग केला जातो. गुडघ्याचा ऑस्टिओआर्थ्रायटिस, खांदेदुखी, मानदुखी आणि कंबरदुखी यांसारख्या समस्यांमध्ये या उपचारपद्धतीच्या परिणामकारकतेचा अभ्यास करण्यात आला आहे.

पारंपरिक फिजिओथेरपी उपचारांसोबत एचआयएलटीचा वापर केल्यास वेदना नियंत्रण आणि कार्यक्षम पुनर्वसनासाठी मदत होऊ शकते. मात्र, ही सर्व आजारांवरील हमखास उपचारपद्धती नसून तिचे परिणाम रुग्णाचे निदान, शारीरिक स्थिती आणि उपचारांच्या स्वरूपानुसार बदलतात. त्यामुळे योग्य वैद्यकीय मूल्यांकन, प्रशिक्षित फिजिओथेरपिस्टचे मार्गदर्शन आणि सुरक्षिततेच्या निकषांचे पालन आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

फिजिओथेरपीच्या विद्यार्थ्यांनी आधुनिक पुनर्वसन तंत्रज्ञानाचा अभ्यास करताना लेझरची शक्ती, ऊर्जा, तरंगलांबी, उपचाराचा कालावधी, रुग्णनिवड आणि संरक्षणात्मक उपाय यांची सखोल माहिती करून घेणे गरजेचे आहे. अशा परिषदांमुळे विद्यार्थ्यांना अद्ययावत उपचारपद्धतींचे ज्ञान मिळण्यासोबतच संशोधक आणि आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांशी संवाद साधण्याची संधी उपलब्ध होते, असेही त्यांनी नमूद केले.

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे निरीक्षक डॉ. विजय भारतीय यांनी परिषदेच्या नियोजनाचे कौतुक केले. फिजिओथेरपी शिक्षण क्षेत्रातील आगामी बदलांचा उल्लेख करताना राष्ट्रीय आयोगाचा अभ्यासक्रम २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून लागू होणार असल्याचे त्यांनी सांगितले. सध्याच्या प्रवेश क्षमतेसाठी एक वर्षाची मुदतवाढ मिळाली असून पुढील वर्षापासून प्रवेश क्षमता ५० किंवा १०० विद्यार्थ्यांपर्यंत निश्र्चित केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

विद्यापीठाच्या अलाईड हेल्थ सायन्सेसचे अधिष्ठाता डॉ. वाय. प्रवीण कुमार यांनी फिजिओथेरपीमध्ये व्यायामोपचार आणि इलेक्ट्रोथेरपी या दोन्ही शाखांचे महत्त्व अधोरेखित केले. इलेक्ट्रोथेरपीच्या अभ्यासाला विशेष महत्त्व देणारी परिषद लातूरमध्ये आयोजित होणे ही अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले. राष्ट्रीय आयोग आणि महाविद्यालयांमध्ये समन्वय वाढवून शैक्षणिक संस्थांना प्रगतीच्या दिशेने नेण्यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी नमूद केले.

परिषदेचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फिजिओथेरपीचे प्राचार्य डॉ. सुभाष खत्री यांनी प्रास्ताविकात 'इलेक्ट्रोकॉन'च्या तीन वर्षांच्या प्रवासाचा आढावा घेतला. वर्ल्ड सोसायटी फॉर इलेक्ट्रो-फिजिऑलॉजिकल एजंट्सच्या माध्यमातून आयोजित ही परिषद भविष्यात आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वाढत्या प्रभावाचा संदर्भ देत बदलत्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेणे ही काळाची गरज असल्याचे डॉ. खत्री यांनी सांगितले.

जुन्या कौशल्यांसोबत नवीन ज्ञान आणि आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारणारेच भविष्यातील आव्हानांना समर्थपणे सामोरे जाऊ शकतील, असे मत त्यांनी व्यक्त केले. दोन दिवस चालणाऱ्या या परिषदेत आयोजित परिसंवाद आणि चर्चांमध्ये प्रतिनिधींनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मेघा बक्षी आणि डॉ. आफरीन जहाँ यांनी केले, तर आभार डॉ. विश्र्वनाथ पावडशेट्टी यांनी मानले. मराठवाड्यासह देशाच्या विविध भागांतील फिजिओथेरपीचे विद्यार्थी, संशोधक आणि तज्ज्ञांनी परिषदेत सहभाग नोंदवला.